
साप्ताहिक


# माणूस

८जून८५/२ रुपये



चार्ली चॅपलिन
नंतरचा मोठा
विनोदी नट...

## पिटर सेलर्स



## हिंदुस्थान एकात्म कसा राहील?

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : दुसरा

८ जून १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

पुणे वार्ता

## पहिलं

## मराठी प्रकाशक संमेलन

संमेलनं काही महाराष्ट्राला नवीन नाहीत. साहित्यसमेलन हे तर दरवर्षी गाजणारे आणि भरपूर प्रसिद्धी मिळवणारे साहित्य-समेलनात भाग घेणारे कवी कधी स्वत:ची वेगळी चूल माडून कवीसमेलनंही भरवतात. नाट्यसमेलनही दरवर्षी उत्साहानं भरवल जात. अशी अनेक व्यावसायिकाची समेलनं सांगता येतील या सगळ्या समेलनाचा उद्देश काय, तर एकाच व्यवसायातल्या लोकानी एकत्र येऊन एकमेकाशी संवाद साधायचा, आपल्या व्यवसायातील निरनिराळ्या अडचणीबाबत चर्चा करून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करायचा. तर याच धर्तीवर पुण्यात २ जून रोजी पहिलं मराठी प्रकाशकसंमेलन भरल होतं.

मराठी प्रकाशक परिषदेनं हे समेलन आयोजित केलं होतं. ही परिषद स्थापन झाली १९७६ साली आणि महाराष्ट्रातले बरेच प्रकाशक तिचे सभासद आहेत; पण परिषदेच्या सदस्याना एकत्र येण्यासाठी कोणतही व्यासपीठ नव्हतं. त्यातूनच आपल्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी पुस्तकव्यवसायातील साहित्यिक किंवा मुद्रक याच्या धर्तीवर प्रकाशकांच संमेलन घ्यायची कल्पना पुढे आली. अनेक नाविन्यपूर्ण कल्पनाची सुरुवात पुण्यापासून होते. त्यामुळे प्रकाशकांच्या पहिल्या समेलनासाठीही कदाचित पुण्याची निवड झाली असावी.

समेलनाचे अध्यक्ष म्हणून कांटिनेंटल प्रकाशनच्या अनतराव कुलकर्णींची निवड झाली होती. ही निवड परिषदेच्या कार्यकारी मडळान केली. अध्यक्षपदावरून भाषण करताना अनतरावानी काही चागले मुद्दे माडले. 'प्रकाशनाचा व्यवसाय हा २० व्या शतकात खऱ्या अर्थाने नावारूपाला आला. मराठीत आता दरवर्षी दीड ते दोन हजार पुस्तक प्रकाशित होत असून ४०० ते ५०० प्रकाशक आहेत. पण तरीही हा व्यवसाय छोटा मानला जातो आणि तो तसाच रहाणार गेल्या शतकातल्या प्रकाशकात जो ध्येयवाद होता तो आता सपुष्टात येऊन व्यावसायिकता प्रकाशनात शिरली आहे आणि हा बदल रास्तच आहे', असं अनंतरावानी सागितलं. व्यवसायाकडे पाहण्याच्या दृष्टीत बदल झाला असला तरी व्यावसायिकाच्या प्रश्नात, अडचणीत मात्र फारसा फरक पडलेला नाही. हे प्रश्न एकत्र येऊन सोडवण्यासाठी या समेलनाची योजना असल्याचं त्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केलं.

प्रकाशकाच्या प्रश्नांचा अध्यक्षांनी आपल्या भाषणात प्रामुख्यानं उल्लेख केला. ते म्हणाले की, आजच्या काळात पुस्तकं ही जीवनोपयोगी नाही तर करमणुकीची वस्तू बनली आहेत. पुस्तकाचा वाचकवर्ग वाढला आहे; पण यात स्वत: पुस्तकं विकत घेऊन वाचणारे खूपच कमी असतात याची कारण शोधताना ते म्हणाले की, आज वृत्तपत्रांच्या रविवार आवृत्त्या, टी व्ही, रेडिओ यामुळं लोकांची करमणूक होते. त्यामुळ पुस्तक विकत घ्यायची प्रवृत्ती कमी होत चालली आहे ही विक्री वाढावी यासाठी पुस्तकाची प्रदर्शनं भरवणं, त्याची प्रभावी जाहिरात करण हे मार्गही त्यांनी सुचवले.

अर्थात पुस्तकाची विक्री वाढण्यासाठी त्यांचा दर्जा वाढायला हवा आणि त्याची जबाबदारी प्रकाशकाकडे आहे या मुद्यावर अध्यक्षांनी अधिक भर दिला. प्रकाशक कसा हवा हे सागताना ते म्हणाले की, प्रकाशकाला वाङ्मयाची तसंच मुद्रणाच्या सौदर्याची जाण हवी. चागली पुस्तकं वाचकाला योग्य किमतीत त्यानं उपलब्ध करून दिली पाहिजेत. एखादं पुस्तक वाचकाला सवलतीच्या दरात देताना काही प्रकाशक आधीच त्याची किंमत भरमसाठ वाढवून नंतर सवलत दिल्यासारख दाखवतात. या प्रवृत्तीवर त्यानी टीका केली.

प्रकाशकाच्या शासनाबद्दलच्या अपेक्षाही अनंतरावानी बोलून दाखवल्या. शासकीय ग्रथालयाना सरकारतर्फे पुस्तकखरेदीसाठी जे अनुदान दिलं जातं, त्यातून काय खरेदी केली जाते, त्याची पहाणी करण्याची मागणी त्यानी केली. लेखकाच्या उत्तम साहित्यकृतीना पारितोषिक देऊन गौरवल जातं; पण ते साहित्य प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकाचा मात्र सन्मान केला जात नाही. शासनानं, प्रकाशकानाही उत्तेजन द्यायची प्रथा

सुरू करावी अशी सूचनाही त्यांनी केली.

प्रकाशकांना शासनानं उत्तेजन द्यावं अशी मागणी अध्यक्षांनी आपल्या भाषणात केली होतीच. त्याचा आरंभ खुद्द परिषदेनेच करून एक चांगला पायंडा पाडला असं म्हणायला हवं. ज्या प्रकाशकांच्या पुस्तकांना राज्य शासनाची पारितोषिके मिळाली आहेत अशा सर्व प्रकाशकांचा संमेलनात सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळेस सत्कार झालेली मौज प्रकाशन, मॅजेस्टिक, अभिनव (मुंबई), धारा (औरंगाबाद), विश्वमोहिनी, राजहंस, शारदा (नांदेड), साधना, अजब पुस्तकालय (कोल्हापूर), श्रीविद्या, कॉन्टिनेन्टल, पॉप्युलर ही काही प्रमुख प्रकाशने. याचवेळेस संमेलनास उपस्थित असलेल्या पं. महादेवशास्त्री जोशी, साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष शंकर पाटील यांचाही सत्कार झाला.


दुपारच्या सत्रात 'कॉपीराइट कायद्या'वर परिसंवाद होता. पण प्रकाशक रा. ज. देशमुख यांचं निधन झाल्यामुळं तो रद्द करण्यात आला. यानंतरच्या खुल्या अधिवेशनाला चांगला प्रतिसाद मिळाला. या अधिवेशनात ११ ठराव संमत करण्यात आले. यापैकी काही प्रमुख ठराव असे:– आकाशवाणीप्रमाणेच दूरदर्शनवरही पुस्तकपरीक्षणासाठी वेळ मिळावा; पुणे, मुंबई, नागपूर प्रमाणेच इतर ठिकाणीही जकात असू नये; ग्रंथप्रसारासाठी छापील पुस्तकांच्या रजिस्ट्रेशनचा दर १ रु. इतकाच असावा; पुस्तकांची पार्सले एस्. टी तून कमी दरात नेण्यात यावीत; जिल्हा ग्रंथप्रदर्शनं भरवली जावीत; प्रकाशकांचाही शासनानं सन्मान करावा; राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान, पाठ्यपुस्तक मंडळ यावर प्रकाशक प्रतिनिधी असावा; ललित पुस्तकांसाठी कागदाची सवलत द्यावी.

प्रकाशक संमेलनाला मिळालेला प्रतिसाद पाहून दरवर्षी निरनिराळ्या ठिकाणी असं संमेलन भरवायचा संयोजकांचा मानस आहे. पण यात मुख्य अडचण आर्थिक आहे. यावर अनंतराव कुलकर्णी यांनी एक तोडगा सुचवला ५ वर्षांसाठी बिनव्याजी १ हजार रु ज्यांची इच्छा आहे त्यांनी द्यावेत. असे ५० हजार जमले तर पुढच्या ५ वर्षांची सोय होईल. ही सूचना करून त्यांनी स्वत: १ हजार रु. देण्याचे जाहीर केले त्यांच्याशिवाय आणखी २४ जणांनीही हे पैसे देण्याचे मान्य केले. ऑगस्टपर्यंत जर उरलेले पैसे जमले तर प्रकाशक संमेलन दरवर्षी भरवायची कल्पना प्रत्यक्षात येईल.

संमेलनाला उपस्थित काही प्रकाशकांशी बोलल्यावर संमेलनाच्या कल्पनेचं सर्वांनी मनापासून स्वागत केल्याचंच दिसलं. आमच्या अडचणी आता एकत्र येऊन सोडवता येतील असं त्या सर्वांना वाटतं. एकेकट्यांनी काही तरी करण्यापेक्षा सर्वांनी एकत्र आलं तर आम्हा व्यावसायिकांना निश्चितच फायदा होईल असं मौज प्रकाशनचे श्री. पु भागवत आणि 'श्रीविद्या प्रकाशन'चे मधुकाका कुलकर्णी या दोघांनाही वाटतं. सरकारशी संवाद साधण्यासाठी या एकीचा उपयोग होईल असं मत 'प्रतिमा प्रकाशन'च्या अ. वि. पारगावकरांनी मांडलं. मात्र या संमेलनात छोट्या, नवोदित प्रकाशकांपासून सगळ्यांना वाव मिळावा आणि संमेलनाला औपचारिक भाग कमी करावा अशी सूचना श्री. पु. भागवतांनी केली. या सूचनेला पाठिंबा देताना चैतश्री प्रकाशन (अंमळनेर)च्या वा. रा. सोनार यांनी संमेलनात उपलब्ध काळाचा जास्तीत जास्त वापर करून प्रकाशकांच्या प्रश्नावरच जास्तीत जास्त चर्चा केली जावी असं सुचवलं.

पुढील वर्षी औरंगाबादनं हे संमेलन भरवायची तयारी दर्शवली आहे. या पहिल्या संमेलनाला मिळालेला एकूण प्रतिसाद पहाता कायम स्वरूपात हे संमेलन भरवायच्या दृष्टीनं प्रकाशक मंडळींनी सुरुवात तर चांगली केली आहे असं म्हणावं लागेल.

–सीमा कुलकर्णी




## □ रात्रपाळीचं दुःख !

मोठ्या लोकांच्या ऐन मध्यरात्री झालेल्या मृत्यूचे दुःख फक्त रात्रपाळीचे पत्रकारच जाणू शकतील. भीष्मांनी उत्तरायण सुरू होईपर्यंत प्राण रोखून धरले यात त्यांचा किती चांगुलपणा होता याची आम्हाला कल्पना आहे. परवा रात्री अशीच आमच्या जीवाची तगमग झाली. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाच्या (पीटीआय) दिल्ली येथील कार्यालयाला फोन करून कुणी तरी कळविले की किशोरकुमार याचे न्यूयॉर्क येथे निधन झाले आहे. किशोरकुमार लता मंगेशकरांबरोबर कार्यक्रमासाठी कॅनडाला गेले आहेत. या ना त्या प्रकारे ही अफवा आमच्या कार्यालयापर्यंत रात्री एक वाजता पोहोचली. रात्री अडीच पर्यंत आम्ही पन्नास फोन करून पाहिले. त्यात एक किशोरकुमार ह्यांच्या घरचा फोनही होता. परंतु कुणालाच काही पत्ता नव्हता. शेवटी ईश्वराचे नाव घेत आम्ही सकाळी तीन वाजता कार्यालयातच झोपी गेलो. त्यांना कॅनडामध्ये साधी शिंकही आली नसल्याचे सकाळी आम्हाला खात्रीलायकरीत्या समजले तेव्हा हायसे वाटले. असो.

संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र मृत्यपूर्वी काही काळ के. ई. एम. रुग्णालयात होते. त्यांचा मृत्यू दुपारी झाला; पण रोज रात्री एडिशन बंद करण्यापूर्वी त्यांच्या प्रकृतीची चौकशी करावी लागे. अलबेला, अनारकलीसारख्या चित्रपटांचे संगीतकार सी. रामचंद्र यांच्यामृत्यूचे आम्हाला फार दुःख झाले रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी त्यांनी स्वत:साठी एक सूट शिवायला टाकला होता. त्याची ट्रायलही देऊन झाली होती. अखेर त्याचे प्राणोत्क्रमण झाले त्यावेळी त्यांच्या मृतदेहावर ते कपडे चढविण्यात आले असे आम्ही ऐकले.

मागे जम्मू काश्मिरचे मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला वारले तेव्हा महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन चालू होते. आम्ही विधानसभेच्या

वार्ताहार कक्षात असताना संध्याकाळी सहा चाळीसला टेलिप्रिंटरवर 'Shaikh Abdulla dead' अशी एका ओळीची बातमी श्रीनगरहून आली. सभागृहात दुखवटा व्यक्त करण्यासाठी तात्काळ सभापतीकडे निरोप धाडण्यात आला. पाचच मिनिटांत पुन्हा टेलिप्रिंटरवर बातमी आली. Shaikh Abdulla dead. Kill' मुख्यमंत्र्याच्या मृत्यूची बातमी त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरानी अधिकृतरीत्या जाहीर केली नव्हती. त्यामुळे वृत्तसंस्थेने बातमी परत घेतली होती पुन्हा एकवार सभापतीना घाईघाईत निरोप धाडण्यात आला नतर परत सात वाजता टेलिप्रिंटरवर 'Shaikh Abdulla dead. Official' अशी एका ओळीची बातमी आली.

शेख अब्दुल्लाची प्रकृती चिंताजनक होती तेव्हा टाइम्स ऑफ इंडियाच्या पहिल्या पानावर 'Shaikh may be dead' अशा मथळ्याची बातमी छापण्यात आली होती. त्यावेळी रात्रपाळीच्या सहसंपादकास 'you may be sacked' अशा स्वरूपाचे प्रेमपत्र मिळाल्याचे आम्ही ऐकले आहे.

जयप्रकाश नारायण शेवटच्या आजारपणात एक्स्प्रेस टॉवरच्या पेंट हाऊसमध्ये होते. त्यावेळी पीटीआयच्या एका वार्ताहराने त्याच्या मृत्यूची बातमी दिली होती. या बातमीच्या आधारे त्यावेळचे पतप्रधान मोरारजी देसाई हे लोकसभेत शोक व्यक्त करीत असतानाच पहिली बातमी चुकीची असून जयप्रकाश जीवत असल्याची दुसरी बातमी देण्यात आली. मोरारजीचा चेहरा मात्र फार शोचनीय झाला.

रशियामध्ये राजकीय व्यक्तीच्या मृत्यूबाबत कमालीची गुप्तता बाळगण्यात येते. त्यामुळे परदेशातील वार्ताहराची फार मोठी पचाईत होते

अचानक टी. व्ही. वरील कार्यक्रमात बदल झाला किंवा एखाद्या महत्त्वाच्या सरकारी समारंभाला राजकीय नेता हजर नसला तर त्याचा मृत्यू झाला असला पाहिजे असे अनुमान बांधले जाते आणि ते आजपर्यंत फारसे खोटे ठरले नाही.

एका समाजवादी देशाला पाठविलेल्या सदेशावर ब्रेझनेव्ह यांची सही नव्हती ह्या आधारावर असोशिएटेड प्रेस (एपी) ह्या अमेरिकन वृत्तसंस्थेच्या वार्ताहराने मॉस्कोहून ब्रेझनेव्ह ह्यांच्या मृत्यूची शक्यता वर्तवली होती. मुबईमधल्या सायदैनिकानीही ही वार्ता छापली. ह्यानंतर जवळजवळ सात तासानी 'टास' ह्या सोव्हिएट वृत्तसंस्थेने अधिकृतरीत्या ब्रेझनेव्ह ह्यांच्या मृत्यूची बातमी प्रसृत केली. त्याच दिवशी रात्री एपीच्या वार्ताहराने 'ब्रेझनेव्ह मे नॉट बी डेड' अशा स्वरूपाची दुसरी बातमी दिली. पण त्यात साम्यवादी देशात सशयाचे वातावरण पसरवणे हाच खोडसाळ हेतू असावा.

अमेरिकेतील ख्यातनाम विनोदी लेखक मार्क ट्वेन रुग्णालयात असताना एका अमेरिकन वृत्तपत्राने चुकून 'मार्क ट्वेन डेड' अशी बातमी छापून त्यांच्यावर मृत्यूलेखही लिहिला. दुसऱ्या दिवशी मार्क ट्वेन ह्यांनी संपादकाना पत्र लिहून मृत्यूलेखातल्या स्तुतीबद्दल आभार मानले आणि लिहिले–

'The news is slightly exaggerated–बातमी थोडी अतिशयोक्तीपूर्ण आहे !'

## ☐ सुंदर अनुभव

मुबईच्या उन्हाळ्याने जीव पुरता काताऊन गेला खरा; पण ह्या काहिलीतही समाधानाचे काही निर्मोही क्षण मिळाले. उदाहरणार्थ विलायत खाँसाहेब !

तब्बल आठ वर्षानतर सितार–नवाज उस्ताद विलायत खाँसाहेब मुंबईत येऊन गेले. एच् एम. व्हीसाठी त्याच्या दोन रेकॉर्डस् निघताहेत परवा त्याचं ध्वनिमुद्रण तब्बल चार तास झालं. रात्री एक ते पहाटे साडेपाच पर्यंत ! निःशब्द, नीरव काळोखातून पहिला झणत्कार असा साक्षात्कारी आला की अद्याप धमन्यात रसरसून वाहतोय. खडकातल्या पाण्यासारखा ग्रेसांच्या कवितेतल्या सायकालीन, *नीरव निरीह दु खासारखा !* खाँसाहेबाचं ते वाजवतानाच रूप दृष्ट लागण्यासारखं होतं. टचवुड !

एन. सी पी. ए. आणि दिल्लीच्या कथक केंद्राने बिरजू महाराजाच्या शिष्यांचा एक आगळा–वेगळा कार्यक्रम गेल्या शुक्रवारी टाटा थेटरात पेश केला स्वतः बिरजूमहाराज कार्यक्रमात सामील झाले नाहीत. पण शाश्वती सेन आणि वेरोनिका या त्यांच्या दोन विद्यार्थिनींनी अक्षरशः धूम मचवून टाकली. कथकसाठी जबरदस्त स्टॅमिना लागतो. बोल–बनाव, फुट–वर्कसाठी मिजाज लागतो. तो दोघींनी 'जमके' दाखवला. मागे, झाल याला वर्षभर, शाश्वतीचा 'सोलो' कार्यक्रम एन. सी. पी. एतच पाहिला होता त्या कार्यक्रमासाठी सितारादेवी खास शाश्वतीसाठी आपले काही मोजके दागिने घेऊन आल्या होत्या. त्यावेळीही शाश्वतीचा नाच असाच डोक्यात भिनून राहिला होता.

आनदाचं आणखी एक निधान म्हणजे 'इरॉस' मध्ये सध्या रुजू असलेला 'ब्युटीफुल पीपल' हा वन्यजीवनावरचा चित्रपट. वन्यप्राणी आणि निसर्ग याच्यातला सुसवाद या चित्रपटाने असा सुरेख टिपला आहे की, 'ब्युटीफुल पीपल' हा एक चिरस्मरणीय अनुभव ठरावा.

चार्ली चॅप्लिनचे 'द किड' आणि 'ग्रेट डिक्टेटर' हे दोन्ही आवर्जून पुन्हा पुन्हा पाहावेसे पिक्चर्स पुन्हा रुजू झालेत. जोडीला लॉरेल–हार्डी आहेतच. एवीतेवी, पेपर हल्ली काही वाचवत नाही. तेव्हा आळश्या दिवसात हे तीन पिक्चर्स पाहून घ्यावेत लहानपण कसं सुरेख गवसेल !

–विष्णू जयदेव


# राजहंस प्रकाशन

## कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईच सुख ? तिला दु ख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# कॉंग्रेस संस्कृतीचा शोध आणि बोध

बाबुराव चंदावार

कॉंग्रेस सस्कृतीचा शोध घेतला जात आहे. कॉंग्रेस स्वातंत्र्याची चळवळ होती तोवर आजच्यासारखी उच्चारली जात नव्हती. तरीही कॉंग्रेस-सस्कृती होतीच. स्वातत्र्य चळवळीतल्या लोकानी सत्तापदे घेतल्यावर या सस्कृतीचे पुढे काय झाले याचे मात्र नीट आकलन करायला हवे.

सस्कृती आणि राजकीय सत्ता या दोहोंचे सख्य होऊ शकत नाही असे म. गाधीना वाटत होते. म्हणून स्वातत्र्य (अर्थात राजकीय) मिळाल्यावर कॉंग्रेसचे प्रयोजन सपले असे त्यानी जाहीर केले होते आणि कॉंग्रेसचे विसर्जन करून लोकसेवक सघात तिला परावर्तित करावे असेही त्यानी सुचविले होते. त्याची हत्या झाली व त्याच्या कल्पनेतला लोकसेवक सघ पुढे घडलाच नाही. नतर कोणी तो घडविलाही नाही.

विनोबानी लोकसेवकाचा एक सघ घडविला ज्याला सर्वसेवासघ म्हटले जाते. पण हा सघ म. गाधीच्या कल्पनेतलाच आहे, असे मात्र खात्रीपूर्वक सांगता येत नाही. तेव्हा विनोबाचा सर्वसेवासघ हा त्यांच्या प्रतिभेला आलेला बहर जरी म्हटला तरी म. गाधीना जे साधायचे होते ते यामुळे साधले गेले नाही हे मात्र खरेच आहे. सात लाख खेडयांना स्वातंत्र्य देण्याचा हेतू म. गांधीना साधायचा होता. याला त्यांनी ग्रामस्वराज्य म्हटले होते. ही सात लाख खेडी पाकिस्तान घडण्यापूर्वीच्या भारताची आहेत. म्हणजे नतर घडलेल्या आजच्या *पाकिस्तान व बांगलादेशची खेडीही त्यानी* यात समाविष्ट केली होती असेच म्हटले पाहिजे.

सात लाख खेडयाना सात लाख ग्रामसेवक म. गांधीना हवे होते. रचनात्मक कार्यांच्या उभारणीसाठीच त्याना हे ग्रामसेवक हवे होते; पण सात लाख ग्रामसेवक त्याना मिळू शकले नाहीत. यावरून स्वातंत्र्याची स्फूर्ती कसदार नव्हती असेच म. गाधीना वाटलेही होते तरीही समग्र ग्रामसेवेच्या कार्यक्रमाला त्यानी उत्तेजन दिले होते. हे जाणून घेण्यासाठी 'समग्र ग्रामसेवा की ओर' हे स्व. धीरेन्द्र मुजुमदार यानी प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावर लिहिलेले विचारोत्तेजक व विवेचनात्मक पुस्तक वाचायला हवे

म. गाधीच्या समग्र ग्रामसेवेला यावे तसे रूप आले नाही. कॉंग्रेस (या राजकीय) पक्षाने स्वातंत्र्यास्तव चळवळ केलेली असली व राजकीय स्वातंत्र्य मिळविले असले तरीही खेडयांना स्वातंत्र्य मिळावे हे जसे म. गाधीना वाटत होते तसे कॉंग्रेसला वाटले नाही. स्व. पं. जवाहरलाल नेहरू तर याच्या विरोधातच होते. यामुळे कॉंग्रेस राजकीय सत्ताभोगाच्या दिशेनेच गेली. म्हणून म. गाधीनी स्वातंत्र्य चळवळीसाठी ज्या कॉंग्रेसला वाढविले होते ती कॉंग्रेस म. गांधीना अभिप्रेत असलेल्या संस्कृतीपासून जशी वेगळी झाली होती, तशीच ती आजवर वेगळी राहिलेली आहे. तेव्हा कॉंग्रेस सस्कृतीचा विचार करताना म. गाधीच्या स्वातत्र्य चळवळीचा संदर्भ सत्तारूढ कॉंग्रेस पक्षापुरता तरी निरर्थक ठरलेला आहे. अर्थात हे केवळ मान्य करणेच पुरेसे नाही तर जाणलेही पाहिजे.

स्व. नेहरूच्या नेतृत्वाखाली वाढलेली कॉंग्रेस राजकीय सत्तेच्या आकर्षणात पडलेली होती व आहे. सत्तेला सेवेचे साधन करून सत्ता लोकोपयोगी वा कल्याणकारी बनवा*यची ही कल्पना तशी आकर्षकच आहे;* पण सत्तेमुळे सेवा कशी घडते किंवा घडलेली आहे असे मात्र अद्याप ठरायचे शिल्लक उरलेलेच आहे आणि सत्ता सेवेचे साधन ठरण्यास सर्वस्वी अपात्र आहे, हाच शेवटी निष्कर्ष निघतोही आहे. अशाही स्थितीत राजकीय सत्ता सेवेचे साधन ठरू शकते म्हणण्याचा आग्रह धरणारे धरतातच. यात आमचे समाजवादी मित्र आघाडीवर आहेत साम्यवादी राजकीय सत्तेला परिवर्तनाचे साधन मानतात, सेवेचे नव्हे. सेवेचे साधन आणि परिवर्तनाचे साधन यात फरक आहे हा फरक साम्यवाद्यांनी जेवढा जाणला तेवढाच समाजवाद्यांनी जाणला नाही.

तेव्हा राजकीय सत्ता सेवेचे साधन ठरत नाही म्हणणाऱ्याचा एक प्रकार. राजकीय सत्ता सेवेचे साधन ठरते म्हणणाऱ्यांचा दुसरा प्रकार आणि सत्ता परिवर्तनाचे साधन आहे म्हणणाऱ्याचा तिसरा प्रकार. या तीनही प्रकारात सेवा आणि परिवर्तन या दोन भिन्न जाणिवाचा भिन्न अर्थाने समावेष झालेला आहे सेवा निरपेक्ष भावनेने केली तरच ती फळते, सापेक्ष भावनेने केली तर फळत नाही म्हणतात! अर्थात सेवेकऱ्याला फळली तरी समाज व देशाला फळत नाही असा याचा अर्थ आहे सध्याच्या परिस्थितीत चटकन लक्षात येण्यासारखाही आहे परिवर्तन मात्र एका वेगळया समाजरचनेच्या भावना व कल्पनेतूनच घडवायचे असते. यादृष्टीने साम्यवादी सेवेपेक्षाही जास्त सैनिक शिस्तीतून येणाऱ्या उपक्रमशीलतेवर (रेजिमेंटेशन) भर देतात आणि राजकीय सत्तेच्या स्वभावाला (कॅरेक्टर) अनुसरूनच हे आहेही. राजकीय सत्तेचा स्वभाव जाणून घेण्यास समाजवाद्याचे आकलन कमी पडले म्हणून ते सेवा शब्दाला चिकटून राहिले. असे मात्र साम्यवाद्याचे झाले नाही. म. गाधीनी राजकीय सत्तेचे आकलन केले ते मात्र या सर्वांपेक्षा वेगळया स्वरूपाचे आहे हे जाणून घेण्यासाठी त्याचे 'हिन्द स्वराज्य' या त्याच्या पुस्तकात मूलभूत स्वरूपाचे विवेचन केलेले आहे ते प्रत्यक्षच वाचायला हवे आहे

राजकीय सत्तेचा स्वभाव लक्षात घेऊनच म. गांधीनी ससदीय लोकशाही नाकारली होती. राजकीय सत्तेचा स्वभाव शोषण *करण्याचाच असल्यामुळे स्वराज्यात ससदीय* लोकशाही निरुपयोगी आहे हे त्यांनी स्पष्टपणे म्हटलेच होते, 'पतप्रधानाशी माझे शत्रुत्व नाही; पण मी जे काही पाहिले आहे त्यावरून मी या निष्कर्षावर आलो आहे की, त्याना (पतप्रधानांना) खरे देशभक्त म्हणता येणार नाही. सर्वसामान्यपणे ज्याला लाच म्हणतात ती ते देत-घेत नाहीत. यामुळेच त्याना प्रामाणिक म्हटलेही

जाते; पण प्रशस्ती देणे आदी बाबींपासून ते वाचू शकत नाहीत आणि दुसऱ्याकडून कार्य साधवून घेण्यासाठी त्यांना पद वगैरेंच्या रूपात निश्चितच ते लाच देतात. मी उघडपणे हे म्हणू शकतो की त्यांच्यात शुद्ध भाव व खऱ्या प्रामाणिकतेचा अभाव आहे.' (हिन्द स्वराज्य, १९३८ ची आवृत्ती, सस्ता साहित्य मंडळ, दिल्ली प्रकाशन) हा एक वानगीदाखल उतारा आहे; पण अशा अनेक गोष्टी या पुस्तकात आहेत, ज्यात संसदेला वेश्यादेखील त्यांनी म्हटले होते. यावरून ते संसदीय कार्यपद्धतीचे विरोधी होते हे स्पष्टच झालेले आहे.

राजकीय सत्तेचा स्वभाव सेवेचा असूच शकत नाही म्हणून सत्ता नियंत्रणातच असायला हवी. व राज्यकारभाराच्या सत्तेला योग्य वळणावर ठेवण्यासाठी संसदबाह्य (एक्स्ट्रा पार्लमेंटरी) उपक्रमांनाच महत्त्व यायला हवे हेच त्यांना सांगायचेही होते. हे त्यांचे सांगणे आजच्या परिस्थितीच्या निकषावर योग्य ठरविता येईल किंवा नाही असा प्रश्न उपस्थित केला जाईल. तो उपस्थित करणे हा गैरप्रकार म्हणता येणार नाही. पण सत्तेचा स्वभाव हा शोषण करण्याचाच आहे व यातून सेवा घडण्याची शक्यताच नाही असे जे म. गांधी व त्यांच्या सारख्यांना वाटले होते यालाच खरे उत्तर हवे आहे. अद्याप तरी कोणीही उत्तर देऊ शकलेले नाहीत. जगाच्या व भारताच्या परिस्थितीत हे उत्तर अद्याप निपजलेलेच नाही. अर्थात या देशात व जगात कुठेही संसदीय कार्यपद्धती लोकांना लोकांचे स्वातंत्र्य अनुभवण्यास संधी उपलब्ध करून देऊ शकलेली नाही. हीच वस्तुस्थिती आहे. याउलट स्वातंत्र्याचा विशुद्ध भाव अधिकाधिक प्रमाणात विकृत करण्यास मात्र संसदीय पद्धतीने हातभारच लावला आहे असे सर्वत्र दिसते.

राजकीय सत्तेला परिवर्तनाचे साधन मानणाऱ्यांनी ज्या समाजरचनेची कल्पना केली आहे ती समाजरचना काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीला अभिप्रेत असलेल्या रचनेहून अगदीच भिन्न स्वरूपाची आहे. सत्तेला परिवर्तनाचे साधन मानणाऱ्या बोल्शेविकांनी रशियात रक्तरंजित क्रांती घडवून आणली. ती भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला मान्य झाली नाही. स्व. मानवेंद्रनाथ रॉयनी या बाबतीत म. गांधींशी वाद घातला होता; तरीही म. गांधींनी रॉयचे म्हणणे मान्य केले नव्हते–नाही. म. गांधींना रशियाच्या बोल्शेविक क्रांतीचे आकलन झाले नाही असे रॉयनी म्हटले होते. या बाबतीतले म. गांधींचे बोल्शेविक क्रांतीचे विरोधी मत खोडून काढण्यासाठी त्यांनी त्यांना सविस्तर लेखवजा पत्र लिहिले होते. (१–१–२५ 'यंग इंडिया') ते जसेच्या तसे म. गांधींनी 'यंग–इंडिया'त लेखाच्या स्वरूपात छापले होते. आणि स्वतःचा अभिप्राय दिला होता की 'जर श्री. रॉयच्या लेखात बोल्शेविझम्चे खरेखुरे चित्रण झाले असे मानले तर बोल्शेविझम् फारच सामान्य वस्तू आहे असे मला वाटते.'

स्वतःचे वेगळेपण घेऊन काँग्रेसची स्वातंत्र्य चळवळ चालली होती म्हणून तिची घडलेली संस्कृती ही बोल्शेविझम्ला मान्यता देणारी कधीच नव्हती हे उघड आहे. पण या संस्कृतीचे वेगळेपण ग्रामस्वराज्याची पूर्ती करण्यास्तव झटणारी ठरली असती तर तिचे वेगळे मूल्य प्रस्थापित झाले असते. पण हे असे घडलेले नाही. म्हणून काँग्रेसची संस्कृती बोल्शेविझम्ला पर्याय देण्यास अपात्रच ठरलीही आहे. या दृष्टीने काँग्रेस संस्कृतीचा विचार करता येण्यासारखा आहे. पण हल्ली ज्या काँग्रेस संस्कृतीचा विचार केला जात आहे ती जगजीवनरामबाबूंनी सर्वप्रथम उच्चारलेली आहे. काँग्रेस अंतर्गत सत्तासंघर्षातूनच ती उच्चारली गेलीही आहे. स्वातंत्र्य चळवळीचा नव्या समाज रचनेचा जो संकल्प होता त्याचेशी याचा दूरान्वयानेही संबंध येत नाही. पण सत्तासंघर्षातून तीव्रता वाढलीच तर, काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीचा उद्देश पूर्णतः नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. सत्तारूढ काँग्रेसचे रशियाशी जुळलेल्या नात्यामुळे याचीच लक्षणे सध्या दिसत आहेत. म्हणून सत्तारूढ काँग्रेस सैनिक शिस्त (रेजिमेंटेशन) मान्यही करील. काँग्रेस संस्कृती या पद्धतीनेच कृतार्थ होऊ इच्छिते असेच मानले जाईल !

□

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.**

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.**

ह्या ना त्या निमित्ताने

# कोणासाठी ? कशासाठी ?

फिरोझ रानडे

**'वा !'** असे सगळे कार्यक्रम भारदस्तपणे व्हायला पाहिजेत साहित्य पालखी काय, नि त्या पालखी-मिरवणुकीच्या अग्रभागी हत्ती काय, नि त्याच्यावर बसलेला पेशवाई थाटातला माहूत काय, काही विचारू नका !'

आता हे सगळे कौतुक पुण्याला परवा झालेल्या गडकरी जन्मशताब्दी सांगता सोहळयाचे होते हे वेगळे सांगायला नकोच. व वर्णन करत होते स्वातंत्र्य सैनिक बर्वे.

बर्वे नेमके त्याच दिवसात पुण्याला आपल्या मोठया चिरंजीवाकडे मुंबईत फार उकडते म्हणून चार दिवस रहायला म्हणून गेले होते. तेव्हा त्याच्या 'आँखो देखा हाल'-ला फार महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे मधेमधे बोलणारे श्याम व कामत धरून सगळे अगदी शातपणे बर्व्यांचे 'हाल' ऐकत होते. आधीच त्याना महाराष्ट्राच्या शेक्सपियरबद्दल आदर होता, त्यात महाराष्ट्राच्या सास्कृतिक राजधानीत हा कार्यक्रम झाला होता व तिसरे म्हणजे बर्व्यांनी स्वत: तो कार्यक्रम पाहिला होता. त्यामुळे त्याच्या शांतपणे ऐकून घेण्यात नवल असे काही नव्हतेच.

'असाच सकाळी ९-९॥ वाजता कार्यक्रम सुरू झाला. तो सुरू झाला सभाजी पार्क पासून. प्रथम तेथे असलेल्या गडकऱ्यांच्या अर्ध पुतळयाला जमलेल्या साहित्यिकानी व प्रतिष्ठित लोकांनी हार घातले. नतर गडकऱ्याच्या कुटुंबियांनी हार घातले.

'मग शहनाई-चौघडयाच्या मगलवाद्यात साहित्य पालखी मोठया थाटात बालगधर्व पूल, शनिवारवाडा वगैरे मार्गे कसबा पेठेत गेली.

'प्रथम म्हणे लेझिम वगैरे वाजवत मिरवणूक न्यायचा विचार होता; पण सुट्टया असल्याकारणाने तो होऊ शकला नाही. मग पालखी गडकरी जेथे रहात होते त्या घरी गेली. तेथे जे गृहस्थ सध्या रहातात त्यांनी जमलेल्या साहित्यिकाना चहा दिला.'

'सध्याकाळी महाराष्ट्राच्या लाडक्या मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत भव्य सागता सोहळा झाला.'

आतापर्यंत जमलेल्या श्रोतृवर्गाला थोडा कंटाळा येऊ लागला होता. कारण हा सगळा मजकूर त्यानी वर्तमानपत्रात वाचला होता. बर्वे त्यापेक्षा वेगळे काही सागत नव्हते.

कामत तरुण व त्यातून बँकेत काम करणारा. ह्या पैश्या-अडक्याचे व्यवहार करणाऱ्याना एक सहावी अक्कल असते. तशी ती कामतलापण होती. त्या अक्कलेनुसार त्याने डोके चालवले व विचारता झाला.

'काहो गुरूजी. नाही म्हटले तरी पुण्यालाही खूप उन असते. त्यातून ९॥-१० ची वेळ म्हणजे उन्हाची व सभाजी पार्क ते कसबा पेठ म्हणजे तसे अंतरही काही कमी नाही ह्या वयात तुम्ही एवढया उन्हात, एवढे अतर चाललात. कौतुक करण्यासारखे आहे महाराष्ट्राच्या शेक्सपियरवर तुमचे अगदी मनापासून प्रेम दिसते आहे '

'नाही, तसे माझे त्यांच्यावर प्रेम आहे, त्यांच्याबद्दल आदर आहे, पण' हे सागताना बर्व्यांचा चेहरा थोडा पडला होता. 'खरं सागायचं म्हणजे मी त्या कार्यक्रमाला काही गेलो नव्हतो. उनही खूप होते व ते अतरही फार होते.'

'मग तुमचा मुलगा गेला असेल.'

'कामत अशी अर्ध्यावर गोष्ट सोडणारा इसम नव्हता.

'नाही, त्याला व त्याच्या बायकोला कोणाकडे तरी जेवायला जायचे होते'

'मग ही माहिती तुम्ही देताय ती कशी?' राधालाही आता राहवल नाही.

'अहो मीही तुमच्यासारखे वर्तमानपत्र वाचूनच सगळे सांगतो आहे. मी कुठे म्हटले होते की मी स्वत: गेलो होतो म्हणून ? मी फक्त म्हटले की सगळे कार्यक्रम असे भारदस्त व्हायला पाहिजेत.' बर्वे शातपणे म्हणाले

'भले ! आमची चागली फिरकी घेतलीत ! हे म्हणजे ते आपल्या ना. सी. फडक्यासारखे झाले !' श्याम म्हणाला.

'ना. सी फडक्याचे असेच काय झाले हो ?' सौ. कर्व्यांनी नेहमीप्रमाणे श्यामच्या बोलण्यात रस घेतला. आता जमलेल्याचा महाराष्ट्राच्या शेक्सपियरमधला रस कमी झाला होता व कादबरी क्षेत्रातले इंग्रजीतले जे कोणी फडक्याचे तुल्यबळ असतील त्याच्यात निर्माण झाला होता.

'त्यावेळी हा टि. व्ही. वगैरे तर नव्हताच, पण आकाशवाणीवर फक्त इग्रजीतून क्रिकेटची कॉमेन्ट्री करत असत व त्यात वस्ताद होता तो पार्शी तल्यारखान ! तर हे प्रा फडके काय करत की ती इंग्रजी कॉमन्ट्री मन लावून ऐकत व आपल्या की दुसऱ्या कोणाच्या तरी वर्तमानपत्रात 'आँखो देखा हाल' म्हणून ठोकून देत असत. मॅच मुबईत वगैरे होती तोपर्यंत हे चालले होते. पण एकदा मॅच मद्रास का कलकत्त्याला होती. फडके तसे नावाजलेले लेखक त्यामुळे ते गावात आहेत हे पुष्कळ लोकाना माहीत होते. तरी दुसऱ्या दिवशी परत फडक्याचा कलकत्त्याला झालेल्या मॅचचा आँखो देखा हाल. तेव्हा कुठे ते भाडे फुटले ! तेव्हासुद्धा फडके हेच म्हणाले होते की मी कुठे म्हटले होते की मी स्वत: मॅच पाहिली आहे म्हणून ?' श्यामने आपल्याला माहीत असलेली ऐतिहासिक माहिती दिली

आता बर्व्यांचा चेहरा खूपच पडला. त्याना उत्तेजन द्यावे म्हणून कर्व्यांनी विचारले की, 'ते सकाळच्या कार्यक्रमाचे ठीक आहे पण सध्याकाळी गेला असाल ना ? तो तर थडगार बालगधर्वमध्ये होता ना ?'

'त्याला आपले वसतदादा मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते ना !' बर्व्यांना थोडा धीर आला होता

'मग त्याला काय झाले ? वसतदादा मुख्य पाहुणे असले तर ?' राधाला बर्व्यांची वसंतदादा मुख्य पाहुणे असण्यातली अडचण कळली नाही. 'असे केलेत तर तुम्हाला ८०

टक्के सरकारी कार्यक्रमाना हजर रहाता यायचे नाही. आजकाल बहुतेक कार्यक्रमांना दादा हजर असतातच.'

हा मुद्दा बहुतेकांना पटला. तो चटकन पटण्याइतकाच स्पष्ट होता.

'तुम्हा लोकांचं ठीक आहे हो !' बर्वे पुढे म्हणाले, 'तुम्हाला दादा असले तरी जाता येतं. मला तसं करता येत नाही.'

'पण का ?' परत राधा.

'अहो स्वातंत्र्ययुद्धात मी आणि दादा बरोबर होतो, अगदी एका तुरुंगात, अगदी एका बराकीत ! आता दादांनी मला पाहिलं, ओळखल आणि स्टेजवर आपल्या शेजारी बसा म्हणाले म्हणजे ? म्हणून मी दादा असतील त्या कार्यक्रमांना जात नाही.'

'किती भोळा जीव !' श्याम मनाशीच म्हणाला, 'दादा आणि मंडळी जर स्वातंत्र्ययुद्धातल्या, त्यांच्याबरोबर तुरुंगात असलेल्या त्यांच्याबरोबर बराकीत असलेल्यांना ओळख दाखवत राहिले असते तर काय पाहिजे होते? सगळे चित्रच बदलले असते.'

आता काही वेळ शांतता पसरली.

'पण गडकऱ्यांचे भाषेवरचे प्रभुत्व मान्य केले पाहिजे.' सगळे शांत आहेत तेव्हा कर्व्यांना कंठ फुटला ! 'त्यांच्या भाषेची जी उत्तुंग भरारी असते ती बघितली की माणूस अगदी चाट पडतो.'

'कोणते नाटक पाहिलेत तुम्ही ?' कामत आणि कर्वे ह्यांचे विळ्या–भोपळ्या इतके सख्य होते. 'आणि कुठे ? शिवाजी मंदिरात, दिनानाथला की रवीन्द्रला ?'

'म्हणजे मी सांगतो ते खोटं असतं का ?' कर्वे चिडून म्हणाले 'मी गडकऱ्यांचे 'भावबंधन' पाहिले. तेही ह्या श्यामरावांच्या घरी दूरदर्शनवर ! अगदी एकटा असून सुद्धा !'

हे मात्र खरे होते. श्यामच्या मुलांचा त्या नाटकातला रस पहिल्या पाच–दहा मिनिटातच गेला. त्याच्या नंतरच्या पाच–दहा मिनिटात श्याम–राधाचा गेला. आजकाल कोणी कानडी असे राहिले नाहीत की विसरभोळ्या माणसाला पोलिस असा दम देत नाहीत किंवा त्याच्याकडून काही कबुली–जबाब लिहून घेत नाहीत. थोडक्यात मजा वाटावी असे त्या नाटकात काही नव्हते.

'आणि हे लोक नुसती वाक्यच्या वाक्य म्हणताहेत, ॲक्टिंग नावाची गोष्टच नाही.' श्यामचा थोरला मुलगा म्हणाला व तरातरा घराबाहेर निघून गेला.

त्याला ते शक्य होते पण कर्वे घरीच येऊन बसल्यामुळे श्यामला घरी थांबणे भाग होते एवढेच नव्हे तर मधून मधून पहावे लागत होते.

'मी सांगतो तुम्हाला' कामत जास्त स्पष्टवक्ता होता. 'दहा टक्के लोकांनी काही हे नाटक पाहिलं नसेल !'

'मग तुमचे म्हणणे काय आहे ? गडकऱ्यांच्या जन्मशताब्दीला राजेश खन्नाचा सिनेमा दाखवायला हवा होता का ?' राधा चिडून म्हणाली. तिलाही शेक्सपियरबद्दल फार आदर होता.

'नाही, नाही, अगदी राजेश खन्नाचा सिनेमा कशाला ? पण अगदी गडकऱ्यांच जुनी व कालबाह्य नाटक दाखवण्याचा खटाटोप कशासाठी ? व कुणासाठी ? जर सर्वसामान्य माणसाला त्यात जर रस नसेल तर ते न दाखवणेच योग्य. गडकऱ्यांबद्दल आदर दाखवणं म्हणजे त्यांची नाटके करणे असाच नाही.'

'मग ?' परत राधा.

'अरे काही बंगाली नाटके दाखवा. कन्नड रंगभूमी किती पुढे चालली आहे. तो गिरीश कर्नाड बघा काय छान छान नाटकं लिहितो, त्याची मराठी भाषांतरं करा ! गडकरी स्वतःच कलावंत होते. त्यांच्या आत्म्याला ह्यानेच आनंद होईल.'

कामतचे म्हणणे बरोबर असो की चूक असो. मराठी मनाला ते पटणे शक्य नव्हते व तेथे जमलेले सगळे मराठी असल्यामुळे त्यांना कामतचे म्हणणे भावले नाही. टिळकांच्या पुण्यतिथीला टिळकांवरच, आगरकरांच्या पुण्यतिथीला आगरकरांवरच भाषणं झाली पाहिजेत ही कल्पना आपल्यात इतकी रूजली आहे की त्यातून सुटका नाही.

'पण वसंतदादांनी एक लाख रुपयांचे बक्षिस जाहीर करून फार मौज आणली' बर्वे परत कौतुकाने बोलू लागले होते.

'ते काही एक लाख रुपयांचे बक्षिस नाही आहे' राधाने ती बातमी पक्केपणी वाचली होती. 'सरकार फक्त १ लाख रुपयांची ठेव ठेवणार व त्यातून आलेल्या व्याजातून हे १० एक हजाराचे बक्षिस दिले जाणार आहे.'

हे ऐकून कामतच्या मनात काही वेगळाच विचार आला. त्या विचारात तो म्हणाला, 'काहो ? पुण्याला जमलेल्यातल्या बहुतेक साहित्यिकांनी सरकारची लुडबूड नको म्हणून वेगळे साहित्य संमेलन भरवले होते ना ?'

'हो, हो, काही जणांनी एवढेच नाही तर सरकारी बक्षिसं नाकारली होती'

'काही स्वाभिमान बक्षिसे पण ह्या लोकांनी देऊ केली होती नाही !'

एकेकाला तीन–चार वर्षापूर्वीचा इतिहास आठवू लागला.

'आणि आता ह्या लोकांनी बक्षिस द्या म्हणून सरकारकडे मागणी करावी ना ?'

'म्हणजे राजसंन्यास लिहिणाऱ्या गडकरींच्या जन्मशताब्दीला आम्ही केलं काय ? तर आम्ही अजुनी बाकी सगळे संन्यास घेतले असले तरी अजुनी बक्षिस संन्यास काही घेतला नाही. आणि मुंग्यांनी मेरू पर्वत गिळला तरी आमची बक्षिसाची लालच काही गिळली जाणार नाही.'

अर्थात हे श्यामच बोलला होता.

□

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# बिनभिंतीची हॉटेलं

हॉटेलच्या भिंती झुगारून आज आपण रस्त्यावर आलो आहोत. ड्रीम दिव्याच्या बदिस्त हॉटेलापेक्षा गर्दीस्त रस्त्यावरच्या स्टॉलसमोर टाकलेल्या खुर्च्यांवर बसून चमचमीत डिशेस् चाखायला आपल्याला अधिक सुखद वाटू लागलं आहे. मुख्यत: पुणे-मुंबईकराच्या मनातलं हे फिलिंग ओळखून केटरर लोकानी मोक्याच्या जागी धडाधड स्टॉल्स टाकायला सुरुवात केली आहे. महापालिकेच्या दैनदिन कामकाजाच्या अॅजेंडामध्ये वारंवार अतर्भूत होण्याइतपत खाद्यपदार्थांच्या आणि एकूणच स्टॉल्सचे प्रकरण नागरिकाच्या आणि नगरसेवकाच्या जिव्हाळ्याचे झाले आहे. हॉटेलमालकाच्या तर तोंडच पाणी पळाल आहे आता, अगदी नजिकच्या काळात या व्यवसायापासून हॉटेलमालकाना धोका नसला तरी आत्ताच्याच गतीनं स्टॉल्सची सख्या आणि लोकाच बाहेर खाण्याच फॅड वाढायला लागलं तर अजून काही वर्षांनी हॉटेलवाल्याना आपल्या हॉटेलच्या भिंती पाडून त्याला स्टॉलचे स्वरूप देण्याची शक्यता अगदीच नाकारता येण्याजोगी नाही! पूर्वी रस्त्यावर खाण वगैरे कमीपणाच मानण्यात यायच. आज तेच उच्चभ्रूपणाच द्योतक झालं आहे.

या एकदम आलेल्या लाटेबद्दल 'रामप्रसाद स्नॅक्स बार'चे चालक श्री. संजय फोफलिया म्हणाले, 'कुठलाही नवा पदार्थ बाजारात आला की तो एकदम चढतो किंवा साफ पडतो 'पावभाजी' हा असा चढलेला पदार्थ. त्यातलं अमूल बटरच अस्तित्व, दर्जा साभाळून आणलेला चविष्टपणा, भेसळीनं बेजार झालेल्या शहरी लोकांना भावला. मग एका वेगळ्याच सेटअपमध्ये म्हणजे रस्त्यावर,चौपाटीवर वगैरे जेव्हा तो देण्यात यायला लागला तेव्हा तर तो फारच लोकप्रिय झाला. अजून पाच वर्ष तरी पावभाजीच्या लोकप्रियतेला ओहोटी लागण शक्य नाही.'

नटराज टॉकीजसमोरच्या अॅड. पानसेंच्या बगल्याच्या आवारात उभा असलेला श्री. दत्तात्रय चोरगे याचा साईप्रसाद पावभाजी, ज्यूस बार हा डेक्कन परिसरातील त्यातल्या त्यात जंगी स्टॉल! श्री चोरगे या लाटेबद्दल म्हणाले, '१९७८ पासून मुबईवरून ही लाट पुण्याला येऊन थडकली आहे. आज तर लाटेन इतकी उची गाठलीय की कित्येक लोकाना पावभाजी खाल्ल्याशिवाय रात्री झोपच येत नाही.'

वरील व्यवसायाच्या मुख्य प्रवाहात असणाऱ्या दोन्ही व्यावसायिकाची प्रतिक्रिया या व्यवसायाची लोकप्रियता दाखवायला पुरेशी समर्थ आहे.

पावभाजी किंवा इतर खाद्यपदार्थांची विक्री करणारा स्टॉल साधारणपणे सध्याकाळी पाचला उघडतो. त्याआधी तास-दीड तास स्टॉलच्या कामगाराना पूर्वकामासाठी याव लागतं सध्याकाळी सहा ते रात्री नऊ हा या धद्याचा पीक पॉइंट असतो. या वेळात रूचिपालट म्हणून खाणाऱ्या हौशी मडळीची हजेरी लागते. रात्री नऊनंतर मग ठराविक ग्राहकांच्या आगमनाला सुरुवात होते. पुन्हा साफसफाई करून स्टॉलला कुलुप लावेपर्यंत रात्रीचे तीन वाजलेले असतात. असा हा जागरणाचा व्यवसाय आहे. जागरणामुळे कामगार मिळायला मोठे सायास पडतात. स्टॉलच्या व्याप्तीप्रमाणे कामगार आणि आचारी याच्या सख्येत बदल होतो. एखादा छोटेखानी स्टॉल दोन आचारी आणि चार हरकाम्या नोकरांसह सहज चालू शकतो. परतु स्टॉल अगदीच मोठा असेल तर कमीतकमी पाच आचारी आणि दहा ते पधरा नोकरांचा लवाजमा मालकाला बाळगावा लागतो. सामान्यत: स्टॉलचा मालक हाच नोकराच्या जेवण्या-खाण्याची आणि राहण्याची (म्हणजे स्टॉलच्या बाकड्यावर अग पसरायची) व्यवस्था करतो. अन्न आणि निवारा या दोन मोठ्या समस्या सोडवल्यामुळे नोकरही पाच ते दहा रुपयाच्या रोजगारीवर काम करायला राजी होतात. आचाऱ्याचे वेतन मात्र महिन्याला ठराविक असते. हाताला चागली चव असणारे आचारी मिळणं ही महाकठीण बाब होऊन बसली आहे. त्यामुळे साहजिकच एकदा का चागला आचारी मिळाला की त्याला टिकवण्यासाठी मालक जागरूक राहतात.

स्टॉलसाठी जागा मिळविणे ही सोपी गोष्ट नव्हे. रहदारीला अडथळा येणार नाही, पदार्थ अगदीच उघड्यावर दिले जाणार नाहीत, त्या जागी इतर स्टॉल्स द्यावे लागणार नाहीत अशा नाना गोष्टींची खात्री करून मगच स्टॉलसाठी परवानगी मिळू शकते. परवानगीसाठीही महानगरपालिकेचा उबरठा अनेकदा झिजवावा लागतो. त्यातून एखाद्या पदसिद्ध नगरसेवकाची ओळख निघाली तर फारच चागले! मग कामाला वेग तरी येतो वारवार खेटे घाला किंवा ओळख काढा, 'वजन' वापरल्याशिवाय स्टॉलची कामे होतच नाहीत असा अनेकाचा अनुभव आहे

रस्त्यावर इतर दिसणाऱ्या खोक्यापेक्षा खाद्यपदार्थांच्या स्टॉलला जागा नेहमीपेक्षा जास्त लागते. ते एक भिंत नसलेले हॉटेलच असते हॉटेलातील स्वच्छतेची पाहणी करून म. न. पा. चे आरोग्यखाते हॉटेलला विशिष्ट दर्जा देते. पण खाद्यपदार्थांच्या स्टॉलची पाहणी मात्र आरोग्य खात्याकडून करण्यात येत नाही कारण कायद्यात तशी तरतूद नाही! हॉटेल एवढाच तेजीत चालणारा हा व्यवसाय किती स्वच्छतापूर्वक केला जातो हे पाहण्याची जबाबदारी आरोग्यखात्याने घ्यायला हवी. कारण नागरिकाच्या आरोग्याशी प्रत्यक्ष सबधित असा हा प्रश्न आहे.

पुण्याच्या रस्त्यारस्त्यावर स्टॉलचं पीक पेरल गेलंय. मोठ्या रस्त्यावर ते आपल्याला जाणवत नाही. पण या रस्त्याबाजूच्या गल्लीबोळात अनेक व्यावसायिक आपल बस्तान व्यवस्थित बसवून आहेत. स्टॉलला मिळणारा परवाना हा विशिष्ट जागेपुरताच मर्यादित असतो; पण स्टॉलवाले त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून बिधोकपणे खुर्च्या बाहेर टाकतात. हे सगळं नाईलाजापोटी असत. कारण स्टॉलवाल्याना हॉटेलच्या स्पर्धेत टिकायच असतं, ग्राहकाना जास्तीतजास्त सुविधा देऊन त्यांना आपल्याकडे खेचायच असत. परतु हे सर्व जरी मान्य केले, तरी रहदारीला होणाऱ्या अडथळ्याकडे आप-

त्याला डोळेझाक करता यायची नाही. अतिक्रमण खातही या सगळ्याच प्रकाराकडं अगदी 'कॅज्युअली' बघतं. केव्हातरी महिन्या चार महिन्यातून अतिक्रमणाची गाडी अवतरते आणि दर स्टॉलमधून चार-पाच खुर्च्या जप्त करून घेऊन जाते. मग काय जी दंडाची रक्कम असेल ती भरून खुर्च्या परत आणल्या की पुन्हा चार महिन्यांची निश्चिती !

उन्हाळा आणि हिवाळा हे ऋतु स्टॉलवाल्याना भरपूर गल्ला मिळवून देतात. त्यातल्या त्यात उन्हाळ्यात तर या व्यावसायिकांना बोलण्याची देखील फुरसद नसते. पावसाळा हा मात्र या धंद्याचा ग्लॅग पिरिएड असतो. या ऋतूत इतर ऋतुंच्या तुलनेत अगदी नगण्य धंदा होतो. ज्यांचे स्टॉल जरा आडोशाला वसले आहेत ते ताडपत्री वगैरे टाकून बसण्याची पर्यायी व्यवस्था तरी करू शकतात; परंतु ज्यांचे स्टॉल थेट रस्त्यालाच भिडले आहेत त्यांना बाहेर खुर्च्याही टाकता येत नाहीत. मग नुसता स्टॉल उघडून 'पार्सल ऑर्डर्स' स्वीकारण्यातच त्याना समाधान मानावं लागतं.

स्टॉल्सचं प्रकरण आता राजकारणात मोडायला लागलं आहे म. न. पा. नी स्टॉल्सना परवानगी देण अशत: बंद करून टाकलं आहे. कारण धंद्याला सोयीस्कर पण रहदारीला अडथळा होणार नाही अशा जागा पुण्यात शोधून सापडेनाश्या झाल्या आहेत. ही बातमी ऐकून हॉटेलवाल्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला असेल !

—मिलिंद संगोराम

---

सांस्कृतिक डोंबिवली

---

# बहरलेला वसंतोत्सव

---

पुणे, पार्ले आणि डोंबिवली अशी नावे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी घेतली तर आता कोणालाच नवल वाटणार नाही. पावसाळ्याचे तीन महिने वगळले तर डोंबिवलीत होणाऱ्या कार्यक्रमांची सख्या, ह्या दोन शहरात होणाऱ्या कार्यक्रमापेक्षा निश्चितच कमी नाही. वाटेत उपयोगी पडावी म्हणून तहानलाडूंची भूकलाडूची शिदोरी घेतो किंवा वाळवटात प्रवास करताना उट भरपूर पाणी पिऊन घेतो त्याप्रमाणे डोंबिवली कर परीक्षा सपल्यानतर आणि जलधारानी तुबलेल्या गटारांनी आणि खंडित झालेल्या वीजप्रवाहानी जीवन बदिस्त होण्याअगोदर अनेक कार्यक्रम आखतो, भाग घेतो, तृप्त होतो. अर्थात ह्या शहराला धर्मशाळेची, घराला रात्रीच्या वेळी डोके टेकण्याच्या जागेची अवकळा आणणाऱ्यांची सख्या काही कमी नाही. ती दिसामासानी, सिमेंटच्या चार-चार मजली सागाड्यानिशी वाढत आहे असे उपरे किती आणि सर्वत्र धोधावणारे डास किती हा एक न सुटणारा आणि स्वतत्र अभ्यासाचा, लेखाचा विषय आहे

काय झाले आहे ते कळत नाही. पण ह्या नगरीत व्याख्यानमालाचे मूळ रुजत नाही, वाढत नाही आणि फोफावत नाही. व्याख्याने फुकट ऐकायला हवीत आणि भरपूर मानधन मिळाल्याशिवाय एकही नामवत व्याख्यानाला यावयाला तयार नाही. अगदी सत्काराला सुद्धा 'मानधन इतके इतके देणार असाल तर येतो' असेही म्हणणारे ग्रामस्थ साहित्यिक आहेत. त्यात हॉलचे भाडे, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर, प्रसिद्धी, हारतुरे इ. चा वाढता खर्च. त्यामुळे हजार दोन हजाराचा खर्च करण्यास कोणतीच सस्था तयार नाही तसा एक धाडसी प्रयत्न टिळक नगर विद्या मदिराचे उत्साही साहित्यप्रेमी अध्यक्ष श्री. बापूसाहेब जपे व डोंबिवली साहित्यसभेच्या अध्यक्ष, कथाकार सौ. विनीता ऐनापुरे ह्यानी ह्या दोन सस्थाच्या वतीने सुरू झाला आहे. तूर्त तीन व्याख्याने करण्यावरच त्यांनी समाधान मानले आहे ह्या वर्षी सौ. सिंधू डोंगरे, श्री. आत्माराम भेंडे व 'शतायुषी'चे डॉ. संगमनेरकर ह्याची व्याख्याने—भेंडे मुलाखत — झाली.

महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्हायोलीन वादक, गायक आणि आचार्य श्री. गजाननबुवा जोशी ह्यांच्या वयाला पचाहत्तर वर्षे झाली म्हणून 'शिवानंद प्रतिष्ठान'ने एक सगीतोत्सव साजरा केला श्री. जोशी व पं राम मराठे ह्यांचा सत्कारही करण्यात आला डॉ. अशोक रानडे ह्यांच्यासारखा सगीतज्ञ आणि दिलखुलास वक्ता, त्याला जोड मिळाली एका 'चौफेर' सपादकांची, श्री. माधवराव गडकरी ह्यांची. संगीताची आणि वक्तृत्वाची मेजवानी ह्या सत्कार समारंभामुळे मिळाली.

श्री. मधुकर जुवेकर हे डोंबिवलीतील एक उत्साही साहित्यसेवक, कै पु. भा भावे ह्याचे निस्सीम भक्त. ते कवी म्हणून गावात परिचित आहेतच. गावातील साहित्यसभा, काव्यरसिक मडळ, सारख्या संस्थेचे ते क्रियाशील कार्यकर्तेही आहेत. त्यांच्या 'पायवाट' ह्या पहिल्या वहिल्या काव्यसग्रहाचे प्रकाशन त्याचे वरिष्ठ अधिकारी कल्याण महानगरपालिकेचे आयुक्त आणि इंग्रजी सस्कृत अभिजात साहित्याचे व्यासंगी श्री भालचद्र अभ्यंकर ह्यांच्या हस्ते झाले. दोन कवी एकत्र येत नाहीत. आले तर स्वत:ची कविता किंवा मोठेपण ऐकविण्यासाठी एकत्र येतात असे मानले जाते. पण श्री जुवेकराना शुभेच्छा देण्यासाठी, त्याचे कौतुक करण्यासाठी, पाठीवर आपुलकीची थाप मारण्यासाठी अनेक कवी, प्रथितयश लेखक उपस्थित होते. 'कविता दशकाची'चे, 'प्राक्तनाचे संदर्भ'चे, आजचे जानेमाने, 'सत्यकथे'चे मानकरी कवी श्री. द. भा. धामणस्कर ह्यानी वडिलकीच्या नात्याने श्री. जुवेकराचे कौतुक केले. काव्याचे विविध प्रकार हाताळणारे, त्याच्याकडे लक्ष ठेवावे, भविष्यकाळातील एक आघाडीचे कवी व लेखक असे प्रा. प्रवीण दवणे ह्यानी आपल्या काव्यात्म भाषणाने श्री जुवेकराची 'पायवाट' प्रकाशित केली. श्री शशिकात कर्डेकरानी आपल्या भाषणात मैत्रीचा, आत्मियतेचा सूर भरला. श्री श्रीकात पावगी ह्यानी नेमकेपणाने कार्यक्रमाचे सूत्र साभाळले. विकास सास्कृतिक केंद्र व विकास वाचनालय (ग्रथाली केंद्र) ह्यानी पुढाकार घेऊन हा प्रकाशनाचा कार्यक्रम यशस्वी केला.

एप्रिल महिन्यापासून सुरू झालेला हा वसंतोत्सव ऐन भरात आलेला आहे पुस्तक प्रदर्शने, छायाचित्र प्रदर्शने अशा अनेकविध कार्यक्रमानी शहर कसे गाजते आहे उणीव कार्यक्रमाची, कार्यकर्त्यांची वा रसिकाची नाही. आहे ती नाणेटचाई निधी कसा जमवावा त्याचीच चिंता कार्यकर्त्यांना भेडसावते. त्यावर मात कशी करणार, हे सास्कृतिक विश्व त्यामुळे झाकोळले जाणार की गैर मार्गाने पैसे गोळा करणाऱ्याच्या दावणीला बाधले जाणार ?

—चंद्रशेखर राजे



# हिंदुस्थान एकात्म कसा राहील ?

● श्री. ग. माजगावकर ●

'वेगळं व्हायचंय मला' हा गेल्या दहा–वीस वर्षात सर्वत्र उमटत असलेला निनाद आहे. ज्यांच्यापासून सर्व जगाने लोकशाही, राष्ट्रवाद यांचे धडे घेतले ते फ्रान्स-इंग्लंडसारखे विज्ञानात, आर्थिक प्रगतीत, राजकीय अनुभवात किंवा सामाजिक अनुशासनात खूप पुढे असलेले देशही अशा वेगळेपणा जोपासणाऱ्या, मूळ केंद्रापासून अलग होऊ पाहणाऱ्या चळवळींपासून मुक्त नाहीत. उत्तर आयर्लंडचा प्रश्न आपल्या पंजाबच्या प्रश्नाप्रमाणेच इंग्लंडला गेली अनेक वर्षे भेडसावतो आहे. १९७० नंतरच्या काळात, गेल्या दहा-पंधरा वर्षात या एका समस्येपायी जवळजवळ दोन हजार माणसे मृत्युमुखी पडलेली आहेत. काही काळापूर्वी इंग्लंडच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर आयरिश दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या एका बाँबहल्ल्यातून कशाबशा बचावल्या, यावरून उत्तर आयर्लंडची वेगळे होण्याची,आपले स्वतंत्र अस्तित्व राखण्याचीमागणी अद्याप किती कडवी आहे हे ध्यानात येते. आयर्लंडचा प्रश्न सोडा. स्कॉटलंड, वेल्स यांचे ग्रेट ब्रिटनशी झालेले एकीकरण तर पक्के समजायला हवे की नको ? पण ७/८ वर्षांपूर्वीच स्कॉटिश नॅशनल पार्टी या पक्षाने एडिंबरो येथे वेगळे सरकार, वेगळे पार्लमेंट स्थापन करण्याचा कार्यक्रम जाहीर केला होता. वेल्सच्या राष्ट्रवादी मंडळींना तर 'वेल्स' हे नावही पसंत नाही. 'सिम्रा' (Cymra) ला पूर्ण स्वातंत्र्य हवे अशी त्यांची मागणी आहे. 'सिम्रा' हे वेल्सचे जुने नाव आहे. वेल्समधील डोंगराळ भागातील अनेक खडकांवर, दऱ्यापाषाणांवर 'इंग्लिश गो होम' अशा घोषणा लिहिलेल्या आढळतात, असे एका अभ्यासकाने नमूद केले आहे. (Nationalism in Contemporary Europe-Franjo Tudjman; 1981; p. 75 ) 'Out with the French' अशी नेपोलियनची जन्मभूमी असलेल्या कॉर्सिकातील एका नव्या चळवळीची घोषणा आहे आणि फ्रान्सपासून, पॅरीस येथील केंद्रसत्तेपासून फुटून निघू पाहणाऱ्या या चळवळीचे, ती करणाऱ्या संघटनेचे नाव आहे– 'Movement for the Liberarion from France.' या संघटनेने फ्रेंच नागरिकांवर काही सशस्त्र हल्ले चढवल्याने पॅरीस येथील फ्रेंच मध्यवर्ती सरकारने या संघटनेवर सध्या बंदीही घातलेली आहे. फ्रेंच–जर्मन सरहद्दीवरील अलसॅक आणि लॉरेन प्रांतातही फुटीर चळवळी अस्तित्वात आहेत. आर्थिक मागासलेपण–विषमता यातून अशा चळवळी उगम पावतात हेही तितकेसे खरे नाही. स्पेनमध्ये 'बास्क' हा एक पुढारलेला भाग आहे आणि तोच गेली कित्येक वर्षे माद्रिद येथील केंद्रसत्तेपासून फुटून निघू पाहतो आहे. फ्रॅन्कोने ही फुटीर चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला पण त्याला यश लाभले नाही. 'बास्क (Basque) होमलॅंड अँड फ्रीडम (ETA)' असे ही चळवळ करणाऱ्या संघटनेचे नाव आहे व शेजारच्या फ्रान्समधील, लागून असलेला काही मुलुख व स्पेनमधील हा बास्क प्रदेश मिळून एका नवीनच राष्ट्र–राज्याची निर्मिती व्हावी अशी या संघटनेतील कडव्या लोकांची मागणी आहे. आठ–दहा वर्षांपूर्वी या बास्कभूमीचा स्वतंत्र ध्वज उभारला गेला व माद्रिदमध्ये फ्रॅन्कोनंतर आलेल्या नव्या राजवटीने या वेगळ्या ध्वजाला मान्यताही दिली आहे.

भांडवलशाही व्यवस्था किंवा लोकशाही असलेल्या देशातच हे विभक्ततेचे प्रवाह आहेत असे नाही. स्टॅलिनच्या काळापासून युक्रेनियन राष्ट्रवाद रशियात वरचेवर उफाळून येत आहे व आजही तो विशाल रशियन राष्ट्रवादात, लाल साम्राज्यात पूर्णपणे मिळून–मिसळून गेला आहे, अशी स्थिती नाही. पूर्वी तो दडपून टाकला गेला; सध्या रशियनांची संख्या या भागात वाढवून तो आटोक्यात ठेवला जात असतो. युगोस्लाव्हियात सर्बियन आणि क्रोएशिअन लोकसमूह यांच्यात, एकराज्य असूनही, ते समाजवादी–साम्यवादी राज्य असूनही, एकात्मता नाही व सर्बियाच्या वर्चस्वातून सुटका करून घेण्याची

क्रोएशिअन्सची सतत धडपड चालू असते. चीनने तिबेटचा प्रश्न कसा सोडवला हे जगजाहीरच आहे.

## इतिहास काय दाखवतो ?

तेव्हा देश समाजवादी असो की भांडवलशाही असो, राजवट लोकशाही असो की हुकुमशाही, 'वेगळं व्हायचय मला' ही प्रवृत्ती सर्वत्र आहे व 'हिंदुस्थान एकात्म कसा राहील' हा किंवा अशा स्वरूपाचे प्रश्न फक्त आपल्यासमोरच नाहीत. अनेक देशाना अशा प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. शिखांच्या चळवळीमुळे, खलिस्तानच्या मागणीमुळे हा प्रश्न सध्या आपल्याकडे अधिक उग्र बनलेला आहे हे खरे; पण गेल्याच दशकात आपल्या राष्ट्रीय एकात्मतेला दक्षिणेकडून आव्हान मिळालेले नव्हते का ? तामिळनाडूतील द्राविड पक्षाने अण्णा दुराईंच्या काळात भारतापासून चक्क फुटून निघण्याची मागणी केली होती. अनुभवाती पुढे त्यांनी ही मागणी सोडून दिली. पण हिंदी भाषेचा स्वीकार करण्यास आजही तामिळनाडू तयार नाही. 'ऑल इंडिया रेडियो' ऐवजी 'आकाशवाणी' हा केवळ शब्द-बदल केलेलाही त्याना मानवत नाही. तामिळनाडूची जागा आता 'तेलगु देसम्' घेऊ पहात आहे. राज्याना अधिक स्वायत्तता हवी अशी तेलगु देसमची मागणी आहे व बंगाल, काश्मिर या राज्याची मदत घेऊन ही मागणी आणखी पुढे रेटण्याचा निश्चय तेलगु देसमचे एकमेव नेते, आंध्राचे मुख्यमंत्री एन्. टी. रामाराव यानी प्रकट केलेला आहे आसाम सध्या थंड आहे; पण तेथेही मुख्यमंत्री सैकिया आसामी आणि बिगरआसामी यांच्यात फूट पाडू शकलेले आहेत. या फुटीमुळे आसाम भारताचा अविभाज्य भाग राहावा, परकीय घुसखोरांनी आसाम बळकावू नये म्हणून चाललेल्या विद्यार्थी आंदोलनाची खूपच हानीही झालेली आहे. नागांचा प्रश्न तर जुनाच आहे.

प्रश्न असा पडतो की, खरोखर पूर्वी आपण कधी काळी एक होतो का ? हिंदुस्थान एकात्म रहावा अशी आपली जी अपेक्षा आहे तिला काही ऐतिहासिक आधार-पार्श्वभूमी आहे का ?

इतिहास अगदी स्पष्टपणे सांगतो की, धार्मिक-सांस्कृतिक एकात्मता आपल्याकडे खूप होती; राजकीय एकात्मता जवळजवळ नव्हतीच. आज जसे काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून प्राग्ज्योतिषपुरापर्यंत भारताचे सार्वभौम व स्वतंत्र संघराज्य अस्तित्वात आहे तसे पूर्वी कधीही नव्हते. ही देणगी नवकीच आपल्याला ब्रिटिश अमदानीकडून मिळालेली आहे. मराठे, शीख, मोगल, दक्षिणेकडील त्याही पूर्वीची राजघराणी सबंध देशावर आपली एकछत्री राजवट स्थापन करू शकलेली नव्हती. अगदी अशोकाचे साम्राज्यही सध्याच्या भारतीय संघराज्यापेक्षा क्षेत्रफळाने कमीच होते. दक्षिणेकडील पुष्कळ भागाचा या साम्राज्यात समावेश झालेला नव्हता. या उलट अशोकाची मुलगी संघमित्रा बौद्धधर्मप्रचारासाठी थेट श्रीलंकेपर्यंत पोहचली होती व बुद्धापूर्वी आजच्या अफगाणिस्तानातही वैदिक धर्माचा प्रभाव होता. अशी व्यापक व विशाल धार्मिक-सांस्कृतिक एकात्मता असली तर राजकीय एकात्मता उत्पन्न होतेच असे इतिहास काही सांगत नाही; तसेच इतिहास असेहो सांगत नाही की, राजकीय एकात्मता ही धार्मिक-सांस्कृतिक एकात्मता आणण्यासाठी आवश्यक पूर्वशर्त आहे राष्ट्र वेगळे आणि राज्य वेगळे राष्ट्र-राज्य ही संकल्पना अलिकडची, एकोणिसाव्या शतकातली, युरोपातील विशिष्ट परिस्थितीमुळे आकारास आलेली आहे. सध्या आपल्याकडे राजकीय एकात्मता आहे लोकांनी बहुमताने निवडून दिलेले सरकार दिल्लीत कारभार करीत आहे तरी आसाम-पंजाब वेगळा होतो की काय अशी सर्वांना धास्ती वाटतच आहे. याउलट पारतंत्र्यकाळात, राजकीय एकात्मता नसताना, सारा देश ब्रिटिशांविरुद्ध एकत्र आला होता. स्वातंत्र्य आंदोलनाच्या ज्वाला साऱ्या देशभर पसरल्या होत्या. भिन्नभिन्न काळात एकात्मता भिन्नभिन्न कारणास्तव टिकून राहते. जुन्या काळात ज्या घटकामुळे एकात्मता टिकली ते घटक आज किंवा उद्या महत्त्वाचे, निर्णायक ठरतीलच असे नाही. एकात्मता म्हणजे काही बँकेतली एखादी ठेव नाही; एकदा ठेवली की बघायला नको, व्याज फक्त घेत रहायचे, अशी ही काही एखादी संचितावस्था नाही. तो एक प्रवाह आहे, प्रवास आहे. प्रवासात अडथळे येतात, कधीकधी वाट चुकते. पण पुढे जाण्याचे उद्दिष्ट व ते गाठण्याची प्रेरणा असेल तर चुकलेली वाट सुधारूनही घेता येते पूर्वी एकात्मतेची एक आदर्श स्थिती होती आणि त्या स्थितीकडे आपल्याला परत जायचे आहे, अशी परंपरावाद्याची भूमिका म्हणूनच जशीच्या तशी स्वीकारता येत नाही. याउलट पूर्वी येथे एकात्मता वगैरे काही नव्हते, ब्रिटिशांनी हा देश एक केला-येथे राष्ट्रवाद रूजवला, पूर्वीचा आपला सगळा इतिहास राजेरजवाडयाच्या लढायानी व परकीयानी केलेल्या आपल्या पराभवानीच काय तो नुसता भरलेला आहे, हिंदू परंपरा म्हणजे फक्त जातीभेद आणि विषमता- ही नवतावाद्यांची भूमिकाही अगदीच एकांगी म्हणून अल्प प्रमाणातच खरी आहे. या तथाकथित क्रांतीवादी किंवा केवळ परंपरावादी दृष्टिकोनातून आपल्या एकात्मतेच्या प्रश्नाकडे म्हणूनच पाहून चालणार नाही. दृष्टिकोन उत्क्रांतीवादी हवा. जुन्या काळी धर्मकल्पनेने आपले ऐक्य टिकवले, हे खरे आहे. याचा अर्थ आपण धार्मिक पुनरुज्जीवनवाद स्वीकारावा, धर्माचे विनाकारण अवडंबर माजवावे, धर्मभावनेचा उदोउदो करीत बसावे असा नाही. धर्माला सतत विरोधच केला पाहिजे, धर्म म्हणजे बुरसटलेपणा असा नकारात्मक दृष्टिकोनही बरोबर नाही. धर्माइतकेच महत्त्व आज आर्थिक-सांस्कृतिक घटकाना आलेले आहे. या घटकाचा विचार न करून कसे चालेल ? 'हिंदुस्थान एकात्म कसा राहील ?' या प्रश्नाचे उत्तर आपण या तीन दृष्टिकोनापैकी कोणता दृष्टिकोन स्वीकारतो यावर बरेचसे अवलंबून आहे. उत्क्रांतीवादी दृष्टिकोन स्वीकारणे सर्वांत चांगले.

असा विकासवादी, उत्क्रांतीवादी दृष्टिकोन एकदा स्वीकारला की धार्मिक बंधुभाव अपरिहार्य ठरतो हा धार्मिक बंधुभाव कॉंग्रेसप्रणीत सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्षता यापेक्षा अगदी वेगळा आहे. कॉंग्रेसप्रणीत सर्वधर्मसमभाव हा अनैतिहासिक आहे, नकारात्मक आहे. इतिहासात जर आपल्याला ढळढळितपणे दिसते आहे की, सगळे धर्म परस्पराशी भांडलेले आहेत, काही धर्म तुलनेने अधिक सहिष्णू व उदार आहेत तर काही आक्रमक व अत्याचारी आहेत, तर सर्वधर्मसमभाव म्हणून सगळ्यांना एका पोतडीत घालणे, सगळ्याना आम्ही सारखे वागवू म्हणणे केवळ चुकीचेच नाही तर सहिष्णुतेचे प्रमाण अधिक असणाऱ्या धर्मावर अन्याय करणारे आहे. प्रत्येक धर्मात बंधुभाव वाढविणारा जो सत्वांश असेल तो ग्राह्य मानण्याची वास्तववादी व विधायक दृष्टी ठेवली पाहिजे. बंधुत्व-

विरोधी जो भाग किंवा शिकवण असेल ती उघडपणे नाकारली गेली पाहिजे. मुसलमानी धर्म परंपरेने आक्रमक आहे धर्मप्रसाराबरोबर इस्लाममध्ये राज्यप्रसारही अवश्य येतो. इस्लामी नसलेल्या राज्याचें इस्लामी राज्यात रूपांतर करण्याची शिकवण हा धर्म आजतागायत देत आला आहे. यासाठी सामदामदंडभेदादी सर्व उपाय या धर्माला मजूर आहेत. मुसलमानातील विस्तारवाद, फुटीरतावाद त्याच्यातल्या धर्मवादाशी असा मुळापासून जोडला गेलेला आहे. या उलट हिंदू धर्माची स्थिती आहे. राज्य आणि धर्म आपण वेगळे मानले. धर्मप्रसारासाठी आक्रमणे केली नाहीत शस्त्रबळाचा वापर करून दुसऱ्यावर आपला धर्म लादला नाही. दुबळेपणामुळे हे घडले, धर्मासाठी आपण शस्त्र हाती घेऊच शकलो नाही, हे तितकेसे खरे नाही. शंकराचार्यांच्या काळात कुठे दुबळेपणा होता? पण केवळ बौद्धिक–आत्मिक बळावर जो काय धर्मप्रसार करायचा तो शकराचार्यांनी केला धर्म आणि राज्य यांची गल्लत प्रथम आपल्याकडे बौद्धानी केली व बुद्धधर्म हिंदुस्थानातून लुप्त होण्याचे हे एक कारणही मानले जाते. ख्रिश्चन धर्मप्रसारही पूर्वी शस्त्रबळावर झालेला आहे अलीकडे सेवा–शिक्षण या मार्गांचा वापर अधिक होत आहे. अशी जोवर भिन्नभिन्न धर्मांची भिन्नभिन्न ठेवण व शिकवण आहे तोवर सर्वधर्म समभाव हे तत्त्व व्यवहारात येणेही शक्य नाही व योग्यही नाही अर्नेस्ट रेगन हा एक फ्रेंच पडित राष्ट्रवाद या विषयावर हा एक अधिकारी मानला जातो. याने लिहिले आहे– 'The essence of a Nation is that all the individuals have many things in common and also that all have forgotten a good many things.' याचा अर्थ एकात्मतानिर्मितीसाठी काही इतिहास आपण विसरला पाहिजे हे खरे; पण कोणता विसरायचा आणि कोणता लक्षात ठेवायचा हे विवेकानेच नीट ठरवले पाहिजे. टिपू सुलतानाचे स्मारक करावे अशी एक मागणी काही दिवसांपूर्वी मालेगावमधून पुढे आली. आता १९६५ मधील भारत–पाक युद्धाच्या वेळी ज्याच्या प्राणांचे बलिदान झाले त्या अब्दुल हमीदचे स्मारक व्हावे असे कोणी म्हटले तर ते योग्यच आहे; पण टिपूचे स्मारक आज कशासाठी? तो इंग्रजांविरुद्ध लढला हे खरे आहे; पण त्याने हिंदूंची कत्तल केली हे खोटे आहे का? आज टिपू स्मारकाची ही मागणी मान्य करणे किंवा तिला पाठिंबा दाखवणे म्हणजे मुस्लिम समाजात अगोदरच असलेल्या अलगतावादाला खतपाणी घालणे होय. म्हणून अशा स्वरूपाच्या मागण्याना मुळापासूनच विरोध केला पाहिजे. पण सेंट झेव्हियरचा उत्सव गोव्यात होतो. अगदी खरे आहे की, या व्यक्तीने धर्मप्रसारासाठी हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले; पण आज झेव्हियरचा उत्सव साजरा करणाऱ्यांमध्ये ही हिंदूवर अत्याचार करण्याची जुनी भावना जाणवत नाही, आक्रमकतेला, अलगतेला खतपाणी घालणारी एखादी मागणी, चळवळ या उत्सवाशी जोडली गेलेली दिसत नाही. तेव्हा हिंदूनीही या किंवा अशा परधर्मीय उत्सवाकडे सतत संशयाने, विरोधीभावनेने पाहणे उचित ठरणार नाही उलट श्रीरामजन्मभूमी किंवा श्रीकृष्णजन्मभूमी याबाबत जो वाद निर्माण झालेला आहे त्या प्रकरणी हिंदूंनीच नाही तर मुस्लिम–ख्रिश्चन धर्मबांधवांनीही भारतीय संस्कृतीच्या या मानबिंदूचे संरक्षण करण्यास, त्यांची प्रतिष्ठा जपण्यास पुढे यायला हवे. सरदार वल्लभभाई पटेल कॉंग्रेसपरंपरेतले असूनही सोरटी सोमनाथ मंदिराची पुनर्संस्थापना करतात, मग आजच्या राज्यकर्त्यांना श्रीराम व श्रीकृष्ण यांची जन्मभूमी 'मुक्त' करण्यास, ती ज्यांची त्यांना देण्यास सकोच का वाटावा? सोमनाथ जीर्णोद्धार प्रसंगीही स्वतःला सेक्युलरवादी म्हणवणाऱ्या मंडळींनी नाके मुरडलीच होती. पण शेकडा ऐंशी टक्के असणाऱ्या हिंदूना आपल्यावरील एक धार्मिक–राजकीय पराभवाचा जुना कलंक, निदान प्रतीकात्मकरीत्या तरी पुसला गेला असे या सोमनाथ पुनर्संस्थापनासोहोळ्यामुळे वाटले, एक प्रकारचे मानसिक समाधान लाभले, यातून बधुभावविरोधी अशी कुठलीही प्रेरणा जोपासली गेली नाही, त्यामुळे अशी नाके कितीही मुरडली गेली तरी त्याकडे लक्ष देण्याचे आपल्याला कारण नाही. विद्वान वैदिकाचे सत्कार होतात म्हणूनही नकारात्मक सेक्युलरवादी मडळी आरडाओरड करीत असतात. खर म्हणजे सर्व धर्मातील सुयोग्य पडिताचा–विद्वानाचाही असा गौरव व्हायला हवा. बधुभाव अशामुळे उलट वाढतच राहतो. महाराष्ट्रराज्य स्थापनेच्या वेळी सर्व धर्मांचे स्वस्तिमंत्र म्हटले गेले. कुठलेच मंत्र न म्हणता अगदी कोरडा शासकीय कार्यक्रमही तेव्हा करता आला असता पण माणूस केवळ बुद्धीवर–तर्कावर जगू शकत नाही. त्याला मंत्रही लागतात, त्यांच्या श्रवणाने त्यांच्या चित्तवृत्तीत बदल होतात, त्या अशा समारंभप्रसंगी जरा फुलूनही येतात, वातावरणही थोडे प्रसंगाला साजेसे प्रसन्न व गंभीर होऊ शकते. असे जर आहे, माणसाला जर बुद्धीबरोबर भावनाही आहेत तर एका धर्मातीलच मंत्र म्हणण्यापेक्षा सर्व धर्मातील प्रसंगोचित मंत्र म्हणण्याची पद्धत केव्हाही चांगली–कारण धर्मभावना एवीतेवी सुटत नाहीच! मग बधुभाव वाढविणारा त्या त्या धर्मातला जो चांगला भाग असेल त्याला उघडपणे शासकीय मान्यता–पुरस्कार द्यायला काय हरकत आहे? म्हणून सर्वधर्मसमभाव या नकारवादी, निष्क्रिय व खोट्या तटस्थतावादी तत्त्वाऐवजी सर्वधर्मबंधुभाव हे विधायक तत्त्व आपण स्वीकारले पाहिजे. ज्यांनी ज्यांनी गेल्या शतकापासून या राष्ट्राच्या एकात्मतेची जडणघडण केली त्या सर्वांनी धर्माला आंधळा विरोधही केला नाही व खोट्या धार्मिकतेला प्रोत्साहनही दिले नाही. धर्माकडे या सर्वांनी विधायक व नैतिक दृष्टिकोनातूनच पाहिले. हिंदी राष्ट्रवादाचे, भारतीय उदारमतवादाचे जनक म्हणून न्या. महादेव गोविंद रानडे यांच्यापासून अगदी डॉ. आंबेडकर, स्वा. सावरकर यांच्यापर्यंत ही धर्मविवेकाची परंपरा दाखवता येईल. DAV कॉलेज, लाहोर येथे १८९३ मध्ये केलेल्या एका भाषणात न्या. रानडे यांनी म्हटलेले आहे:

I am here . speaking as e representative of no particular Samaj, but as a member of the great Hindoo community which peoples this land and forms one-sixth of the human race. The true test of progress

**न्या. रानडे ते आंबेडकर-सावरकर... परंपरा धर्मविवेकाची-विरोधाची नाही.**

must be seen in signs which show that this vast mass of humanity is being vivified by the sacred fire which burns only to purify and elevate.' लोकसंख्येच्या दृष्टीने जगाचा एकषष्ठांश असलेल्या या विशाल हिंदुधर्मीय समाजाला सचेतन करणे हीच प्रगतीची मुख्य खूण म्हणून न्या. रानडे यांनी येथे सांगितली त्याचे समकालीन म. फुले यांनी तर नवा धर्मच स्थापन केला. टिळकांच्या भूमिकेत मुळीच संदिग्धता नव्हती. 'हिंदुत्वाचा योग्य अभिमान बाळगून, त्याच्या अभ्युदयाकरिता निष्काम बुद्धीने आपला देह झिजवणे हे कोल्हापूरकर महाराजांचे कुलव्रत आहे.' असे त्यांनी शाहू छत्रपती करवीर संस्थानचे राजे झाले तेव्हा त्यांचे स्वागत करताना केसरीतील अग्रलेखात म्हटलेलेच आहे. गणेशोत्सव, शिवाजी उत्सव या चळवळी सुरू करताना आपल्याला कोणी धार्मिक म्हणेल अशी त्यांना मुळीच भीती-शंका वाटलेली दिसत नाही. आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा उघडच स्वीकार केला, सावरकरांनीही मूळ धर्मभावना न दुखावता फक्त दुष्ट रूढीवर हल्ला चढवला. योगी अरविंद घ्या, म. गांधी घ्या किंवा डॉ. हेडगेवार घ्या. सर्वांनी सुधारित धर्मभावनेच्या आधारावरच आपापल्या चळवळी केल्या, संघटना बांधल्या. एकात्मता साधायची, राष्ट्रीय असायचे म्हणजे हिंदुत्व दडवायचे ही प्रवृत्ती १९२० नंतरच्या राजकारणात आली. सर्वधर्मसमभाव हा या प्रवृत्तीचाच नवा अवतार आहे यात एक प्रकारचा तिऱ्हाईतपणा आहे; धर्मापासून लांब पळून जाण्याची धडपड आहे. पण ती यशस्वी होणार नाही; कारण आजही बहुसंख्य जनता, मग ती हिंदू असो, की मुस्लिम-ख्रिश्चन-शीख-बौद्ध कोणत्याही धर्माची-पंथाची असो, धार्मिक प्रवृत्तीचीच आहे. उजळ व विधायक मार्गांनी ही प्रवृत्ती व्यक्त होऊ दिली गेली नाही तर विकृत मार्गांनी तिचे स्फोट घडत राहतील. म्हणून विवेक हवा, सावधानपणा हवा-जो आपल्या बहुसंख्य नेत्यांनी यापूर्वी आपल्या विचारातून, आचरणातून दाखवलेला आहे या सर्वांच्या शिकवणुकीतून सर्वधर्मबंधुभाव निष्पन्न होतो. सर्वधर्मसमभाव नव्हे. यापुढच्या वाटचालीतही आपल्याला सर्वधर्मसमभाव या दिखाऊ, वरवरच्या राजकीय भूमिकेपेक्षा अंतःकरणपूर्वक स्वीकारलेली सर्वधर्मबंधुभावाची विधायक व सावध भूमिकाच उपयुक्त ठरणार आहे. बंधुभाव वाढविणारे सण-समारंभ, सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रम यांना विशिष्ट मर्यादेत उघड वाव मिळावा. सर्वच धर्मातल्या हानीकारक रूढीविरुद्ध-समजअपसमजाविरुद्ध संयुक्त चळवळी व्हाव्यात. मग ती चळवळ हिंदू धर्मातल्या हुंडा चालीविरुद्ध असो की, मुस्लिम धर्मातल्या तलाक प्रथेविरुद्ध असो. कॉमन सिव्हिल कोड हवा ही मागणी आता सर्वचजण करीत आहेत एका देशात दोन कायदे ही विसंगतीच आहे ही जितक्या लवकर दूर होईल तितकी चांगलीच. धर्माला योग्य वागणूक दिली गेली नाही तर चुकीच्या धर्मभावनेपुढे असे लोटांगण घालावे लागते. सर्वधर्मबंधुभावाचे तत्त्व हाच अशा परिस्थितीतून बाहेर पडण्याचा समंजस व सुसंस्कृत मार्ग आहे. जे ज्याचे आहे ते त्याला द्यावे-सिझरचे सिझरला, ख्रिस्ताचे ख्रिस्ताला !

¤

जाताजाता: टिळकांना 'असंतोषाचे जनक' ही सार्थ पदवी देणाऱ्या व्हॅलंटाईन चिरोलचे एक निरीक्षण : 'ह्या एकराष्ट्रियत्वाच्या कल्पनेचे बीज हिंदूंच्या धर्मग्रंथरूपी मंजुषेत होते...हिंदुस्थान देशावर शंभर वर्षे राज्य करूनही इंग्रजांना हिंदुधर्माच्या चिवटपणाचे रहस्य अजून समजले नाही. हिंदुस्थानच्या सामाजिक व धार्मिक घटनेत जरी पुष्कळ दोष असले तरी त्यांची घटना अशी काही मनोज्ञ आहे की, त्यामुळेच हिंदुधर्माला आज हजारो वर्षे हजारो प्रकारच्या झुंजा खेळूनही सत्व राखिता आले. (पहा- हिंदूंच्या अवनतीची मीमांसा- पं. रघुनाथशास्त्री कोकजे, प्रथमावृत्ती-१९४४, पृ. १८१)

¤

आपल्या आधुनिक राष्ट्रजीवनाची जडणघडण करणाऱ्या थोर नेत्यांपैकी भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले यांनी मात्र या हिंदूंच्या धर्मग्रंथरूपी मंजुषेकडे जराही वळून पाहिले नाही. गोखल्यांचे चरित्रकार कै. न र फाटक यांनी लिहिले आहे- 'त्यांनी आपण हिंदू असल्याच्या भावनेचेदेखील आपल्या विचारप्रणालीतून उच्चाटन केले होते.'

## भारतसेवक गोखले आणि हिंदू-मुस्लिम प्रश्न

पण असे गोखले जेव्हा हिंदू-मुसलमानांच्या प्रश्नाचा विचार करतात तेव्हा सत्यर्षाचा सर्व पूर्वेतिहास त्यांना आठवावा लागतो व ते हिंदूंची बाजू घेऊन म्हणतात :' ज्यांना हिंदुस्थानबद्दल जिव्हाळा नाही त्यांना, ज्यांना जिव्हाळा आहे त्याहून जास्त प्रतिनिधित्व द्यावे, ही विचित्र मागणी आहे.' (-४ जुलै १९०९ या दिवशी पुण्याच्या डेक्कन सभेपुढे केलेले भाषण.) म्हणजे हिंदूंना मुसलमानांपेक्षा या देशाविषयी जास्त जिव्हाळा आहे हे त्यांनाही गतेतिहास व प्रचलित राजकारण यावरून दिसून आले; फक्त या वस्तुस्थितीवरून निघणारा तर्कसंगत निष्कर्ष त्यांनी काढला नाही. ज्यांना जिव्हाळा आहे त्यांचेच संघटन होऊ शकते. म्हणून हिंदुत्वाचा विचार नंतरच्या काळात वेगळा पुढे आला. हिंदुत्वाचा विचार म्हणजे मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्माचा द्वेष नाही. अगदी रा. स्व. संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांनीही अशी प्रतिक्रियात्मक भूमिका त्याज्यच मानली आहे. १९४० मधील, म्हणजे शेवटी शेवटी केलेल्या एका भाषणात त्यांनी म्हटले आहे : 'परकीय सत्ता आपल्यावर आक्रमण करीत आहेत म्हणून हे (संघ) कार्य करावयाचे, हा विचार बाजूला ठेवा. खाकसार वाढायला लागले म्हणूनच जर आपण वाढू लागलो, तर ते बंद झाले म्हणजे आपणासही बंद व्हावे लागेल. आपले कार्य प्रतिक्रियात्मक नाही ..संकट उत्पन्न होते म्हणून संघटना वाढवू नका, तर संकटे उत्पन्न होऊ नयेत म्हणून खटपट करा.' सावरकरांचा पुण्यभूसिद्धांत आणि हेडगेवारांचे हे विधायक हिंदूसंघटन यात खूपच साम्य आहे धर्मसंस्कृती हा आपल्या एकात्मतेचा पाया आहे. हा पाया होता म्हणून आपण आजवर एक देश म्हणून टिकून राहिलो ही ऐतिहासिक वस्तुस्थिती, कोणाच्याही रागालोभाची पर्वा न करता, भीडभाड न ठेवता स्पष्टपणे येथे मांडली गेली आहे. हा वारसा नाकारून किंवा सर्वधर्मसमभाव म्हणून त्याच्याकडे तिऱ्हाईतासारखे-परकेपणाने पाहून कसे चालेल? काही स्वीकारून, काही विसरून जाऊनच पुढची वाटचाल केली पाहिजे. सर्वधर्मबंधुभाव ही या स्वीकारा-नकारामागील दृष्टी असावी. धर्म एकात्मतेच्या आड येत नाही. तुम्ही धर्माचा अर्थ काय करता, कोणती तत्त्वे धर्मातून सांगता हे महत्त्वाचे आहे. बंधुभावाचे तत्त्व धर्माने सांगितले तर धर्माशी एकात्मतावाद्यांना वैर करण्याचे कारणच काय ?

□

धर्म हा आजवरच्या आपल्या सामूहिक व वैयक्तिक जीवनाचा प्रधान घटक असल्याने व यापुढेही तो बराच काळ प्रधान रहाणार असल्याने, येथवर या घटकाचा, या घटकाकडे नव्या दृष्टिकोनातून कसे पाहिले पाहिजे याचा विचार केला; पण नवे घटकही महत्त्वाचे आहेत. या घटकाकडे दुर्लक्ष झाले तर आपण एकात्म राहिलो तरी समर्थ होणार नाही, जागतिक स्पर्धेत आपली सतत पिछेहाटच होत राहील. समता आणि आर्थिक विकास या घटकाचा विचार म्हणूनच धर्म या घटकाइतकाच महत्त्वाचा मानला पाहिजे रशियन राज्यक्रांतीने समता हे मूल्य आता सर्व जगभर स्थिरपद केलेले आहे. त्याचप्रमाणे वाढते जीवनमान हे एक नवेच मूल्य अमेरिकेच्या अभूतपूर्व भौतिक सपन्नतेमुळे सर्वत्र मान्यता पावत आहे. या दोन्ही मूल्यांची योग्य ती सागड घालूनच आपल्याला यापुढची एकात्मतेकडची वाटचाल करावी लागणार आहे. समानतायुक्त आर्थिक विकास हे या पुढच्या वाटचालीचे सूत्र असायला हवे. नाहीतर धार्मिक सघर्ष कमी होतील आणि आर्थिक–राजकीय वाढलेले दिसतील. स्वातंत्र्यानतर आपल्याकडे आर्थिक विकास अजिबात झालेला नाही, श्रीमंत अधिक श्रीमंत झाले, गरिबांची गरिबी वाढली असे नेहमी म्हटले जाते. आकडेवारी काहीही असली तरी डोळ्यांना दिसणारे दृश्य वेगळे आहे. श्रीमंत अधिक श्रीमत झालेही असतील पण गरिबाची परिस्थितीही सुधारलेली दिसते. गरीब आणि श्रीमंत, शहरे आणि ग्रामीण भाग यातली तफावत वाढते आहे, विरोधाभास अधिक तीव्र बनले आहेत, ही मात्र वस्तुस्थिती आहे ही तफावत कशी कमी करायची, विकास आणि समानता याची सागड घालणारे नियोजन कसे आखायचे, अंमलात आणायचे हा एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. ही तफावत वाढत गेली, श्रीमंत आणि गरीब, खेडी आणि शहरे यात फार अतर पडले तर ही विषमता, हे अंतर वर्गविग्रहाला चालना देणारे ठरेल व देशाची एकात्मता यामुळे नक्कीच धोक्यात येईल. सामाजिक विषमता कमी होत आहे, अस्पृश्यतेविरुद्धचे युद्ध आपण पुष्कळ प्रमाणात जिंकत आणले आहे. ज्या जिद्दीने यापूर्वीच्या आपल्या नेत्यांनी अस्पृश्यता–सामाजिक विषमता याविरुद्ध चळवळी केल्या, तशीच जिद्द यापुढे आर्थिक समानतेसाठी दाखवली गेली पाहिजे. आर्थिक विषमता वाढत गेली की परदेशी शक्ती, पैसा, भांडवल याचा प्रभाव वाढत जातो. तिसऱ्या जगतातील अनेक देश अशा प्रभावापासून स्वतःला वाचवू शकलेले नाहीत, त्याचे राजकीय स्वातंत्र्यही केवळ नाममात्रच उरलेले आहे आफ्रिकेत काय चालले आहे ? जुन्या वसाहतवादी जोखडातून हे देश मुक्त झाले; पण पुन्हा नव्या वसाहतवादाच्या भक्ष्यस्थानी पडले आपापसात त्याची युद्धे सुरूच आहेत, अराजके माजतच असतात. एकात्मता टिकवायची असेल तर राजकीय स्वातत्र्याला स्वावलबी व समानतायुक्त आर्थिक विकासाची जोड अवश्य दिली पाहिजे. भरमसाठ परकीय कर्ज घऊन कुठलाही देश स्वतत्र व एकात्म राहिलेला नाही अशा परकीय कर्जापाठोपाठ परकीय सत्ता यणारच. तेव्हा अनावश्यक परकीय कर्जाच्या विळख्यातून हा देश लवकर बाहेर कसा पडेल हे पाहिले पाहिजे. नेहमी कर्जे म्हटली की, अमेरिका–रशिया हे बडे देशच आपल्या डोळ्यासमोर येतात; पण आता पूर्वेकडून जपान, व्हिएतनाम, चीन हीही राष्ट्रे पुढे सरसावत आहेत भाडवलशाही आकसत आहे व मालाला गिऱ्हाईक नाही. हिंदुस्थानची खुली बाजारपेठ कब्जात आणण्यासाठी या सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत. आपल्याला या देशाचा माल विकत घेता यावा म्हणून कर्जेही दिली जात आहेत. यामुळे आर्थिक बजबजपुरी, चलनवाढ आणि बेसुमार महागाई होणार हे उघड आहे. नेहमी असे दिसते की, हिंदू-मुस्लिम किंवा हिंदू-ख्रिश्चन यांच्यातील धार्मिक सघर्षाचा जे विचार करतात ते या आर्थिक सघर्षाकडे पुरेसे लक्ष देत नाहीत. जे या आर्थिक संघर्षावर भर देतात त्याचे धार्मिक सघर्षाकडे दुर्लक्ष होते हिंदुस्थान एकात्म रहायचा, समर्थ आणि स्वतंत्र देश म्हणून ओळखला जायचा तर, असा एकाच बाजूने विचार करून चालणार नाही. धर्माधर्मातले, जातीजातीतले ताणतणाव–सघर्ष हे जेवढे एकात्मतेचे शत्रू आहेत, तेवढेच शत्रुपण विषमतेला, ती वाढवणाऱ्या आर्थिक व्यवस्थेला दिले पाहिजे. श्रीलंकेची अर्थव्यवस्था प्रथम ब्रिटिशाच्या ताब्यात होती नंतर अमेरिकेने प्रवेश केला आज अशी स्थिती आहे की, तामिळ प्रश्न हा अंतर्गत प्रश्न असूनही अमेरिकेशी सल्लामसलत केल्याशिवाय श्रीलंकेला हा प्रश्न स्वतंत्रपणे सोडवता येऊ शकत नाही. पाकिस्तानची अवस्था अशीच आहे. केवळ आर्थिक विकास एवढेच या देशांनी आपल्यासमोरील उद्दिष्ट ठेवले. स्वावलंबन, समता यावर पुरेसा भर दिला नाही. त्यामुळे परकीयाचे हस्तक्षेप वाढले, राजकीय स्वातंत्र्यावर बधने आली. हे देश लहान आहेत, आपला देश प्रचड आहे, आपल्याकडे असे काही घडणार नाही असा खोटा आशावाद बाळगण्यात अर्थ नाही देश ब्रिटिशांनी जिंकला, १५० वर्षे त्यावर राज्य केले तेव्हा तो मोठाच होता. बड्या परदेशी सत्ताच्या कारवायानी जर्जर झालेले आफ्रिकेतील काही देश आपल्याहीपेक्षा मोठे आहेत. तेव्हा वेळ गेलेली नाही तोवरच या आर्थिक स्वावलबन–विकास–समता या त्रिसूत्रीकडे आपण लक्ष पुरवायला हवे धार्मिक बंधुभाव जितका महत्त्वाचा तितकीच ही अर्थकारणाची त्रिसूत्रीही महत्त्वाची. यात डाव्या–उजव्याचा वाद निरर्थक आहे.

□

असा वाद टाळला, विकास आणि समता यांची योग्य ती सांगड आपण घालू शकलो तरी पुढचा प्रवास सुरळीत होईलच असे सागवत नाही दारिद्र्याचे जसे प्रश्न असतात तसे श्रीमतीचे, विकसित अवस्थेचेही प्रश्न असतात. पंजाब आज धुमसतो आहे तो गरिबीमुळे, आर्थिक विषमतेमुळे नाही पजाबने स्वकष्टाने समृद्धी आणि विकास प्राप्त करून घेतलेला आहे; पण विकास आला की त्यापाठोपाठ सत्ताही हवी असते. यात गैरही काही नाही. सध्या राज्याराज्यातून जी स्वायत्ततेची मागणी पुढे येत आहे तिच्यामागे, विकासाची काही प्रमाणात यशस्वी वाटचाल, हेही एक कारण आहे ओरिसा राज्यातून अशी मागणी अद्याप पुढे आलेली नाही पजाब–बगाल–तामिळनाडू, आंध्रप्रदेश ही राज्ये या स्वायत्तता चळवळीत अग्रभागी आहेत, कारण इतराच्या मानाने या राज्याचा विकास थोडा अधिक झालेला

आहे. पंजाबचा प्रश्न इतरांपेक्षा आणखीनच गंभीर होण्याचे कारण म्हणजे अर्थकारणाला येथे धर्मकारणाचीही साथ लाभलेली आहे. एकात्म भारत म्हणजे सर्वाधिकारसंपन्न केंद्रसत्ता असलेला भारत ही समजूत ब्रिटिशांच्या उदाहरणावरून आपण करून घेतली. पण अधिकाधिक स्वायत्तता राज्यांना देऊनही केंद्र बळकट राहू शकते. शेवटी एकात्मतेचा आपला नमुना कोणता हा प्रश्न आहे. राज्ये दुबळी किंवा दिल्लीवरच सर्वस्वी अवलंबून राहणारी असतील तर दिल्ली कोसळली की देशही आपोआप कोमळणारच. शिवाय जेवढे केंद्रीकरण अधिक तेवढा भ्रष्टाचार, दिरंगाई अधिक हाही नियमच आहे तेव्हा यापुढच्या काळात संघराज्यपद्धतीप्रमाणे जेवढी आर्थिक-राजकीय सत्ता राज्यांना–प्रांतांना देता येणे शक्य आहे तेवढी देण्याचे केंद्रशासनाचे धोरण असायला हवे. शिखांच्या धार्मिक मागण्या आपण मान्य केल्याच आहेत. त्यांना भारतांतर्गत अधिक स्वायत्तता हवी आहे ही स्वायत्तता फुटीरतेकडेच नेणारी आहे असे आपण समजून का चालावे ? तेलगु देसमचे नेते, आंध्राचे मुख्यमंत्री एन्. टी. रामाराव अधिक स्वायत्ततेची मागणी करतात म्हणून भारतनिष्ठ नाहीत, किंवा त्यांची भारतनिष्ठा कमी आहे असे आपण कोणत्या तोंडाने म्हणू शकतो ? भारतीय एकात्मतेवर त्यांचीही श्रद्धा आहे आणि आंध्राला, इतर राज्यांना केंद्राकडून अधिक अधिकार हवेत अशीही त्यांची मागणी आहे. या दोन्ही प्रवृत्ती नेहमी परस्परविरोधीच असतील असे मानण्याचे काही कारण नाही. इतिहासात काही वेळा, काही ठिकाणी बळकट केंद्र प्रथम अस्तित्वात आले, या बळकट केंद्रसत्तेमुळे वेगवेगळे भूभाग परस्परांशी जोडले जाऊन एकात्म राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. इंग्लंड, फ्रान्स ही अशा स्वरूपाच्या प्रक्रियेची ठळक उदाहरणे. अमेरिकेची प्रक्रिया नेमकी याउलट आहे. केंद्र हळूहळू तेथे मजबूत होत गेले. एकेक राज्य आपापल्या सोयीप्रमाणे, इच्छेप्रमाणे केंद्रसत्तेत सहभागी झाले, सामील झाले. एकात्मता सक्तीने लादता येत नाही. रशियात बळकट केंद्र आहे. केंद्रसत्तेविरुद्ध तेथे अधूनमधून उठाव–चळवळी होतच असतात. पण राज्यांना भरपूर स्वायत्तता देऊनही अमेरिकेत अशा फुटीर चळवळी कमीच आहेत. निग्रोंचा प्रश्न अगदी वेगळा आहे– वंशवाद या प्रश्नाच्या मुळाशी आहे. आपणही ब्रिटन–फ्रान्स–रशिया याच देशांचे नमुने डोळ्यासमोर ठेवण्याचा हट्ट धरू नये. आपल्याकडे विविधता खूप. उत्तर–दक्षिण भेद आहेतच; भाषा भिन्न, धर्म अनेक. तेव्हा स्वायत्ततावादाला विघटन विभाजनवादाचे वळण लागण्यापूर्वीच आपण दिल्लीला जाग आणली पाहिजे, तेथे झालेले सत्तेचे अतिरिक्त केंद्रीकरण कमी केले पाहिजे. बिरबलाच्या खिचडीच्या हंडीप्रमाणे एकात्मता नुसती दिल्लीत उंचावर टांगलेली असून काय उपयोग ?

☐

केंद्रसत्ता आणि विविध राज्ये यांच्यात योग्य तो समतोल आणला, धार्मिक बंधुभाव राखला, समतायुक्त आर्थिक विकास साधला, सामाजिक विषमता कमी केली तरी सर्व देशापुढे एखादे समान उद्दिष्ट नसेल, काही समान सांस्कृतिक आदर्श नसतील तर विस्कळीतपणा, विघटनवादही राहणारच. हे सर्व घटक नसतानाही आपण आजवर टिकून राहिलो, कारण असे काही सांस्कृतिक आदर्श या देशासमोर होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही या आदर्शांची जोपासना करणारी असंख्य नररत्ने या भूमीत निर्माण झाली. 'संतो तपसा भूमीं धारयन्ति' असे वेदवचन आहे. याचा अर्थ त्यागपरायण ऋषीमुनींनी, संतमहंतांनी समाजधारणा केली, विशिष्ट आदर्शांचे, मूल्यांचे पालन करून सर्वत्र समान असे सांस्कृतिक जीवन निर्माण केले. आपण टिकून राहिलो आणि आपल्या बरोबरच्या अनेक संस्कृती-देश लयाला गेले याचे महत्त्वाचे कारण, मानवी जीवनाबद्दल आपला काही विशिष्ट दृष्टिकोन आहे व आपला असाही विश्वास आहे की, इतर संस्कृती, इतर धर्म, देश यांच्यापेक्षा हा दृष्टिकोन वेगळा आहे, वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा दृष्टिकोण कोणता ? इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे असे मानणाऱ्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी तो या शब्दात विशद केला आहे. रानडे म्हणतात : परंतु आपल्या राष्ट्राचे वळण जर पाहिले, तर ते अगदी निराळे असल्याचे दिसून येईल. मनुष्याजवळ जो काही अर्थसंचय असेल ती त्याची खरी संपत्ती नव्हे, त्याच्या आत्म्याची उन्नती, किंवा उन्नतीची शक्यता, हीच त्याची खरी संपत्ती हा दृढ विश्वास आपल्या राष्ट्राच्या इतिहासाचे विशेष लक्षण आहे; ही दृढ श्रद्धाच आपले भूषण आहे व सोसलेल्या दुःखांचे आपणास मिळालेले फल आहे. आजपर्यंत भरतखंडाने हेच तत्त्व शिकविले व कालाच्या अखेरपर्यंत हेच तत्त्व (तो) प्रतिपादित राहील.' (न्या. रानडे यांची मराठी व्याख्याने; १९०२; पृष्ठ ३८४) म्हणजे आपल्याजवळ इतरांना देण्यासारखे काही आहे, जागतिक संस्कृतीत आपणही काही मोलाची भर घालू शकतो अशी श्रद्धा असल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येत नाही. ही श्रद्धा फक्त पोकळ आणि श्रेष्ठत्वाच्या गंडाने डागळलेली नसावी. पण अशी श्रद्धा असावी ही लागतेच आणि आपल्या आधुनिक नेत्यांपैकी बहुतेकांजवळ अशी श्रद्धा होती. मग हे नेते राजकारणात वावरणारे असोत की, त्यांनी धर्मकारण केले असो.


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

या सर्वांच्या अंतर्यामी असलेल्या या श्रद्धेचे स्वरूपही ढोबळ मानाने सारखेच असावे, हाही काही निव्वळ योगायोग नाही रानडे असोत की राधाकृष्णन असोत, टिळकांचा निष्काम कर्मयोग असो की गांधी-जींचा अनासक्तीयोग असो; अगदी इहवादी-विज्ञानवादी असणारे सावरकरदेखील हिंदुध्वजावर कृपाणाबरोबर कुंडलिनीची स्थापना कशासाठी करतात ? नेहरू तसे धर्माशी फटकूनच राहिलेले त्यांच्या-वर ब्रिटिश उदारमतवादी परंपरेचा, फेबियन समाजवादाचा प्रभाव होता हे सगळ्यांना ठाऊक आहे पुढे गांधी-टागोरांचाही त्यांच्यावर प्रभाव पडला; पण नेहरूंवर विवेकानंदांचाही प्रभाव होता, आणि तो त्यांनी उघडपणे मान्यही केलेला आहे, हे कितीजणांना ठाऊक आहे ? Dietmar Rothermund या जर्मन लेखकाचे The Phases of Indian Nationalism या नावाचे पुस्तक अलिकडेच (१९७०) प्रसिद्ध झाले आहे त्यात एके ठिकाणी (पृ. ७८) त्याने अशी नोंद करून ठेवलेली आहे – 'Nehru emphasized his indebtedness to Vivekanand in an interview with the author on 31st January 1962' आणि विवेकानंदांनी कुठला आदर्श या देशासमोर ठेवला हे सर्वांनाच माहीत आहे तो आहे मानवमुक्तीचा, ऐहिकाची उपेक्षा न करता आध्यात्मिक विकास मानवाने कसा साधावा हे त्यांनी सांगितले, आचरणाने दाखवून दिले आणि हीच परंपरा शेकडो साधक, हजारो कार्यकर्ते देशभर पुढे नेत आहेत. भौतिक आणि आत्मिक विकासाची सांगड घालू पाहणारे अनेक प्रकल्प देशात ठिकठिकाणी उभे करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. उपक्रम लहान आहे की मोठा, कार्यकर्ते या पक्षाचे आहेत की त्या पक्षाचे, याला फारसे महत्त्व नाही. अखंड व एकात्म भारतावर या सर्वांची श्रद्धा आहे, मधल्या काळात आलेली मरगळ, पराभूतपणाचे सावट झटकून टाकून पुन्हा नव्या जोमाने अशी कार्ये देशातल्या विविध भागात उभी रहात आहेत, हे महत्त्वाचे कुणी आंतरभारतीचे काम केले काय किंवा कुणी कन्याकुमारीच्या विवेकानंद केंद्रातर्फे अरुणाचल विभागात शाळा चालवल्या काय, 'हिंदुस्थान एकात्म कसा राहील ?' या प्रश्नाचे उत्तर अशांचो संख्या किती आहे, ती वाढती आहे की कमी होते आहे, यावर अवलंबून आहे पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीने काही विद्यार्थी पंजाबमध्ये, वातावरण अगदी प्रक्षुब्ध असताना पाठवले. हे विद्यार्थी पंजाबमध्ये गुरुद्वारातून राहिले, त्यांनी भजनाचे कार्यक्रम केले, पदयात्रा काढल्या, वातावरणातील, हिंदू – शीख या दोन समाजातील ताण, थोडासा का होईना, कमी करण्याचा प्रयत्न केला. पंजाब भारताचा अविभाज्य घटक राहायचा तर असे छोटेमोठे उपक्रम सतत चालवले गेले पाहिजेत नुसते शीख हे हिंदूच आहेत असे घोकून घोकून काय उपयोग आहे ? आसामचे विद्यार्थी महाराष्ट्रात आणून त्यांना येथील संस्था दाखवणे, कुटुंबाकुटुंबातून त्यांची राहायची-जेवायची सोय करून भारतीय-महाराष्ट्रीय संस्कृतीची त्यांना ओळख करून देणे, महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या तुकड्या अरुणाचल – आसाममध्ये नेऊन त्यांना तेथील जीवनपद्धतीचा परिचय घडवणे, असे कितीतरी उपक्रम अ भा विद्यार्थी परिषद आपल्या आंतरराज्य छात्रयोजनेद्वारा गेली ८।१० वर्षे सातत्याने पार पाडीत आहे अशा उपक्रमांची संख्या वाढल्याशिवाय आसाम-नागालँड भारतात राहणार कसे आणि त्यांनी राहावे तरी का ? अगदी वैयक्तिक पातळीवर केलेल्या प्रयत्नांचे मोलही कमी नाही. श्री. विश्वनाथ नरवणे यांनी भारतीय भाषांतील समानार्थक म्हणींचा वाक्प्रचारांचा कोष सिद्ध केला. पं. नेहरूंनीही या उपक्रमाचे मना-पासून कौतुक केले होते. असाच प्रयत्न कुणीतरी लिपीच्या बाबतीत करायला हवा. आपण नुसते म्हणतो की, देवनागरी ही शास्त्रशुद्ध लिपी आहे व सर्व भारतीय भाषा या लिपीत लिहिल्या जाव्यात; पण विनोबा सोडले तर असा प्रयत्न फारसा कोणी केलेला ऐकिवात तरी नाही. एक लिपी पुढच्या पंचवीस वर्षात सर्वत्र रूढ झाली तर आजचे दुरावे, अडथळे किती तरी प्रमाणात कमी होतील. अर्थात हे सक्तीने, एकदम करता येणार नाही. व्यक्तीने, एखाद्या संस्थेने असले प्रयोग प्रथम करीत राहिले पाहिजे. जनमान्यता व सरकारमान्यता नंतर आपोआप लाभते विविधता कायम ठेवून एकात्मता टिकवायची तर सक्तीचे प्रमाण कमीतकमी हवे. म्हणजेच छोट्यामोठ्या स्वयं-सेवी संस्था, उपक्रमशील व्यक्ती यांनी, सर्व जबाबदारी-नेतृत्व राज्यसंस्थेवर न सोपवता आपापल्या जोरावर सेवेची, शिक्षणाची, संस्काराची विविध क्षेत्रे व्यापली पाहिजेत. पूर्वी जे कार्य मठमंदिरांनी, गुरुद्वारांनी केले ते आता अशा लहानलहान स्वयंसेवी, सेवाभावी संस्थांना करावयाचे आहे अशा त्या त्या भागात स्वतंत्रपणे, स्वायत्त-पणे काम करणाऱ्या संस्थांचे देशभर विखुरलेले जाळे, ही आपल्या एकात्मतेची जिवंत खूण ठरेल. फक्त उद्दिष्ट, जीवनादर्श, सांस्कृतिक दृष्टिकोन याबाबत एकवाक्यता-समानता. बाकी ज्याचे-त्याचे ज्याच्यात्याच्याजवळ अशा पद्धतीनेच जुन्या काळात या उपखंडातील एकात्मता साधली गेली हे काम राजसत्तेने केले नाही, त्यामुळे केंद्री-करणाचीही फार आवश्यकता भासली नाही. राजसत्ता बदलली, देश राजकीयदृष्ट्या गुलाम झाला तरी हे मूलभूत संस्कार पुसले गेले नाहीत, उलट नव्या राजकीय जुळणीला ही मूलभूत सांस्कृतिक एकात्मता आधारभूत ठरली एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति या आपल्या वैश्विक जीवनदर्शनाचा हा परिपाक होता इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्मांची एकात्मिकरणाची प्रक्रिया वेगळी आहे, आपली वेगळी आहे. यापुढच्या काळात जगभरच कदाचित आपल्या प्रक्रियेचे अनुकरण होण्याची शक्यता अधिक आहे. युरोपचे एकीकरण व्हावे असे तेथील अनेक विचारवंतांना वाटते आहे. जुन्या काळातल्या राष्ट्रकल्पना आता त्यानाही टाकाऊ वाटू लागलेल्या आहेत. खरं म्हणजे अगदी शार्लमेन राजाच्या काळापासून ते द गॉलपर्यंत आणि नेपोलियनपासून स्टीफन झ्वाईगपर्यंत कधी जर्मनीच्या कधी फ्रान्सच्या नेतृत्वाखाली सारा युरोप एक करण्याचे स्वप्न रंगवले गेले, ते वास्तवात आणण्याचे प्रयत्न झाले; पण यातून युद्धेच काय ती घडली, युरोपचे पुन्हा पुन्हा तुकडेच पडले हे तुकडे पुन्हा आता एकत्र येऊ पहात आहेत आर्थिक क्षेत्रापुरते तर कॉमन मार्केट अस्तित्वात येऊन हे तुकडे सध्या जोड-लेही गेले आहेत. एक धर्म, एक संस्कृती, आता तर एक विकसित

**समान सांस्कृतिक जीवनादर्शांची जोपासना... युरोप आणि भारत !**

अर्थव्यवस्था असूनही युरोपला अद्याप आपले हजार वर्षांपासूनचे स्वप्न वास्तवात उतरवता आलेले नाही. त्या मानाने परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल असूनही आपण अखंड राहिलो, पाकिस्तानचाच काय तो अपवाद घडला, हा काही निव्वळ योगायोग मानायचा का? विविधता राखूनही एकत्व साधण्याची विद्या आपल्याजवळ होती, आपल्या पूर्वजांनी वेळोवेळी ती प्रकटही केली, म्हणून हे घडू शकले. भौतिक पातळीवरच आपण फक्त वावरत असतो तर हा एकात्मतेचा धागा गेली पाच हजार वर्षे जो टिकून राहिला आहे तो राहिला असता की नाही याची शंका वाटते. भौतिकाकडे काही वेळा फारच दुर्लक्ष झाले, त्याची किंमतही त्या त्या वेळी आपल्याला जबरदस्त मोजावी लागली, हेही तितकेच खरे आहे. आज आपण सावरकरांच्या आत्मार्पणदिन स्मृतीनिमित्त येथे एकत्र जमलेले आहोत. तेव्हा या भौतिकतेत संरक्षणसिद्धता आली, हे वेगळे सांगायला नको. हिंदुस्थानची संरक्षणसिद्धता हा तर सावरकरांच्या शिकवणुकीचा प्राणच म्हणता येईल. आधुनिक भारताच्या इतिहासात या एका विषयाचा ध्यास सावरकरांइतका दुसरा कोणीच घेतलेला दिसत नाही. संरक्षणसिद्धतेशिवाय हिंदुस्थान अगदी सर्व अंगोपांगांनी एकात्म झाला तरी टिकून राहणार कसा? संरक्षणाकडे, युद्धशास्त्राकडे आपले एकूण दुर्लक्षच झाले, निदान गेली हजार। बाराशे वर्षे तरी. अगदी १९६२ पर्यंत. चीनने आपली झोप शेवटी उडवली. आता परिस्थिती पुष्कळ सुधारलेली आहे. निदान आपली सेनादले, नवे राज्यकर्ते यांचा अहिंसा वगैरे मंत्रांचा जप तरी थांबलेला आहे हा सगळा सावरकर विचारांचाच विजय आहे याचा अर्थ आपण युद्धखोर व्हावे असा नाही; पण भारताची एकात्मता, अखंडता ही बड्या शक्तींना सलणारी गोष्ट आहे, आशियाई नेतृत्वासाठी चीन, जपान, व्हिएटनाम यांची स्पर्धा सुरू आहे, त्यामुळे हिंदुस्थानच्या सीमा असुरक्षित आहेत, देशाभोवती बड्या सत्तांचे, त्यांच्या लहान–सहान हस्तक देशांचे कडे केव्हाही आवळले जाण्याचा धोका आहे, या वस्तुस्थितीचा आपल्याला विसर पडेल तर सावरकरांचे नाव घ्यायचासुद्धा आपल्याला अधिकार नाही असेच म्हणावे लागेल. देश स्वतंत्र झाल्या–झाल्या त्यांनी सीमांचा नीट बंदोबस्त करा म्हणून सांगितले, आपण दुर्लक्ष केले. दोन भारत–पाक युद्धे, एक भारत–चीन युद्ध, आपली इच्छा नसताना, अंगावर कोसळलेच. तेव्हा आपण शांततावादी राहिलो तरी जग आपल्याला नेहमीच तसे राहू देणार नाही. तेव्हा युद्ध आणि शांतता या दोन्ही काळात टिकून राहील इतकी आपली एकात्मतेची जडणघडण पक्की हवी. यासाठी भौतिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही पातळींवर प्रयत्न व्हायला हवेत. कुंडलिनी आणि कृपाण या सावरकरप्रणीत हिंदुध्वजावरच्या चिन्हांचा अर्थ हा आहे. मानवी एकात्मता शेवटी यामुळे साधली जाणार आहे आणि एकात्म हिंदुस्थान तरी शेवटी हवा कशासाठी? 'विश्वस्वधर्मसूर्ये पाहो' यासाठी ना? भारतीय राष्ट्रवाद हा विश्वबंधुत्वाची एक पायरी आहे हे सावरकरांसकट सर्वांनीच आपल्याला सांगितलेले आहे. 'एकात्म मानव' हे या संस्कृतीचे अंतिम उद्दिष्ट आहे या उद्दिष्टाकडे वाटचाल करण्याचे बळ आपल्या सर्वांना लाभो! □

**[यंदाच्या (१९८५) फेब्रुवारी महिन्यात सावरकर आत्मार्पण दिनानिमित्त मुंबईच्या शिवाजी उद्यानाजवळील सावरकर स्मारक संस्थेतर्फे 'हिंदुस्थान एकात्म कसा राहील' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला गेला होता. या परिसंवादात वाचलेला हा निबंध.]**


महाराष्ट्र साहित्य परिषदेचा
१९८४ मधील
शिवराम महादेव परांजपे
ग्रंथ पुरस्कार लाभलेलं पुस्तक

निर्माणपर्व

लेखक - श्री. ग. माजगावकर

• मूल्य चालीस रुपये

राजहंस
प्रकाशन, पुणे

नावडकर

## शब्दांचं अंगण

आशा कर्दळे

# क्रीडाविषयक पुस्तके

**जी**वनात आनंदाचे क्षण फुलवणारी जी मानवनिर्मित साधने आहेत, त्यापैकी क्रीडा या साधनाला विशेष महत्त्व द्यावे लागेल. या आनंदाचा आविष्कार जिवंत व्यक्तीकडून होत असून प्रत्यक्ष खेळ खेळणारी व्यक्ती आणि प्रेक्षक या तीन घटकांनी मिळून हे आस्वादाचे वर्तुळ पूर्ण होते. मैदानी असो किंवा बैठे खेळ असो, प्रत्येक जण आपापल्या आवडीप्रमाणे त्यातून आनंदाचे अमाप पीक घेऊ शकतो.

आपल्या देशात एकूणच क्रीडा क्षेत्राविषयी अनास्था दिसते असे मत क्रीडातज्ज्ञ व्यक्त करत असतात. निरनिराळ्या क्रीडा प्रकारातले खेळाडू तयार करणे, त्या खेळाडूंचे आंतरराष्ट्रीय पातळीवर कसब वाढवणे, एकूण खेळाचा दर्जा सुधारणे, खेळाचा सर्वांगीण परिपोष करणे या सर्व बाबतीत एकूण उदासीनता दिसते. निरनिराळ्या क्रीडाप्रकारांवरची जी पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत त्याकडे नजर टाकली, तर अशीच निराशा पदरी पडते. एक क्रिकेट वगळला, तर इतर खेळांवरची अक्षरशः प्रत्येकी दोन तीन फार तर पाच सहा पुस्तके आढळतात. ही संख्या निश्चितच प्रोत्साहक नाही खेळांवरची पुस्तके कशासाठी हा प्रश्न आधी निर्माण होऊ शकेल. एखाद्याला विशिष्ट खेळ शिकायचा असेल तर तो त्या खेळाची माहिती, नियम पुस्तक वाचून समजून घेऊ शकेल, एखाद्याला खेळायचे नसले तरी केवळ उत्सुकता म्हणून, निदान माहिती असावी म्हणून तो पुस्तक वाचेल. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्रीडाजगताच्या इतिहासाची काही पाने ह्या पुस्तकांच्या रूपाने कायम स्वरूपात जतन केली जातात. खेळांवरची भरपूर पुस्तके लिहिली जावीत ही आजची गरज आहे.

क्रिकेट या खेळाच्या विरोधात विचारवंतांची एक फळी उभी असली तरी या खेळाचे वेड वाढतेच आहे आणि वाढते राहील यात शंका नाही. क्रिकेटप्रेमी व्यक्तींवर एक प्रकारचे झपाटलेपण आले आहे आणि ते इतक्या लवकर ओसरणार नाही. त्यामुळे क्रीडाविषयक पुस्तकांमध्ये क्रिकेट या खेळावरची पुस्तके सर्वाधिक आहेत, हे ओघाने आलेच. क्रिकेट कसे खेळावे – माधव मंत्री, क्रिकेट आणि क्रिकेट – रवीन्द्र पाटणकर, क्रिकेट : चौकार आणि षट्कार – बाळ ज. पंडित, त्रिफळा – बाळ ज. पंडित, क्रिकेट नियम आणि कौशल्य – व्ही. एच. सांगलीकर, इत्यादी क्रिकेट विषयक अनेक पुस्तके आहेत. सध्या गाजत असलेली सनी डेज् – सुनील गावसकर आणि षटक आणि षटकार – रवी शास्त्री आणि संदीप पाटील.

सुनील गावसकरच्या अलिकडच्या 'आयडॉल्स' या पुस्तकात खुद्द क्रिकेट या खेळाविषयी काही नसले तरी क्रिकेट विश्वातील एकतीस दैवतांचा सुरेख परिचय आहे. त्यातूनही प्रत्येकाचो स्वतंत्र शैली, त्या शैलीतून उत्तम क्रिकेटचे दर्शन घडते. गावसकरच्या या आधीच्या 'सनी डेज' या पुस्तकाचे स्वरूप आत्मनिवेदनपरच असल्याने क्रिकेट या खेळाचे असे काही विवरण नाही. कसोटी सामन्यांच्या निमित्ताने त्याने निरनिराळ्या देशांचे केलेले दौरे आणि त्यात त्याला आलेले अनुभव असेच या पुस्तकाचे स्वरूप आहे. आपल्या देशाचे दुर्दैव हे की, कीर्ती मिळाल्यावर एखाद्या व्यक्तीला नट, राजकारणी, लेखक, कलावंत, खेळाडू, मॉडेल सगळेच व्हावेसे वाटते. त्यामुळे आपल्या क्षेत्रात पूर्णावस्थेला जाऊन पुढच्यांसाठी ज्ञान पेरून ठेवावे असे कोणालाच वाटत नाही.

पुण्याच्या आदित्य प्रकाशनने काढलेले 'षटक आणि षटकार' हे उभय क्रिकेटपटूंचे आत्मनिवेदन असले तरी 'तंत्रशुद्ध क्रिकेट' हे महत्त्वाचे प्रकरण त्यात आहे. त्यात साहित्याच्या निवडीपासून हाताळणीपर्यंतचे मार्गदर्शन, क्षेत्ररचना, मैदानाचा नकाशा, क्रिकेटच्या संदर्भात येणाऱ्या सगळ्या शब्दप्रयोगांचे स्पष्टीकरण, ड्राइव्ह, कट, पूल, हूक, ग्लान्स, स्वीप या सगळ्या फटक्यांच्या तंत्रांचे स्पष्टीकरण हे सर्व आहे. खेळतानाची प्रत्येक कृती आणि क्रिया आकृती काढून स्पष्ट केली आहे. ऑफ ब्रेक, स्पिन, लेगब्रेक, इनस्विंग, आउटस्विंग हे सर्व बोलिंगचे प्रकार त्यामुळे चांगले समजतात जिज्ञासू आणि नवशिका दोघांनाही ते उपयुक्त आहे. महिलांचे क्रिकेट हाही एक पुस्तक वेगळे लिहिण्याजोगा विषय होऊ शकेल. एखाद्या महिलेनेच ते लिहावे !

ऑलिंपिक हे एक अतिभव्य क्रीडानगर असते. तिथे अनेक क्रीडाप्रकारांचे एकाचवेळी दर्शन घडते. ऑलिंपिकला 'द ग्रेटेस्ट शो ऑन द अर्थ' असे म्हणतात. 'ऑलिंपिक' याच नावाची दोन पुस्तके आहेत. एक अनिल चक्रदेव यांचे. डोंबिवलीच्या आरती प्रकाशनने ते प्रसिद्ध केले तर दुसरे श्री. हेमंत जोगदेव यांचे. पुण्याच्या हिमांशु प्रकाशनने ते काढले आहे.

ऑलिंपिकविषयी सर्वांगीण आणि अद्यावत माहिती दोन्हीतही आहे. प्राचीन ऑलिंपिकचा इतिहास दोघांनीही दिला आहे. ऑलिंपिकचा प्रारंभ ग्रीसमध्ये झाला. इ. स. ३९३ मध्ये रोमन सम्राटाने त्यावर बंदी आणली. त्यानंतर आधुनिक ऑलिंपिक १८९६ पासून सुरू झाले प्राचीन ते आजच्या ऑलिंपिकपर्यंत त्याचे स्वरूप कसे कसे बदलत गेले त्याचा अभ्यासपूर्ण आढावा दोन्ही पुस्तकात आहे. श्री. हेमंत जोगदेव यांनी ऑलिंपिकच्या संदर्भात भारताच्या क्रीडाक्षमतेचा परखड विचार केला आहे. श्री. अनिल चक्रदेव यांनी आजच्या जागतिक परिस्थितीचा परामर्श घेतला आहे. आतापर्यंतचे जागतिक उच्चांक आणि जगन्मान्य खेळाडूंची छायाचित्रे ही या पुस्तकाची आकर्षणे आहेत.

मैदानी क्रीडास्पर्धांविषयी तीन चांगली पुस्तके उपलब्ध आहेत. १) मर्दानी व मैदानी स्पर्धा–राजा ऐनापुरे–आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे २) शर्यती, स्पर्धा, खेळ व

नियम – आ. पां. खरात – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३) खेळाच्या जन्मकथा–र. गो. सरदेसाई, प्रसाद प्रकाशन, पुणे. यापैकी राजा ऐनापुरे यांच्या पुस्तकात सॉफ्ट बॉल, कबड्डी, खो खो, रिंग टेनिस, गोळा फेक, भाला फेक थाळी फेक, लांब उडी, उंच उडी अशा एकूण २० खेळांविषयी पूर्ण माहिती आहे. प्रत्येक खेळाचे नियम, त्यासाठी लागणारे क्रीडांगण, त्याची रचना, खेळाच्या साहित्याची माहिती अशा पद्धतीने प्रत्येक खेळाची ओळख करून दिली आहे.

शारीरिक सुदृढतेसाठी खेळ आवश्यक आहेत. नेतृत्व, खिलाडू वृत्ती आणि सहकार्य हे गुण खेळामुळेच वाढीस लागतात. खेळाच्या स्पर्धांमुळे देशाच्या विविध राज्यांमध्ये तसेच विविध देशामध्ये देखील जवळीक निर्माण होते. खेळामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो तो निराळाच. 'शर्यती, स्पर्धा, खेळ व नियम हे पुस्तक अगदी परिपूर्ण असे आहे. यात सर्वच खेळाचा समावेश आहे. मैदानी खेळात रिले शर्यत, अडथळ्याची शर्यत वगैरे सर्व शर्यतीचाही समावेश आहे.बॅडमिंटन, बास्केट-बॉल, फूटबॉल, व्हॉलीबॉल, हॉकी, टेबल-टेनिस, कुस्ती या सर्वांची सविस्तर माहिती, प्रत्येक खेळाच्या क्रीडांगणाच्या आकृतीसह या पुस्तकात आढळते. 'खेळाच्या जन्मकथा' हे तीन भागात असून जगातल्या सगळ्या खेळाचा इतिहास त्यात आढळतो. असे मराठीत हे एकच पुस्तक आहे. नवीन नवीन खेळाचा शोध लागेल तशी यात भर पडत राहील. अपंगांसाठी क्रीडा आणि क्रीडा समीक्षा ही फार चांगली प्रकरणे या पुस्तकात आहेत. खरे तर अपंगाविषयीच्या क्रीडा हा एका स्वतंत्र पुस्तकाचा विषय होऊ शकतो. जलतरण या क्रीडा प्रकाराची सांगोपांग माहिती देणारे पुस्तकही मराठीत उपलब्ध नाही.

ऑलिंपिकमध्येही ज्याचा समावेश असतो आणि इतर वेळीही ज्याच्या स्पर्धा होतात, अशा कुस्ती आणि मॅरेथॉन यावरची पुस्तके अनुक्रमे श्री. कृ. गो. सूर्यवंशी आणि श्री. हेमंत जोगदेव यांनी लिहिलेली आहेत. 'कथा ही मॅरेथॉनची' या हिमांशु प्रकाशनच्या पुस्तकात श्री. जोगदेव यांनी मुलांसाठी गोष्टीच्या स्वरूपात मॅरेथॉनची सगळी माहिती दिली आहे. खेळाडू हा लहान वयापासून घडत असतो. त्या दृष्टीने मुलांसाठी त्यांना समजेल अशा पद्धतीने लिहिलेल्या पुस्तकाची वाण मराठीत जाणवते कृ. गो. सूर्यवंशी यांचे 'भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास' हे पुस्तक महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने प्रकाशित केले आहे थेट बुद्धकालापासून प्रारंभ करून, यवनकाल, शिवकाल, इंग्रजी कालखंड अशा क्रमाने कुस्तीचे स्वरूप कसे बदलत गेले ते लेखकाने स्पष्ट केले आहे. कुस्तीच्या आखाड्यानीच महाराष्ट्राच्या तरुण पिढीला शरीर संपदा कमावण्यास मदत केली. स्वातंत्र्यानंतर कुस्तीला अधिक चांगले दिवस आले या पुस्तकात कुस्तीचे प्रकार, संकेत, नियम यांची सांगोपांग चर्चा आहे. महाराष्ट्रातील आजवरच्या सगळ्या प्रसिद्ध मल्लाचा परिचयही आहे.

## बुद्धिबळ–कॅरम

बैठ्या खेळामध्ये प्रामुख्याने बुद्धिबळ, कॅरम आणि आता नव्याने उदयाला आलेल्या रुबिक क्यूबचा समावेश करता येईल. बुद्धिबळ हा अतिप्राचीन खेळ. या खेळावर लिहिलेली बरीच पुस्तके आहेत. तर्कशुद्ध विचारसरणी आणि पृथक्करण करण्याची क्षमता या खेळाने वाढते. कला, शास्त्र आणि क्रीडा या तिघांचा सुरेख संगम या खेळात आहे. भारत हेच या खेळाचे उगमस्थान आहे. इ. स. च्या पाचव्या शतकात या खेळाचा उदय झाला. भारतीय खेळ असूनही आज जगात आपण या खेळात मागे आहोत. जागतिक बुद्धिबळपटूंमध्ये आज भारतीयांचे नाव अपवादानेच झळकेल. जगाने मात्र हा खेळ आत्मसात करून त्यावर स्वामित्वही प्रस्थापित केले. आपण काय केले? याविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना 'पटावरील युद्ध' या अतिशय शास्त्रशुद्ध पुस्तकाचे लेखक म्हणतात, 'आपण आपले ज्ञान गुप्त ठेवले. त्यामुळे ते बंदिस्तच राहिले. पाश्चात्य देशात या विषयावर हजारो पुस्तके आहेत आपल्या देशात केवळ हातावर मोजण्याइतकी.' मॅजेस्टिक प्रकाशनचे हे पुस्तक परिपूर्णही आहे; पण नवशिक्यासाठी त्याचा विशेष उपयोग नाही. युद्धशास्त्राच्याच आधारे यात विविध डावपेच दिले आहेत. सीझर, नेपोलियन, शिकंदर या जगन्मान्य योद्ध्यांच्या युद्धतंत्राचा परिचय करून देऊन लेखकाने बुद्धिबळात चढाईचे धोरण केव्हा ठेवावे, पिछाडीचा कब्जा कसा घ्यावा, कोंडी कशी करावी, थेट मुसंडीपेक्षा अपरोक्ष चढाई कशी करावी, क्षणिक विजयाकडे पाठ फिरवून अंतिम विजय कसा मिळवावा, आवळा देऊन भोपळा कसा काढावा वगैरे सगळी युद्धाची तंत्रे अवलंबून खेळायला शिकवले आहे. त्यासाठी अनेक आकृतीही दिलेल्या आहेत. (१) बुद्धिबळे– सुरुवातीचे प्रकार व निवडक डाव– नीलकंठ देशमुख (२) बुद्धिबळे– तंत्र आणि मंत्र– नीलकंठ देशमुख (३) बुद्धिबळे– डाव असे जिंका– भा. प. म्हैसकर ही तीन पुस्तके खेळायला सुरुवात करणाऱ्यांसाठी चांगली आहेत. 'बॉबी फिशर' हे श्री. हेमंत देशमुख यांचे पुस्तक. गिरगावच्या त्रिदल प्रकाशनने ते प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक शिकणाऱ्यांसाठी नाही. कारण त्यात बॉबी फिशरचे पंचवीस निवडक डाव देऊन त्याच्या शैलीचे विश्लेषण केले आहे. त्यामानाने मॅजेस्टिक प्रकाशनचेच श्री. ना. रा. वडनप यांचे 'बुद्धिबळाचा ओनामा' हे पुस्तक चांगले आहे. प्रश्नोत्तराच्या स्वरूपात अनेक महत्त्वाच्या चाली ( खेळी ), मारामारीचे तंत्र याची माहिती दिली आहे प्रत्येक मोहोरीचे वैशिष्ट्य सांगितले आहे काही कठीण आणि चुरशीचे डाव आकृतीसह स्पष्ट केले आहेत. नवशिके अगर नियमित खेळाडू दोघानाही हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल.

कॅरम या खेळाविषयी श्री अरुण देशपांडे यांचे 'कॅरम तंत्र आणि मंत्र' हे पुस्तक ( मॅजेस्टिक प्रकाशन ) फार चांगले आहे. अतिशय उपयुक्तही आहे मराठीत असे पुस्तक नव्हते. ती गरज या पुस्तकाने पूर्ण केली. प्रत्येकजण आयुष्यात केव्हा तरी कॅरम खेळलेला असतो. विशेषतः लहानपणी किंवा शालेय जीवनात; पण या खेळाची शास्त्रशुद्ध माहिती फार थोड्यांना असते. याही खेळाची उत्पत्ती भारतातच झालेली. गेल्या १०० वर्षांपासून हा खेळ भारतात खेळला जातो आहे बिलियर्डसमधील स्नूकर या खेळापासून हा खेळ विकसित झाला. बोटाचे कौशल्य, चित्ताची एकाग्रता या गुणांची या खेळाला आवश्यकता आहे या खेळाची संपूर्ण आणि सचित्र माहिती देताना लेखकाने बोर्डाचा आकार, त्याची मापे,

सोंगट्या, स्ट्रायकर यांचा परिचय करून दिला आहे. त्यानंतर ड्यू, कट, कॉम कट, रिबाऊंड, शॉट, ग्लान्स, थर्ड पॉकेट, ब्रश या प्रत्यक्ष खेळातल्या कल्पना स्पष्ट केल्या आहेत. स्ट्रायकर कसा धरावा, कसा मारावा त्याची भरपूर छायाचित्रे दिली आहेत. हल्ली कॅरमला बरे दिवस आले आहेत; पण तरीही या खेळात स्त्रिया विशेष नाहीत. हल्ली या खेळात वेळेचे बंधन आणले आहे. त्यामुळे त्यातली चुरस वाढली आहे. पुस्तकात अधिकृत कॅरम संघटनांचे पत्ते, राज्य स्पर्धा आणि संस्थांचे पत्ते दिलेले आहेत.

अल्पावधीतच जागतिक लोकप्रियता संपादन करणारे क्रीडासाधन म्हणजे रूबिक क्यूब किंवा 'जादूचा घन' हंगेरीमधील बुडापेस्ट इथले प्रो. अर्नो रूबिक यांनी या क्यूबचा शोध लावला. मनोरंजक तितकाच, बौद्धिक चापल्य वाढवणारा हा खेळ आहे. यासाठी हातांच्या झटपट हालचाली, मनाची एकाग्रता आणि गणिती विचारपद्धती यांची गरज आहे. या खेळावरती सौ. माधुरी बोपर्डीकर यांनी 'रूबिक क्यूब' याच नावाचे पुस्तक लिहिले आहे. ते मॅजेस्टिक प्रकाशनचे असून, मराठीतले असे पहिलेच ठरावे. चाळीस आकृतींच्या सहाय्याने क्यूब कसा सोडवावा त्याची प्रात्यक्षिके दिली आहेत. प्रो. रूबिक हे वास्तुशिल्पी आहेत. मुलांना घनमिती शिकवताना त्यांना अचानक या क्यूबची कल्पना सुचली. अवघ्या तीन आठवड्यात त्यांनी हा घन तयार केला. २७ लहान घनांचा मिळून हा एक मोठा घन तयार झाला आहे. कमीतकमी वेळात त्याचे सहाही पृष्ठभाग एकेका रंगात आणणे यात या खेळाचे कौशल्य आहे. त्यात सहा रंग असतात. पुस्तकातल्या आकृती रंगीत हव्या होत्या म्हणजे समजायला सोपे गेले असते. एका अमेरिकन कंपनीने जगभर चार कोटी क्यूब्ज विकल्या आहेत. हा घन सोडवण्याच्या स्पर्धाही घेतल्या जातात. बुडापेस्ट इथे १९८० साली स्पर्धा घेण्यात आली. त्यात एका विद्यार्थ्याने ५५ सेकंदात क्यूब सोडवला. इथल्याच दुसऱ्या स्पर्धेत एका स्पर्धकाने ४० सेकंदांचा उच्चांक केला. एका खेळाडूने तर क्यूब पाठीमागे धरून, न बघता तो सोडवला! स्वतः प्रो. रूबिक यांना तो सोडवायला एक मिनिट लागतो. व्हिएतनाममधील मिनभाई या सोळा वर्षांच्या मुलाने अवघ्या २३ सेकंदात सोडवला! हा जगातील उच्चुच्चांक म्हणावा लागेल! क्यूब कसा सोडवावा त्याचे चांगले मार्गदर्शन या पुस्तकात केले आहे.

शास्त्र काय किंवा इतिहास, कला काय किंवा क्रीडा, ज्ञान काय सर्वांची प्रगती, वृद्धी आणि जोपासना ग्रंथांद्वारेच होऊ शकते. ही वस्तुस्थिती अजूनही आपल्याकडे रूजायची आहे, असेच ग्रंथनिर्मितीची अवस्था पाहून वाटते. □

---

**पुस्तके**

# समर्थ रामदास : दोन अभ्यासनीय ग्रंथ

म. श्री. दीक्षित

मराठी संतमालिकेत समर्थ रामदास हे एक आगळे, स्वतंत्र आणि वादग्रस्त संत आहेत. त्यांच्याविषयीच्या 'वादग्रस्ते'बाबत विद्वानांत मतभेद नाहीत हे सुदैवच. रामदास परमार्थवादी की प्रपंचवादी, दैववादी की यत्नवादी, भक्तीमार्गी संत की राजकारणी संत, चातुर्वर्ण्यवादी की मानवतावादी, शिवसमर्थ भेटी केव्हा, कितीदा झाल्या, उभयतात नेमके संबंध कोणते– अशी अनेक वादस्थळे समर्थचरित्रात आहेत आणि त्यासंबधाने अजूनही उलटसुलट विवेचक वाङ्मयनिर्मिती होत आहे.

गेल्या दोन–तीन वर्षात समर्थांसंबंधी जे दोन–चार ग्रंथ निर्माण झाले त्यांपैकी दोन वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथांची आपणास ओळख करून घ्यायची आहे. पैकी एक '**समर्थदर्शन**' हा संपादित लेखसंग्रह आहे, तर दुसरा '**रामदासः प्रतिमा आणि प्रबोध**' (ले. त्र्यं. वि. सरदेशमुख) हा स्वतंत्र, नव्या दृष्टीने समर्थ–विचारांचा अर्थ विशद करणारा छोटा ग्रंथ आहे. समर्थांचे व्यक्तित्व, वाङ्मय, शैली, विचार आणि कर्तृत्व यांचे नव्याने आलोचन हा दोन्ही ग्रंथांचा अर्थातच समान हेतू आहे. दोन्हींचे स्वरूप संशोधनात्मक माहितीपूर्ण असे नसून प्रायः भाष्यात्मक आहे असे म्हणणे योग्य ठरेल. कारण नव्या संशोधित माहितीची भर यातील एकाही ग्रंथात आढळली नाही.

१९८२ साली समर्थांचा त्रिशतसांवत्सरिक उत्सव साजरा झाला. त्या प्रसंगानिमित्त पुण्याच्या कॉंटिनेंटल प्रकाशनने '**समर्थदर्शन**' हा सुमारे ३६० डेमी पृष्ठांचा एक संपादित लेखसंग्रह के. वि. बेलसरे यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध केला आहे. सर्वश्री श्या. गो. मुद्गल, श्री. र. कावळे आणि अनिरुद्ध कुलकर्णी या तिघांनी प्रस्तुत ग्रंथ योजकतेने आणि समर्थांसंबंधीच्या सर्व उलटसुलट बाजू वाचकांच्या पुढे अभ्यासपूर्ण रीतीने याव्यात अशा हेतूने संपादित केला आहे. माझ्या मते ग्रंथाचे नजरेत भरणारे हे पहिले वैशिष्ट्य आहे. पाच लहानमोठ्या भागात ग्रंथाची विभागणी असून त्यात तीन संदर्भ सूच्यांसह एकूण ३० लेख आहेत. पार्श्वभूमी २, धर्म–तत्त्वज्ञान ८, काव्य ७, समाजकारण ५, सांस्कृतिक पर्यालोचन ५, आणि सूच्या ३ अशी ही विषयवार लेखसंख्या आहे. आता विषय, लेखक आणि त्यांची संख्या याविषयी जाणकारांची मतभिन्नता होऊ शकेल. कुणास समर्थचरित्रातील काही विषयांची पुनरुक्ती जाणवेल तर कुणास काही विषयांचा अभाव आढळेल. उदाहरणार्थ 'समर्थचरित्रातील वादस्थळे' किंवा 'समर्थ वाङ्मयाचे संशोधक आणि चरित्रकार' असे विषय प्रस्तुतसारख्या ग्रंथात शोभून दिसले असते. समर्थांच्या एकूण काव्यनिर्मितीबाबत काव्यदृष्ट्या अनेकदा पुनरुक्ती झाल्याचे स्पष्टच आढ-

ळते; पण या झाल्या ग्रंथाच्या काही बाह्य उणिवा. अतरंगात सर्व लेखकानी परिश्रमपूर्वक केलेला अभ्यास जाणवतो. या दृष्टीने पुढील काही लेखाचा उल्लेख करावासा वाटतो

समर्थांची आध्यात्मिक भूमिका (लीला गोळे), रामदासाचे भक्तितत्व (प्र. न. जोशी),रामदासांच्या कवितेचे सामर्थ्य (उषा देशमुख), रामदासाची हिंदी कविता (यू. म. पठाण), समर्थांची स्फूटकाव्ये (यशवत पाठक), करुणाष्टके (फ. मु शिंदे), समर्थांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन (समिता टिल्लू) आधुनिकता आणि समर्थांची प्रस्तुतता (अनिरुद्ध कुलकर्णी) आनंदभुवन (रा. ग. जाधव). पण या सर्वांपेक्षाही समर्थ हे प्रतिगामी नि जातवादी आहेत अशी ज्याची समजूत आहे त्यांनी रावसाहेब कसबे आणि निर्मलकुमार फडकुले या दोघांचे लेख आवर्जून वाचावेत. समर्थांचे यथार्थ मोठेपण मान्य करूनही या दोघानी त्याच्या विचारसृष्टीच्या मर्यादा साधार दाखविल्या आहेत. ग्यानबा–तुकारामाप्रमाणे समर्थांचा नामोच्चार बहुजनसमाजात का होत नाही याचे काहीसे उत्तर या दोघांच्या लेखात सापडू शकते. श्री. पगडी यांना 'चिकित्सक समर्थ चरित्र हवे' या विषयावर चिकित्सक लेख लिहावासा वाटला यावरून समर्थचरित्रातील अनेक वादस्थळे अद्याप पुरेशी उलगडली गेली नाहीत हेच स्पष्ट होते. ग्रंथातील सर्व लेखांमधील आशय मर्यादित जागेत सागणे शक्य नाही. तथापि समर्थ वाङमय, विचार आणि कर्तृत्व (समाजाभिमुख कर्तृत्व की–जे इतर संतात नव्हते) सांप्रतकाळी पाचामुखातून समजून घेण्याच्या दृष्टीने 'समर्थदर्शन' हा ग्रंथ खरोखरी वाचनीय आहे.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची शिफारस लाभलेले प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख याचे एक टाकी सुमारे १५० पृष्ठाचे पुस्तक म्हणजे समर्थांची अस्सल वाङमयीन वैचारिक प्रतिमा कोणती आहे याचा शोध घेण्याचा आणि त्या शोधातून नव्या प्रबोधाचा वेध घेण्याचा एक प्रामाणिक यत्न आहे. त्यांचे हे पुस्तक एका वाचनाने मात्र कित्येकास अनाकलनीय वाटेल. कारणे दोन. अनेक मुद्रणदोष आणि वाङमयीन-समीक्षात्मक भाषा, भाणखी एक जाणवणारे वैशिष्ट्य असे की, पुस्तकाचे एकूण स्वरूप खडणात्मकतेकडे झुकले आहे. टिळक काळापासून ज्या ज्या समर्थाभ्यासकानी समर्थांचे नाते राष्ट्रवादाशी जुळवून त्याना राजकारणी वा राष्ट्रसत ठरविण्याचा भावनात्मक प्रचार केला, त्यातील मुख्य अभ्यासकाची विचारसरणी कशी अप्रबुद्ध, संकुचित आहे हे साधार दाखविण्याचा त्यांनी कसोशीने यत्न केला आहे. इतकेच नव्हे तर सरदेशमुख राजवाड्यासारख्यांबरोबर कै. माटे, गं. बा. सरदार याच्यासारख्यांचेही खडन करतात. तुकाराम रामदासाचे तुलनात्मक आलोचन करताना या खंडनाला विशेष धार चढली आहे. या साऱ्या खडनामागे 'राष्ट्रवाद' ही एक संकुचित, प्रतिगामी, फुटीरवादी विचारधारा आहे. अशी लेखकाने ठाम समजूत करून घेतलेली दिसते. बरे इतके सारे विचिकित्सपणे लिहून रामदासांचे आगळेपण नि मोठेपण कशात आहे हे नेमकेपणाने सागण्यात सरदेशमुखांना पुरेसे यश आल्याचे म्हणवत नाही.

समर्थांच्या विचारसरणीसंबंधी आजवर अनेक मार्क्सवादी विचारवंतांनी लिहिले आहे. त्यांच्यात आणि सरदेशमुख याच्यात एक चागला फरक एवढाच की, सरदेशमुखांनी रामदासाचे आलोचन टिळकोत्तर महाराष्ट्र, दासकालीन लोकस्थिती आणि दासांचे एकूण वाङमय याच्या आधारे केलेले आहे 'तुकाराम आणि रामदास', 'युगातक रामदास', 'रामदास आणि सामाजिक बांधिलकी', 'रामदास राष्ट्रधर्मी की मानवधर्मी' अशा काही निवडक विषयावरील लेखकाचे विवेचन स्पष्टोक्तीपूर्ण आणि विचारोन्मुख करणारे झाले आहे हे आवर्जून सागायला हवे. लेखकाने अलिकडे एका दिवाळी अकात शाहीर राम जोशीचे अवमूल्यन करणारा फटकळ लेख लिहिला आहे. त्यांचे प्रस्तुत पुस्तक अवमूल्यनात्मक नाही, पण झणझणीत मूल्याकनात्मक मात्र खचित आहे. ¤

समर्थदर्शन
कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे,
किमत ३५ रुपये

रामदास
प्रतिमा आणि प्रबोध,
अस्मिता प्रकाशन, पुणे
किमत ३० रुपये

## लाल फुलांचं झाड

भारत सासणे यांचा *'लाल फुलांचं झाड'* हा कथासग्रह हातात घेतल्यावर मुखपृष्ठावर प्रथम दिसतात ती एकात एक गुतून इतस्ततः पसरलेली मुळं, आणि तीच मुळ आतील कथांचा पोत, त्यांची प्रत या सर्वांबद्दल नि.शब्दपणे बरचसं बोलूनही जातात. मनुष्य स्वभावाच्या, माणसाच्या आसपासच्या जांभळ्या किरमिजी अशा गूढ वातावरणाच्या मुळाशी जात जात पुनः अनेक प्रश्न निर्माण करत, कसला तरी शोध घेत ती कथा फुलवत वाचकाच्या मनःस्पदनाशी नकळत भिनवूनही टाकायची ह्या सासणे याच्या लेखणीचा बाजही समजून जातो. स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी एका वंध्येचा अंतःरस शोषून टवटवीत झालेलं लाल फुलाचं झाड फार प्रातिनिधिक आहे. कोणत्याही सजीवाची स्वतःचं अस्तित्व टिकवण्यामागची धडपड सगळं समजून उमजूनही करत असलेली. कारण तोही निसर्गानं दिलेला एक जीवघेणा शाप आहे. त्या शापाची अगतिकता चित्रातील कोवळ्या मुलाच्या नाक डोळे जवळजवळ नसलेल्या चेहऱ्यावरही दृगोचर होते आहे.

वाचक सासणेंच्या कथा जसजशा वाचत जातो तसतसा त्यात गुतत जातो, झपाटून जातो, जीवनविषयक खोलवर विचार करण्यासाठी प्रवृत्त होतो. वरील चित्रातल्या शुष्क खुरट्या मुळ्यांच्या भोवतीचे गुंतून ठेवणारे रंगच सागतात की, नीरस गुतागुतीच्या जीवनाबरोबर ताजी टवटवीत कलाही लेखकाच्या रक्तात भिनलीय.

सासणेंच्या कथांचं वैशिष्ट्य त्यांच्या विषयाच्या वैविध्यात आहे. भविष्यामागे लागलेला सामान्य पराभूत माणूस आणि मरायला टेकलेल्या कुत्र्याच्या गळ्यातील चांदीच्या साखळीमागे लागलेला स्वार्थी तरीही पराभूत माणूस यात आहे. तरुणपणातल्या निःशब्द नेणिवेतल्या सुप्त प्रीतीची प्रेयसीच्या घराची ओढ आहे. क्षुद्रांच्या मनाला घातलेलं सोशिकतेचं लिंपण आहे. स्वतःच्याच डोळ्यानी नवा सूर्योदय पहा-

णारी फाटकी तुटकी भटकी जमात आहे. ठकानी रामाच्या डोळ्यात जिवंत झालेली त्याच्या स्मरणातली रात्र आहे. तसच मामीच्या वंध्यत्वाचं कुरतडणारं दु:ख आणि त्यांच्यातला जीवनरस शोषून टवटवीत होणारं लाल फुलांच झाड आहे. मनमोराच्या मागे धावणारा तिचा आत्मा आणि रंगीबेरंगी झुबराखालच तिच आत्मा नसलेल चैतन्यहीन शरीर आहे. हुबेहुब स्वत.च्या पत्नीसारखा दिसणारा नग्न पुतळा विकायला ठेवलेला पाहून त्याच्या मनाच झालेलं अरण्य आहे. आणि त्या मूर्तीचा चेहरा ब्रशनं काळा करून टाकणारा खराखुरा कलावतही आहे. वाडा, स्वाभिमान सर्वच हरवलेल्या सुरेशला अनुराधेच्या विश्रब्ध प्रीतीत मिळालेला दिलासा आहे दोन अधिक दोन पाच होतात तीनही होतात ही नवी परिमिती बालवयात स्पष्ट करून कथानायकाचं मानसिक वय वाढविणारा अप्पाचा कोट आहे. यत्राप्रमाणे सर्व उभं करून मनाचा ओलावा धुक्यात हरवून बसलेले पराभूत रायसाहेब आहेत.

असे सकृत्दर्शनी साधे वाटणारे विषय पण त्यातलं वैविध्य, पक्व तितकाच खोल आशय, कमळाच्या सहज पाकळ्याप्रमाणे सहज उमलत जाणारी अभिव्यक्ती आणि दोन आणि दोन चार या हिशेबी चाकोरीबद्ध गाणितापेक्षा अतर्क्य असा आविष्कार यात वाचक स्वत:लाच हरवून जातो. स्थळाभावी सर्वांचाच परामर्ष घेता येत नाही; पण थोडा नैवेद्य चाखायला हरकत नसावी.

'कर्म' या नावातच सगळ सार घेऊन आलेली पहिलीच कथा. ब्रह्मदेव हे निर्मात्याच, रचनाकाराचंच इतकच काय नशीब घडवणाराचं नाव घेऊन आलेला ब्रह्मदेव बडूजी, स्वत:चच भविष्य जाणण्यासाठी स्वत.च्या गढूळ दिशाहीन आयुष्यात वणवणतोय् मुरारी स्वैराचारी आयुष्य घालवून कुत्र्याच्या गळ्यातल्या चांदीच्या साखळीसाठी छाती फुटेपर्यंत धावतोय. अधत्वाचा शाप घेऊन आलेले भविष्यवेत्ते कृष्णशास्त्री, मुलीच्या भविष्याचा म्हणजेच लग्नाचा ध्यास घेऊन बसलेले आणि जतर मतर झाल्यासारखी एका कळकट काळ्या विवाहित माणसामागे हुरळून धावणारी त्याची सखू. सडकं अग घेऊन गळ्यातल्या चांदीच्या साखळीसह जगत रहाणारा जिवो. सगळेच निसर्गाच्या शापात भोवंडताहेत; पण त्याहीपेक्षा स्वत.च्या कर्माची वाट स्वत:च मळण्याच्या निसर्गानं दिलेल्या जीवघेण्या शापानं सर्वांचीच वाट लावलीय दैवापेक्षा कर्मच माणसाला चटके देतं, रसातळाला पोचवतं. 'कर्म' हे प्रत्ययकारी नाव असलेली ही झोप उडवणारी पहिलीच कथा मनात रिघून रहाते.

हजारो वर्षं स्वत:च्या आशा आकाक्षांना सोशिकतेचं लिपण घालत आलेले दलित. त्यांच्या दडपलेल्या भावनाची घालमेल 'लिपण' या सार्थ नाव असलेल्या कथेत प्रतीत झालीय. सवर्ण आणि दलित अशी दोन बालकं आणि त्याचं मांजर या तिघामधला खऱ्याखुऱ्या निरागस मैत्रीचा अंकुर हृदयातल्या गाभ्यातून उगवलेला. त्या माजराचं नावच मुळी 'दोस्त' ठेवलंय त्यानी. पण त्यातल्या ब्राह्मण मुलाची, रवीची आई जेव्हा दोस्तला झाडूने ढकलत म्हणते, 'XXX च्या घरचं माजुडं मेलं कशा कशात तोंड घालून आलं असेल जात पण नाही' इथेच त्या मुलाच्या मनावर पहिला ओरखडा उठतो आणि वाचकाच्या जाणिवाच गोठून जातात. मनाला समजुनीच लिपण घालणाऱ्या आईन जातीची शरम वाटू देऊ नको ही दिलेली शहाणी समज, रिकाम्या प्रतिष्ठेची शोकेस, बोक्यान पाडलेलं त्यावरचं ॲक्वेरियम, तडफडणारे मासे, मानसिक धक्यान आजारी पडलेला रवी, दलिताकडच्या नोटाचा मात्र विटाळ न होणारे रवीचे ब्राह्मण वडील आणि शेवटी सवर्णाशी मुलीन लग्न ठरवलं हे रवीला सागताना कानकोंडी झालेली कथानायकाची आई तिची चूल सगळ्यातून खूप खोल अर्थाचे धुमारे फुटताहेत अस वाटत

त्याचप्रमाणे गावकऱ्यानी भटक्या लोकाची घरं जाळली ही खोटीच उमका उठवून त्या योगे भटक्या लोकाची उन्नती करायला निघालेले तथाकथित पुढारी आणि उद्धरेत आत्म आत्मानम् हा कुणीच न शिकवलेला मत्र अनुभवान अंगी बाणवून नवा सूर्योदय स्वत च्याच डोळ्यानी बघायला निघालेली भटकी जमात. यात लक्षात रहातो तो वेडेवाकडे चौकोन असून हातानेच पेरून शेती करण्याचा केलेला प्रयत्न. पिजऱ्यात फडफडणारा तीतर पक्षी, भुकणारं कुत्र, देवाच्या डोळ्यात अश्रू आले पण इतरांना ते पावसासारखे वाटले. अशा अर्थाचं गीत आठवणारी आणि पोटातल्या अंकुरामुळे हळवी झालेली गुलाबी.

स्वत: फुलून मामीला दगा देणारं लाल फुलाचं झाड आणि वेड लावणारा मनमोर कुठेतरी हलवतो. तसच रायसाहेबाना बेचैन करणारं आणि त्याच्या मनातली हिरवळ, ओलावा शोषणारं धुक आपल्यालाही अस्वस्थ करतं.

जे जे करायचं होतं, आहे आणि करायचं असूनही मनाशी दाबून ठेवलं त्या बदल्यात नकली प्रतिष्ठा मिळाली; पण जन्मभर मनाच्या तळाशी नादणाऱ्या त्या घरात गेल्यावर फेसाळून येणारा आनंद, मनावर शरीरावर रंगाच्या लाटाच्या लाटा उसळताहेत असा,अनुभव घेणारे एकाकी बापूसाहेब. किंवा भोवताली अरण्य आहे माणसं दबा धरून बसलीत श्वापदासारखी. अंधार आहे. कबूल आहे. असं असतं असं होतं; पण हमखास नाही देवाच्या दिशेन प्रकाशही येतो. त्याकडे तोंड करावं, त्याला स्मराव. ही माझी श्रद्धा आहे सगळेच लोक नेहमीच वाईट नसतात. हे सच्चा श्रद्धेच बळ असलेली आत्म्याच्या देठापासून बोलणारी 'अरण्य' मधील त्याची पत्नी किंवा स्मरणातली रात्र उपभोगणारा कसलातरी शोध घेणारा आत्ममग्न ठकाजी रामा अशा अनेक व्यक्तिरेखा विचाराला चालना देतात.

And they happily lived forever अशा चाकोरीबद्ध. भाबड्या नसलेल्या या कथाचा शेवट होतच नाही चौऱ्याशी लक्ष योनीप्रमाणे त्या चालतच रहातात. वाचकाच्या आत्म्याला स्पर्शत स्पर्शत.

सामणेंच्या भाषेत असलेल वजन सामान्य वाचकाला पेलवणारं नाही.

हा कलामक्त आत्म्याचा झपाटणारा हुंकार उत्तरोत्तर अधिकाधिक खोलपणे घुमत राहो. गाभाऱ्यातून येत असल्यासारखा हीच इच्छा. □

'लाल फुलाच झाड'
भारत सासणे
प्रतिमा प्रकाशन,
पृष्ठे : २२१
मूल्य : चाळीस रुपये.

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील

## 'आजचा नारा'

**शि**क्षणसंस्थांच्या दैनंदिन व वास्तव व्यवहाराकडं नजर टाकली म्हणजे असं दिसतं की आपला सगळा प्रयत्न 'कापीव माणसं' तयार करण्याचा असतो. जणू काही माणसांचे ठराविक पॅटर्न्स आम्ही मानलेले आहेत. त्या पॅटर्न्सच्या बाहेर जाण्याची गरज शिक्षकाला भासत नाही आणि विद्यार्थी त्या पॅटर्न्सच्या बाहेर गेला तर शिक्षकांना ते आवडत नाही. Conformity and not creativity हा जणू आमचा नारा आहे. हा नारा बदलायला हवा. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक व क्रियात्मक सृजनाला आवाहन करून, आव्हानं देऊन त्यासाठी चेतना पुरवून विविध शैक्षणिक पातळीवरील विद्यार्थ्यांच्या सृजनाला वाव देता येईल. Never tell a child anything that he can discover himself असं शिक्षणशास्त्रज्ञ पेस्टॉलॉझीनं एके ठिकाणी म्हटलं आहे. पेस्टॉलॉझीचं वाक्य राहातं पुस्तकात आणि सगळ्यांना एकाच साच्यात भरडण्याचा, व्यक्तिगत सृजनतेला वाव न देण्याचा आपला सरधोपट मार्गावरचा प्रवास प्रत्यक्षात चालू राहतो.


'बिकट वाट वहिवाट नसावी
धोपट मार्गा सोडू नको'
किंवा
'जनी वंद्य ते सर्व भावे करावे'

ही पूर्वजांची वाणी आपण अजूनही मानत आहोत. आपले हे परंपरागत आदर्श सृजनशीलतेला पोषक आहेत ?

सृजनशीलता कशाला म्हणायचं? गिलफर्ड नावाच्या विचारवंतानं फक्त दोन शब्दात सृजनशीलतेचं वर्णन केलेलं आहे. बहुकेंद्री विचारशक्ती ( Divergent Thinking ) म्हणजे सृजनशीलता. टॉरेन्स या विचारवंतानं त्याची अधिक तपशिलवार व्याख्या दिली आहे. साचेबंदपणाला विरोध म्हणजे सृजनशीलता–मौलिकता; परंपरागत साच्यापेक्षा वेगळा विचार, विविध कल्पनांची सरमिसळ करून नानाप्रकारे मांडणी; वस्तू, व्यक्ती, घटना, चित्रं इत्यादींमधील आंतरसंबंधांची उमज हे सृजनशीलतेचे घटक म्हणून टॉरेन्सनं सांगितले आहेत. सृजनशीलता या संकल्पनेची विविध अंगं थोडक्यात मांडायची झाल्यास पुढील गोष्टींची नोंद करावी लागेल. ( १ ) प्रवाहित्व– म्हणजे कोणत्याही विषयाच्या संदर्भात अधिकाधिक कल्पना, विचार, योजना सुचण्याची क्षमता (२) लवचिकता–विविध प्रकारच्या वैचित्र्यपूर्ण कल्पना, विचार, योजना सुचण्याची क्षमता ( ३ ) मौलिकता– सर्वसाधारण लोकांना सुचणार नाहीत अशा नाविन्यपूर्ण योजना, विचार, कल्पना सुचण्याची क्षमता (४) विस्तारीकरण– कोणत्याही बाबीतील अपूर्णता पूर्ण करण्याकडं, तिचा विस्तार करण्याकडं असलेला कल. ( ५ ) स्पंदनशीलता– कोणताही विचार, योजना, प्रसंग, व्यक्ती, शब्द, चित्र इत्यादींबद्दल चटकन मनात स्पंदनं निर्माण होण्याकडं प्रवृत्ती. ( ६ ) पुनर्मांडणीकरण– कोणत्याही जुन्या विचाराची, कल्पनेची, योजनेची, प्रसंगाची, चित्राची पुनर्मांडणी करण्याकडं असलेला कल.

सृजनशीलतेचं हे तात्विक विवेचन थोडं बोजड वाटलं का? परंतु शिक्षणात सर्जनशीलतेला मिळू पाहणारं महत्त्व हा एक नवा उन्मेष आहे. त्यामुळं हा थोडा अवघड भाग आपल्याला समजून घ्यायलाच हवा. सर्जनशीलतेचे वरील घटक लक्षात घेऊन पालकांना। शिक्षकांना आपल्या मुलाचा। विद्यार्थ्याचा कल सर्जनशीलतेकडं आहे की नाही हे सहज समजून घेता येईल. अगदी लहान वयातही काही मुलं एकाच वस्तूपासून वेगवेगळ्या वस्तू बनवीत असतात. ठराविक ठोकळे सर्व मुलांना दिले तरी काही त्या ठोकळ्यापासून विविध आकार बनवतात, तर काही चित्रात दाखविलेले आकार बनवून स्वस्थ राहतात. तुम्ही नवीन काही करून दाखविलं तर त्याप्रमाणं करण्याचा प्रयत्न काही मुलं करतात; परंतु स्वतःहून दाखविलेल्या नमुन्यापेक्षा वेगळा नमुना करण्यास प्रवृत्त होत नाहीत. लहान मुलाप्रमाणं प्रौढांतही सर्जनशीलतेची कमीअधिक झलक आपल्याला दिसते. आजीनं शिकवलेली वांग्याची भाजी तशीच्या तशी करणाऱ्या तिच्या नातीची वाखाणणी 'हुबेहूबपणाबद्दल' करता येईल. जुन्यात काही नव्याची भर घालून किंवा पूर्णतः नव्या प्रकारं वांग्याची भाजी करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या नातीला हुबेहूबपणापेक्षा नवीनतेबद्दल प्रशंसा लाभेल. आता प्रश्न असा की शिक्षणात आपणाला हुबेहूबपणा पाहिजे की नवीनपणा पाहिजे ? केवळ दुसऱ्याची कविता पाठ करणं पाहिजे की कविता रचणं पाहिजे ? चित्रकलेच्या शिक्षकांनी दाखविल्याप्रमाणंच चित्र काढणं हवं की स्वतःच्या कल्पना, पूर्वानुभव यांच्या आधारे स्वतःच चित्र बनविणं हवं ? सतत मार्गदर्शनासाठी खोळंबणं हवं की स्वतःच्या प्रतिभेनं पूर्तता करणं हवं ? परावलंबन हवं की स्वावलंबन हवं ? 'मुक्त शिक्षण' आणि 'बंदिस्त शिक्षणातही मुक्ततेला अवसर' या दोन लेखात आपण शिक्षणातील मुक्ततेबद्दल विचार केला आहे. सृजनशीलतेच्या व्याख्येकडं दृष्टी टाकताच आपल्या असं लक्षात येतं की सृजनशीलतेला आवाहन करताना शिकावयाच्या ठराविक आशयाला कमी महत्त्व प्राप्त होतं. शिकण्याच्या शेवटच्या टप्प्याला किंवा गुणांना परीक्षेतील कमी महत्त्व मिळून शिक्षणाद्वारे मिळणाऱ्या चेतनेला अधिक महत्त्व मिळतं.

सृजनशीलतेला पोषक अशी काही उदाहरणं आपण पाहू. पालक / शिक्षक एखादं विधान करतात आणि त्यासंबंधी जास्तीत जास्त प्रतिसाद देण्याचा मुलं प्रयत्न करतात. उदाहरणार्थ १) दुखापत करणाऱ्या वस्तू सांगा २) चाकांचा ज्यात उपयोग केला जातो अशा वस्तू सांगा. (३) गोलाकृती कोणकोणत्या वस्तूत दिसते ते सांगा. (४) आवाज करणाऱ्या वस्तू सांगा. (५) वर्तमानपत्र किती वेगवेगळ्या प्रकारे वापरता येईल ते सांगा. (६) खुर्ची कोणकोणत्या प्रकारे वाप-



रता येईल हे सांगा. (७) खुर्ची व टेबल यातील सारखेपणा सांगा. (८) गाजर व बटाटा यातील साम्य सांगा. (९) a या अक्षरात प्रत्येक वेळी एकच बदल करून वेगवेगळी अक्षरं तयार करा. (१०) अपूर्ण कविता, गोष्ट, चित्र पूर्ण करा. (११) वर्तमानपत्रांचा वापर करून नाटकातील पात्रांची वेशभूषा तयार करा. (१२) तुमच्या नाटकात झाडे, नदी, प्राणी, दाखवायचे आहेत, रंगमंचावर या गोष्टी प्रत्यक्ष न दाखवता प्रेक्षकांना त्या प्रतीत व्हाव्यात यासाठी तुम्ही काय करू शकता ते करून दाखवा. (१३) दाखविलेल्या चित्रातील अपूर्णता ओळखा. (१४) तुम्हाला सांगितलेल्या गोष्टीचा वेगळ्या प्रकारे शेवट करून दाखवा. (१५) तुम्हाला माहीत असलेल्या नाटकात एकच नवं पात्र घालून नाटक लिहा. (१६) घरात बादलीभरच पाणी आहे. चार माणसांची आंघोळ कशी उरकायची ते सांगा. (१७) जोंधळ्याचा वापर करून नेहमी न बनविला जाणारा पदार्थ तयार करा. (१८) नवी विशेषणं सांगा– उदाहरणार्थ 'तो मुळूमळू रडू लागला' या वाक्यातील 'मुळूमुळू' या ऐवजी तुम्ही नवी विशेषणं बनवून घाला. (१९) क्ष या अक्षरानं सुरू होणारे जास्तीत जास्त शब्द सांगा. (२०) 'मा' ह्या अक्षरानं सुरू होणारी विशेषणं/क्रियापदं सांगा. (२१) शवटी 'दार' ही अक्षरं येणारी विशेषणं सांगा. (२२) विविध आवाज दाखविणारी विशेषणं सांगा. (२३) तो स्वभावानं अगदी गरीब आहे हे सांगण्यासाठी तो कोणासारखा गरीब आहे असं म्हणता येईल हे सांगा. (२४) पुढील कविता पूर्ण करा.

१) 'गा ना ग गीता'

२) ही बघा आली चित्रा

(२५) 'धाडकन' या शब्दातील एक अक्षर बदला व नवीन शब्द तयार करा. (२६) पुढील विषयासाठी आकर्षक जाहिरात तयार करा. तुमची शाळा, आईनं बनविलेली उसळ, विकायला काढलेला सोफासेट (२७) घोषणा तयार करा. कोणताही विषय घ्या. (२८) कोडी तयार करा. (२९) तुमच्या खोलीत नव्या प्रकारची खिडकी बसवायची आहे– खिडकीची डिझाईन्स काढून द्या. (३०) तुम्ही शिकलेल्या प्रमेयावरील रायडर्स सोडवा

ही यादी केवळ नमुन्यादाखल केलेली आहे. यादीकडे नजर टाकताच आपल्या लक्षात आलंच असणार की सर्जनशीलतेला पोषक असे कितीतरी प्रसंग शाळाशाळांत/घराघरांत आयोजिता येतील.

विद्यार्थ्यांची / मुलाची सृजनशीलता ज्यामुळं विकास पावू शकत नाही अशा गोष्टी कोणत्या बरं? (१) अभ्यास व खेळ यात परस्पर विरोध आहे असं मानणं. (२) प्रत्यक्ष वास्तवावर अवास्तव भर व कल्पना विलासाला मिळणाऱ्या प्रोत्साहनाचा अभाव. (३) वेगळेपणा दाखवल्यास शिक्षा होईल ही विद्यार्थ्यांच्या मनात कोरलेली भीती (४) परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या आशयावर भर. (५) उत्स्फूर्ततेला न मिळणारी दाद. (६) स्वत:ची भाषा, विचार पद्धती व आशय लादण्याकडं शिक्षकांचा व पालकांचा असलेला कल. (७) सर्जनशील विद्यार्थ्यास सर्वसाधारण पालकाकडून / शिक्षकाकडून मिळणारी 'विक्षिप्त', 'चहाटळ', 'अवलिया' अशी बिरुदं (८) चारचौघांसारखं वागावं, बोलावं, लिहावं या प्रस्थापित नीतीचा दबाव (९) पालक व मुलं, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील ताठर नातेसंबंध.

सृजनशीलतेला वाव द्यायचा म्हणजे शिक्षणाची आजची सारी चौकट मोडून टाकलीच पाहिजे असं नाही. आमच्या 'सृजन आनंद शिक्षण' वर्गातली काही उदाहरणं सांगते.

किस बाई किस दोडका किस
आणिक किस बाई आणिक किस
हे धृपद बदलून
किस बाई किस दोडका किस
कशी बसू मी अभ्यासाला ऐसपैस

हे धृपद आम्ही सुचवलं आणि अभ्यासात व्यत्यय आणणारे लोक काय काय सांगतात हे तुम्ही कवितेत सांगायचंय असं म्हटलं. त्यावर–

आई म्हणते मेथीची जुडी आधी आण
बाबा म्हणतात शेजारचा पेपर आधी आण
काका म्हणतो सिगरेटचं पाकिट आणून दे
आजोबा म्हणतात खिडकीतला चष्मा आधी आण
छोटचा म्हणतो बागेतला हत्ती दाखवून आण

अशा ओळी तयार केल्या गेल्या व त्या ओळींनंतर

'मग सावकाश अभ्यासाला बैस'

ही ओळ सांगितली.

Grandmother या शब्दातील अक्षरं वापरून विद्यार्थ्यांनी पन्नास शब्द बघता बघता तयार केले. m+on+ किल्लीचे चित्र अशा प्रकारचं कार्ड दाखवल्यावर, Pa+ लेसचा तुकडा, टेबलाचं चित्र + कापडाचा

तुकडा. s + झाडाचं चित्र + t अशी कार्डे मुलांनी तयार केली. एका शिक्षिकेनं कवितेची पुढील ओळ सांगितली.

'आवडक चवडक हत्ती आला डुलत डुलत'

व त्यानंतर वर्गाचे दोन गट केले. एका गटानं प्राण्याचं नाव सांगायचं व दुसऱ्या गटानं त्या प्राण्याचं नाव व योग्य क्रियापद वापरून वरच्यासारखीच कवितेची ओळ तयार करायची असं आवाहन केलं. या आवाहनानंतर कवितेच्या पुढील ओळी तयार झाल्या.

आवडकचवडक मनी आली लपतछपत
आवडकचवडक कुत्रा आला भुंकतभुंकत
आवडकचवडक म्हैस आली रेकतरेकत
आवडकचवडक गाय आली पळतपळत

घोषणा तयार करणं हे माध्यमसुद्धा सृजनशीलतेच्या विकासासाठी वर्गात वापरलं गेलं. सृजनवर्गासंबंधीच घोषणा तयार करा असं म्हटल्यावर कितीतरी घोषणा तयार झाल्या. काही घोषणा ऐकताय ?

गाऊ या खेळू या, सृजनवर्गात जाऊ या
आमची आवड, सृजनवर्ग
हवाच हवा, सृजनवर्ग हवा
फूल गळेल, गवत सुकेल, सृजनवर्ग टिकेल
खाऊत खाऊ, स्मितातार्इंचा खाऊ

इंग्रजीत गोष्ट लिहायची आणि तीही पाचवीतल्या मुलांनी ही कल्पनाच बंदिस्त चौकटीत असंभवनीय वाटते; परंतु सृजन आनंद वर्गातील मुलांना तसं वाटलं नाही. My Pen, My Dog अशा विषयांवर मुलांनी गोष्टी लिहिल्या. आपल्याला जे म्हणायचं आहे त्यासाठी इंग्रजी शब्द माहीत नसल्यास तो शब्द दाखविणारं चित्र काढण्याची अथवा चित्र चिकटवण्याची मुभा होती. पाच-सहा वाक्यांच्या सुंदर गोष्टी मुलांनी लिहिल्या. सृजन वर्गाच्या शेवटच्या कार्यक्रमाला येण्याचं आमंत्रण देण्यासाठी मुलांनीच निमंत्रण पत्रिका तयार केल्या. नानाप्रकारे मुलांनी आपली निमंत्रणपत्रिका सजवली व दोनचार वाक्यांत आईवडिलांनी यावं असं सांगितलं. स्वत:च बसवलेली नाटकही मुलांनी सादर केली. 'बाजार' या विषयावर नाटक तयार करताना विविध प्रकारचे माल विकणारे लोक, त्यांच्याकडं येणारी नाना गिऱ्हाईकं, त्या दोघांत चालणारा संवाद, मालाच्या दराबद्दल चालणारी घासाघीस, गिऱ्हाईकांत होणारे संवाद, होणारी भांडणं, मालविक्या लोकांना उगीचच दटावणारा व पैसे गोळा करणारा पोलीस असे नाटकातले विविध बारकावे तयार होत गेले. दरवेळी नाटकात नवा आशय, नवी पात्रं, नवा अभिनय यांची भर पडत गेली.

सृजन आनंद शिक्षणाच्या वरील प्रयोगातील अनुभव मुख्यत: काय सांगतात ? जे शिकवायचं आहे त्यासाठी विविध माध्यमांचा वापर करावा. तुमच्या मनातला आशय मुलांच्या मनात ओतू नये. त्यांच्या मनातील आशय त्यांना मुक्तपणं सांगावासा वाटेल असं पोषक वातावरण असावं. 'इयत्ता पाचवीतल्या मुलांनी कविता करायची नसते. ती फक्त शिकायची असते' अशा प्रकारची ठोकळेबाज समीकरणं ग्राह्य मानून विद्यार्थ्यांच्या आविष्काराला गवसणी घालू नये. विषय शिकविताना वापरावयाचा प्रत्येक प्रसंग हा माध्यम असतो. घोषणा तयार करताना मुलं भाषा शिकत होती. कविता रचताना त्यांना वृत्तांचं तांत्रिक ज्ञान नसलं तरी ओळीत काही बदल करायला हवा हे त्यांना कळत होतं. एका शब्दापासून अनेक शब्द तयार करताना विद्यार्थी अक्षरांची फिरवाफिरव करून आपल्याला येत असलेले शब्द आठवत होते. 'किस बाई किस' सारखी कविता रचताना घरातल्या अनुभवांचा वापर करून भाषेद्वारे त्यांचा आविष्कार करीत होती.

भूतकालावर भर असलेली आपली आजची शिक्षणपद्धती सर्जनशीलतेला पोषक नाही. आजच्या शिक्षणपद्धतीतील अनेक प्रकारचा बंदिस्तपणा सर्जनशीलतेला विघातक ठरतो. आज शाळांत आम्ही विषयांचा क्रमिक पुस्तकातील आशय शिकवतो; परंतु शिकावयाचा विषय व क्रमिक पुस्तक हेच साध्य बनतं. आजचं जीवन इतकं गतिमान बनलं आहे की आज शिक्षणसंस्थात असलेल्या तुमच्या-आमच्या मुलांना पोपटपंची शिकवून ती त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी पडणार नाही. म्हणूनच सृजनशील शिक्षक व सृजनशीलतेला पोषक असं शैक्षणिक व कौटुंबिक वातावरण ही आज काळाची गरज आहे.

आजच्या शाळांत सृजनशील मुलं दुर्लक्षित, उपेक्षित, आहेत. या संदर्भात 'शाही बहिरीससाणा' नावाची गोष्ट आपल्याला बरंच काही शिकवून जाईल. एके दिवशी नसरुद्दीनला एक शाही बहिरीससाणा दिसला. असल्या प्रकारचं कबुतर त्यानं कधी पाहिलं नव्हतं. तेव्हा त्यानं धारदार कात्रीनं त्या ससाण्याच्या पंजाची नखं, पंख आणि चोच कातरून सर्वसाधारण कबुतरासारखं त्याचं रूप बनविलं. नसरुद्दीन म्हणाला, 'आता कुठं तू खऱ्या कबुतरासारखा दिसू लागलास.' त्या बहिरीससाण्याप्रमाणंच आज सृजनशील विद्यार्थ्यांनाही 'चांगला विद्यार्थी' बनविलं जात आहे; पण हे थांबायला हवं. creativity and not conformity हा आता आजचा नारा बनायला हवा.

□



# चार्ली चॅपलिन नंतरचा सर्वांत मोठा विनोदी नट... पिटर सेलर्स

● रघुपती भट ●

एक नकल्या माणूस! लहानपणापासून त्याला नकला करायचा नाद होता. कधी सिनेमानटाची, तर कधी एखाद्या बड्या पुढाऱ्याची. त्यांचा आवाज आणि त्यांच्या अदा हुबेहूब पेश करणं यात त्याला कमालीचा आनंद व्हायचा. वेगवेगळे आवाज, बोलण्याच्या पद्धती यावर त्याचे कमालीचे प्रभुत्व होते. तो शाळेत होता तेव्हा खास मुलींना आकर्षित करण्यासाठी तो प्रत्येकीच्या आवडत्या नटाची स्टाईल करून दाखवायचा. युद्धकाळात त्याला सैन्यात भरती व्हावं लागलं तेव्हा स्टेजवर करमणुकीचे प्रयोग करायचे आणि फावल्या वेळात 'अफसर' बनून वेगवेगळ्या छावण्यांना भेटी देणे हा त्याचा आवडता कार्यक्रम. अफसर लोकांच्या वागण्याच्या पद्धतीचा त्याने एवढा सखोल अभ्यास केला होता की तो सैन्यातून निवृत्त झाला तरी अनेक सोजिरांना आपल्या कॅम्पस्ना भेटी देणारा मनमिळाऊ अफसर आपल्यासारखाच एक सोजिर होता याचा पत्ता लागला नव्हता.

त्याच्या या नकला करण्याच्या कौशल्याने त्याने अनेक कार्यक्रम मिळवले. बी. बी. सी. च्या मालिकात प्रवेश मिळवला. बी. बी. सी. वरच्या त्याच्या नकला अतिशय लोकप्रिय झाल्या. 'शो टाइम' नावाच्या कार्यक्रमातील त्याच्या अनेक आवाज काढण्याच्या खुबीवर आणि निरनिराळी प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वे पेश करण्यामुळे इंग्लंडमधील सर्वोत्कृष्ट नकलाकार अशी त्याने ख्याती मिळवली. पुन्हा त्याने इंग्लंडमध्ये सर्वत्र फार्सेस सादर करायला सुरुवात केली. त्याचं नाव म्हणजे हास्याचा धबधबा असं समीकरण झालं होतं. 'गून शो' नावाचा एक कार्यक्रम तो सादर करू लागला. या 'गून शो'मध्ये अनेक विक्षिप्त व्यक्तिरेखा साकार करून त्याच्या माध्यमातून सामाजिक हास्यास्पद गोष्टी लोकांना परिणामकारकरीत्या दाखवणे हा त्याचा कार्यक्रम असे. यातूनच त्याने स्वतःची एक वेगळी शैली तयार केली.

'गून शोज्' मध्ये विविधता असायची. गून्स म्हणजे अगदी साधा स्वभाव असलेले. जरा जरी गुंतागुंत असली तरी कोड्यात पडणारे महाभाग. मध्यंतरी एक 'क्रेझी बॉइज्' सेरीज आली होती त्याप्रमाणे त्यांचा सर्वत्र गोंधळ असे. बी. बी. सी. चे श्रोते अगदी आतुरतेने या कार्यक्रमाची वाट पाहात असत. या 'गून शो' वरून वृत्तपत्रात विनोद यायचे, विनोदी चित्रमालिका सादर केली जायची.

या कार्यक्रमामुळे त्याची प्रसिद्धी इतकी धमाल वाढली की, अनेक निर्मात्यांचे आणि दिग्दर्शकांचे त्याच्याकडे लक्ष वेधले. त्याला घेऊन मालिका तयार करण्याचे विचार टिव्हिवाल्यांच्या डोक्यात घुमू लागले. 'गून शो'मुळे त्याला पैसे खूप मिळू लागले होते आणि तो आर्थिक दृष्ट्या बराच स्थिर झाला होता.

'बीट द डेव्हिल' नावाच्या चित्रपटात त्याने हंफ्रे बोगार्टचे काही संवाद म्हटले. 'अवर गर्ल फ्रायडे'मध्ये पोपटाचा आवाज काढला. त्यानंतर 'द मॅन व्हू नेव्हर वाज'-मध्ये त्याला 'विन्स्टन चर्चिल'च्या आवाजाची हुबेहूब नक्कल करावी लागली. 'गून शो'मधील त्याचे मित्र गैरहजर असले तर त्यांच्या भूमिकासुद्धा आवाज बदलून तोच करायला लागायचा. त्यामुळे वर्तमानपत्रांनी त्याला 'मॅन ऑफ मेनी व्हायसेस' अशी पदवी बहाल करून टाकली होती.

त्याच्या मनात आता नट बनायची महत्त्वाकांक्षा घर धरू लागली होती. केवळ इतरांचे आवाज काढून दाखवू शकणारा एक नकलाकार एवढीच आपली प्रतिमा बनू नये असं त्याला वाटू लागलं होतं. 'लेटस् गो क्रेझी' नावाच्या एका फार्सिकल चित्रपटात त्याला काम मिळालं, पण तो चित्रपट म्हणावा तेवढा कोणाच्या नजरेत भरला नाही. त्याचा नकलाकार म्हणूनच त्यात उपयोग करून घेण्यात आला होता. अभिनय कलेशी अजून त्याचे पुरते जमले नव्हते, म्हणून त्याचा हा खरं म्हणजे पहिला चित्रपट त्याच्या नावावर हिशेबात धरत नाहीत.

'गून शो' मधल्याच व्यक्तिरेखा एका कथासूत्रात बांधून 'गून शो' मधील त्याच्या सहकाऱ्यांसमवेत काढलेला **'पेन्नी पॉइंटस् टू पॅराडाईज'** हा त्याचा पहिला चित्रपट मानण्यात येतो. यात त्याने एक विनोदी मेजर रंगवला होता. १९५१ च्या या चित्रपटानंतर पुन्हा १९५३ मध्ये 'डाऊन अमंग द झेड मेन' मध्ये तो परत सगळ्या गून कलाकारांबरोबर मेजर ब्लडनॉक म्हणून चमकला. या चित्रपटात 'गून शो' चे सगळे गुण होते

म्हणून 'जॉन रेडवे' नावाच्या प्रसिद्ध कलाकार दिग्दर्शकाचे त्याकडे लक्ष वेधले. त्याने ब्रिटिश पिक्चर्स असोसिएशनला या सगळ्या 'गुन' गुणी कलाकारांना करारबद्ध करण्याची सूचना केली होती; पण ही सूचना डावलली गेली त्यामुळे एक विनोदी चित्रपट मालिका बनवण्याची चांगली संधी वाया गेली; पण रेडवेचे मत योग्य होते हे लवकरच सिद्ध झाले.

त्यानंतर १९५३ मध्ये 'ऑर्डर्स आर ऑर्डर्स' नावाचा चित्रपट आला. श्रेयमालिकेत त्याचे नाव जरी खाली असले तरी त्याच्यामागे 'विथ' हा शब्द आता आला होता. त्याचा अर्थ त्याची वाढलेली लोकप्रियता, त्याची शैली आणि त्याच्यातील नट निर्माता–दिग्दर्शकांनी मान्य केला होता. त्याच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेचा सुगावा रेडवेला लागला होता.

'ऑर्डर्स आर ऑर्डर्स'मध्ये बिल फ्रेजर बरोबर तो एक सोजिर होता. याशिवाय त्यामध्ये त्याच्यापेक्षा गाजलेले विनोदी नट होते. या चित्रपटाच्या पहिल्या शोवेळी सगळे कलाकार बोलत होते. सगळ्यांच्या लक्षात आले होते की चित्रपटात सगळ्यात जास्त प्रभावी कोण ठरलय.

स्वतःच्या स्वातंत्र्य शैलीमुळे फारसं काही न करता सुद्धा तो प्रभावी ठरला होता.

त्यानंतर त्याने 'जॉन अँड ज्युली' नावाच्या एका चित्रपटात पोलिसाची भूमिका केली. आता त्याच्याबद्दल अपेक्षा वाढू लागल्या होत्या. त्याबरोबर त्याची किंमतही वाढत चालली होती. येणाऱ्या पैशाबरोबर त्याचा खर्चही वाढत चालला होता. भरमसाठ किंमतीच्या गाड्या खरेदी करणे आणि मोठमोठ्या पार्ट्या देऊन आनंद साजरा करणे हेसुद्धा त्याला आता सहजपणं करता येत होत. त्याची बायको ॲन नवऱ्यातील बदलानं सचिंत बनली होती. तो आता अस्वस्थ असायचा, ऱ्धी एकदा आपल्याला मोठी संधी मिळतेय यासाठी तो बेचैन होता.

१९५५ मध्ये 'लेडीकिलर्स' नावाच्या एका चित्रपटात त्याला बॉक्सरची भूमिका चालून आली. सुरुवातीला दिग्दर्शक त्याला ही भूमिका द्यायला तयार नव्हता. 'मोडलेलं नाक आणि कॉलीफ्लॉवरसारखा काळा त्याला शोभणार नाही' अस तो म्हणत होता; पण निर्मात्यानं दिग्दर्शकाचं न ऐकता त्याला ही भूमिका दिली.

या चित्रपटाच्या निमित्ताने प्रसिद्ध सिनेनट 'ॲलेक गिनेस' यांच्याबरोबर त्याचा संबंध आला. पुन्हा काही काळानंतर दुसरा ॲलेक गिनेस म्हणून तो ओळखला जाणार होता; पण यावेळी मात्र ॲलेक गिनेसपुढे तो कोणीच नव्हता. ॲलेक फक्त विनोदी नव्हे तर 'अभिनया'त अत्यंत नाणावलेला मनुष्य होता. ॲलेकने त्याला खूप मार्गदर्शन केले. भूमिका बदलून कशा जायच्या याची प्रात्यक्षिके करून दिली आणि एक महत्त्वाचा सल्ला दिला, 'एकाच प्रकारची भूमिका दुसऱ्यादा करू नकोस.'

### प्रेक्षकांची पकड

ॲलेकचा त्याच्यावर खोलवर परिणाम झाला. आपल्या अभिनयात ॲलेकप्रमाणे जान यावी यासाठी तो प्रयत्न करू लागला. एखाद्या प्रसंगात एखादं व्यक्तित्व ओतणं आणि पुन्हा त्याबरोबर कोणी संबंध जोडू नये इतपत अलिप्त असणं हे तो शिकला. ॲलेक गिनेसला अनेक समीक्षक 'चेहरा नसलेला' नट म्हणतात हे वैशिष्ट्य आपल्यामध्ये आणण्याचा त्याने प्रयत्न केला. फक्त विनोदी बनण्यापेक्षा चरित्र अभिनेता बनणे हे त्याने आपले ध्येय ठरवल. 'ॲलेक' ला इलिंग कॉमेडीज्चा मोठा आधार होता, त्याप्रमाणे त्यालाही आधार मिळाला तो बोल्टिंग बधुंचा.

त्याचे नाव आता प्रसिद्ध झाले असले तरी तावडतोब त्याला कामं मिळाली नाहीत. पण त्याच्या मुलाखतीतून त्याची चरित्र अभिनेता बनण्याची आस दिसू लागली. मॅन ऑफ मेनी व्हाईसेस किंवा नकलाकार म्हटल्यावर त्याच्या कपाळावर आठी दिसू लागली. 'अ शो कॉल्ड फ्रेड' नावाचा एक गून शो सारखा कार्यक्रम यशस्वी झाला होता पण त्यावरून लोकांनी आपल्याला फक्त विनोदी नट म्हणून ओळखू नये अशी त्याची तीव्र इच्छा मुलाखतीतून तो बोलून दाखवू लागला.

त्याला समाधान देणारी भूमिका १९५७ च्या द स्मॉलेस्ट शो ऑन अर्थ मध्ये त्याला मिळाली. त्यात तो ६८ वर्षाचा प्रॉजेक्शनिस्ट झाला होता. त्याच वय त्यावेळी ३० वर्षाचं असल्यामुळे तो ही भूमिका निभावू शकेल काय याबद्दल सगळ्यांना शंका होती; पण टेलिव्हिजनवर त्याने एका म्हाताऱ्याचे काम केले होते त्यामुळे त्याला ही भूमिका देण्यात आली. या चित्रपटामुळे त्याला ऑफर्स चालू झाल्या.

१९५८ च्या द नेकेड ट्रुथ ने त्याच्यातील अभिनय सिद्ध केला. यात त्याने एकाच वेळी अनेक भूमिका केल्या. यात तो क्विझमास्टर होता, झोपडपट्टी दादा होता, म्हातारा अधिकारी होता, खेळाडू होता आणि एक मनमिळाऊ पोलिस होता. या अनेक भूमिकात कौशल्य ओतून वेगवेगळेपण जाणवण्याचा त्याने जो प्रयत्न केला होता त्याबद्दल समीक्षकांनी त्याची पाठ थोपटली. 'ब्रिटनमधील सर्वात मोठा नट', चॅपलिननंतर स्वतःची शैली असणारा सर्वात महान ब्रिटीश कलाकार अशी वाहवा त्याने मिळवली.

'ब्राऊहाहा' नावाच्या एका राजकीय उपहासात्मक नाटकामध्ये त्याने काम केले. सिनेमा आणि टीव्ही सोडून त्याने मधूनच हा विश्राम घेतला होता. या नाटकाच्या प्रत्येक प्रयोगाच्या वेळी स्वतःच्या कल्पना तो राबवत असे. एकेकदा नाटकातील संवाद सोडून स्वतःचे वेगळेच संवाद तो म्हणे. प्रेक्षकांच्या मनाची त्याने इतकी पकड घेतली होती की, त्याने काही केले तरी प्रेक्षकांना ते खपत असे.

एकदा 'ॲलेक गिनेस' ला सर पदवी मिळाल्याच्या आनंदात एक जंगी पार्टी झाली. या पार्टीला जाऊन आल्यावर तो तर्र होता. त्या अवस्थेतच तो स्टेजवर आला. धुंद डोळ्याने त्याने प्रेक्षकांकडे पाहिले आणि तो म्हणाला,

'मित्रहो, मी आज जरा धुंद आहे. नाटकाच्या ओळी मला आठवत आहेत, पण आज ते नकोच. आज काही वेगळेच होऊ दे'

प्रेक्षकांनी त्याला समजून घेतले आणि मग प्यायलेल्या अवस्थेत त्याने प्रेक्षकांची मनसोक्त करमणूक केली.

कारण तो 'बेहोश' असला तरी त्याची कला बेहोश नव्हती.

पण प्रेक्षकांना ते मंजूर असले तरी रंगभूमीच्या उपासकांना ते मंजूर नव्हते. त्यांनी फतवा काढला.

'रंगभूमी, प्रेक्षक आणि संचालक मंडळी यांना जर योग्य न्याय द्यायचा असेल तर

पीटर सेलर्स यांनी इथून पुढे रंगभूमीवर यायचे बंद करणे शहाणपणाचे होईल.'

आणि तो फतवा मंजूर करून त्याने रंगभूमी सोडली.

त्यांनंतर पीटर सेलर्स फक्त सिनेमा क्षेत्रातच राहिला.

'पीटर सेलर्स' च्या जीवनात चढउतार बरेच येत राहिले. द नेकेड ट्रूथ वगैरे चित्रपटांनी त्याला पैसा मिळवून दिला वगैरे गोष्टी खऱ्या असल्या तरी म्हणावे तसे यश त्याला अजून मिळाले नव्हते. 'जॉन रेडवे' या एकेकाळच्या दिग्दर्शकाने आणि आताच्या एजंटने त्याला काही चित्रपटात काम दिलं होतं. पण या चित्रपटांनी फक्त त्याचं अस्तित्व तेवढं जपलं होतं. एक दिवस रेडवेने बोल्टिंग बंधूंपैकी रॉयला फोन केला आणि 'पीटर सेलर्स' कडे एक नजर टाकायला सांगितलं. रॉयला रेडवेच्या सल्ल्याबद्दल आदर होता कारण रॉय म्हणतो,

'मागं एकदा त्यानं एका मुलीकडं नजर टाकायला सांगितलं होतं. आम्ही टाकली आणि आम्हाला त्या मुलीमध्ये कॅमेऱ्याच्या दृष्टीतून अनेक कमतरता तिच्या चेहऱ्यात आढळल्या. डोळे मोठे! तोंड पसरट! नाक फारच लहान. आम्ही ते रेडवेला सांगितलं. ती मुलगी अगदीच निराशाजनक निघाली होती. ती मुलगी म्हणजे दुसरीतिसरो कोणी नसून आद्रे हेपर्न्न होती. म्हणून या खेपेला आम्ही जरा बारकाईनं बघायचं ठरवलं.'

जॉन बोल्टिंगनं पीटरचं टीव्हीवरील काम पाहिलं कसलाही मेकप न करता एका उपहास करीत राहणाऱ्या शाळा मास्तरची भूमिका त्याने केली होती. जॉनला आणि त्याचा भाऊ रॉय या दोघांनाही जाणवलं की रेडवेचं मत बरोबर आहे. पीटरच्या अभिनयावर आणि ॲलेक गिनेससारख्या आवाजावर ते खूष झाले आणि तावडतोब त्यांनी पीटरला ५ वर्षांसाठी करारबद्ध करून टाकलं.

हे बोल्टिंग बंधू म्हणजे यशस्वी चित्रपट निर्माते होते, सामाजिक प्रहसनांची यशस्वी मालिकाच त्यांच्यामागे होती.

बोल्टिंगनी पीटरला घेऊन 'कार्लटन ब्राऊन ऑफ द एफ ओ' नावाचा एक चित्रपट तयार केला. यात पीटरला एका ब्रिटिश कॉलनीच्या पंतप्रधानाची भूमिका होती.



□

**पीटर सेलर्स—**
**विनोदापलीकडे**
**बरेच काही**

□

रॉयला माहिती होते की, ही भूमिका एका प्रसिद्ध वितरकावर घेतली होती. रॉयने त्या वितरकाच्या वागण्याच्या पद्धतीची पीटरला थोडक्यात कल्पना दिली आणि बघता बघता पीटरने ती भूमिका आत्मसात केली हे एक सामाजिक प्रहसन होते.

त्यानंतर '**आय ॲम ऑल राइट जॅक**' नावाचे एक प्रहसन, ज्यामध्ये ब्रिटनमधील संचालक मंडळी आणि कामगार व्यवहारावर उपहास होता, त्यात पीटरला कामगार पुढाऱ्याची भूमिका होती. त्यावेळी इंग्लंडमध्ये कामगारांच्या चळवळी जोरात होत्या. या चळवळीचे पुढारी सर्वत्र दिसायचे. पीटरने त्या सगळ्यांचे बारकाईने निरीक्षण केले. त्यांच्या कपड्यांच्या पद्धती, बारीक केस वगैरे आणि दुसरा कसलाही मेकअप न करता केवळ ह्या सवयी आत्मसात करून त्यानं ती पुढाऱ्याची भूमिका केली.

एकदा काही कामगारांनी शूटिंग बघितलं आणि पीटरच्या आविष्कारात आपला नेता दिसल्यावर ते मनमुराद हसले. कामगारांनी दिलेल्या त्या प्रतिसादाने पीटर खूश झाला. मग त्या भूमिकेत आणखीन जान आली.

पण बोल्टिंगनी पीटरमधील आणखी एक पैलू बघितला 'आय ॲम ऑल राइट जॅक' चे शूटिंग चालू असताना पीटर कामगार नेता बने. ते भूत त्याच्या मानेवरून उतरायचेच नाही. तो पीटर सेलर्स नव्हताच. कॅंटीनमध्ये चहा पिताना, जेवताना, घरी जाताना तो कामगार नेत्याप्रमाणेच वागायचा. त्याची बायको ॲन हिलाही ते जाणवले. तो घरीसुद्धा त्याच मूडमध्ये असायचा. तो चित्रपट पूर्ण होईपर्यंत तो अंतर्बाह्य कम्युनिस्ट नेता बनून राहिला होता.

या चित्रपटाला समीक्षकांनी नावाजले. फक्त विनोदापेक्षा पीटरकडे आणखीही काही बरेच आहे हे सगळ्यांना जाणवले. पीटरची ती भूमिका म्हणजे एक क्रेझ झाली बोल्टिंग बंधूंनी पीटरची क्षमता ओळखली होती आणि त्याला पैलू पाडले होते.

या चित्रपटाने 'पीटर' चा अभिनय सिद्ध केला; पण पीटर अमेरिकेत पोचला तो त्यापूर्वीच्या '**द माऊस दॅट रोअर्ड**' या चित्रपटाने. या चित्रपटात पीटरने तीन भूमिका केल्या होत्या. पंतप्रधान, ग्रॅंड डचेस आणि सरसेनापती. या चित्रपटात तसा सामाजिक उपहासच होता; पण अमेरिकन्सना तो आव-

ढला. विशषत: मध्यमवर्गीयांना. अनेक चित्रपटगृहातून तो बराच काळ चालला आणि पीटर सेलर्स हे नाव अमेरिकेत सर्वतोमुखी झाले.

'आय ॲम ऑल राइट जॅक' आणि 'द बॅटल ऑफ दी सेक्सीस' या दोन चित्रपटांच्या निमित्ताने पीटरने अमेरिकेला पहिली भेट दिली. या भेटीवेळी अमेरिकेबद्दल त्याचं फारसं चांगलं मत झाल नाही. चार्ली चॅपलीनला अमेरिकेकडून जी वागणूक मिळाली होती त्याबद्दल वाचून त्याचं मत तयार झाल होतं. एका मुलाखतीत तो म्हणाला.

' चॅपलीन हा फार मोठा कलावंत आहे, आणि राजकारण ? ते खड्डयात जावो !'

तो अमेरिकेहून परत येताना त्याची आणि सोफिया लॉरेन ची भेट झाली. ' द मिलियनरेस ' या चित्रपटासाठी ते दोघे प्रथमच एकत्र येत होते. सोफियाचा नवरा कार्लो पाँटी याने त्याबद्दल नाखुशी व्यक्त केली होती. कारण सोफिया त्यावेळी प्रसिद्धीच्या शिखरावर होती आणि तिच्या मानाने पीटर कोणीच नव्हता; पण निर्मात्यानी पीटरची निवड अगदी विचारपूर्वक केली होती. त्यापासून ते माघार घेणार नव्हते.

## अंधार–प्रकाश

सोफियासारख्या प्रसिद्ध तारकेबरोबर काम करताना पीटरचा आत्मविश्वास दुणावत गेला. सोफिया त्याच्यावर खूश होती. त्याचे संबध केवळ सहकलाकार एवढेच न रहाता ते अधिक सखोल बनले. त्यामुळे पीटरचे कौटुंबिक आयुष्य मात्र उध्वस्त झाले. सोफियाने मात्र एका मर्यादेपर्यंतच हे संबंध जपले. कार्लो पाँटीला गमावणे तिला परवडण्यासारखे नव्हते. नंतर मात्र तिने पीटरबरोबर काम करायचे टाळले आणि पुन्हा प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रात तिने पीटरबरोबरच्या प्रेमप्रकरणाचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळला.

' मिलियनरेस ' मधील पीटरची भूमिका मात्र अतिशय गाजली त्यातील भारतीय डॉक्टर त्याने सुंदर रंगवला. त्यातली ' गुडनेस् ग्रेसश मी ! ' असं म्हणण्याची त्याची लकब सर्वतोमुखी झाली. त्या गाण्याच्या रेकॉर्डस् दोन लाख एवढ्या खपल्या. पीटर एकदा भारतात येऊन गेला होता. त्यावेळी भारतीयांचे केलेले निरीक्षण त्याला या चित्रपटात उपयोगी पडले.

या यशानंतर पीटरने अपयशाची चव चाखली ती ' मि. टोपॅझ ' मध्ये. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका त्याची होती. दिग्दर्शनात तो कमी पडला. त्याची प्रमुख भूमिका जरी चागली झाली तरी प्रेक्षकानी त्याला चागला प्रतिसाद दिला नाही. या अपयशाने पीटरच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आपली जागा सुरक्षित करण्याच्या भावनेने पुन्हा एकदा गून शो करावा असं त्याला वाटू लागलं. .

तेवढ्यात ' ओनली टू कॅन प्ले ' नावाचा एक चित्रपट त्याच्यापुढे आला. यातली भूमिका पीटरने अगदी समरसून केली. यातील ग्रंथपालाची भूमिका करताना पीटरने ' वेल्श ' छटा वापरली.

हा चित्रपट हिट ठरला. १९६० च्या आत्यतिक यशस्वी ब्रिटिश चित्रपटात त्याची नोंद झाली. या चित्रपटाबरोबरच त्याने बोल्टिंग बंधूचा निरोप घेतला. त्याबरोबर आणखी एक वाईट घटना घडली. म्हणजे त्याची बायको ॲन आणि त्याच्यात प्रचंड दुरावा निर्माण झाला. ॲन एका आर्किटेक्टच्या प्रेमात पडली होती. पीटरचा स्वभावच त्याला बऱ्याचअंशी कारणीभूत ठरला होता त्यानंतरचे त्याचे काही चित्रपटही म्हणावे तसे चालले नाहीत. घरचा वैताग आणि पडेल चित्रपट यानी वैतागलेला पीटर पुन्हा अमेरिकेला आला आपल्या नव्या ' लोलिता ' या चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी तो आला होता.

यावेळी त्याचे नकलाचे कार्यक्रम फार प्रसिद्धी पावले. ' हॅरोल्ड मॅकमिलन ' ची नक्कल करून त्याने अध्यक्ष जॉन केनेडीना मनमुराद हसवले. या कालावधीत त्याला भरपूर ऑफर्स आल्या. ' पीटर सेलर्स ' चित्रपट बनवण्यासाठी हॉलीवूडचे अनेक निर्माते उत्सुक होते.

व्लादिमीर नॅबाकोवच्या प्रसिद्ध 'लोलिता' मध्ये काम करताना पीटरच्या प्रतिभेने सेटवरील सगळे कलाकार विस्मित होऊन जात. नॅबाकोवन लिहिलेले सवाद म्हणत असताना अचानकपणे कोणी काही बोलले तर तेवढाच धागा धरून पीटर भूमिकेत विलक्षण रंग भरे. पीटरचे हे एक वैशिष्ठ्य होते. पूर्वनियोजितापेक्षा ऐन वेळेच्या परिस्थितीत त्याला भूमिकेत रंग भरता येई. 'लोलिता'च्या दिग्दर्शनाने हे हेरून त्याला प्रोत्साहन दिले. ३ कॅमेरे वापरून त्याने पीटरचे शूटिंग घेतले दिग्दर्शक आणि प्रमुख नट याच्या अशा सहकार्याने तयार झालेल्या 'लोलिता'मध्ये समीक्षकांना वेगळी छटा दिसून आली. या दोघानी मिळून लोलिताचे एक नवे रसग्रहण केले होते एक नवा अर्थ त्यातून उलगडण्यात ते यशस्वी झाले होते.

त्यानतरच्या स्ट्रेंजलव्हनेही पीटरच्या अभिनयाची पावती दिली. यात अमेरिकेचा अध्यक्ष, एक इंग्लिश कॅप्टन आणि डॉ. स्ट्रेंजलव्ह (अध्यक्षीय सल्लागार) अशा ३ भूमिका त्याने बजावल्या. या तिन्ही भूमिकाचे वेगळेपण त्याने सुंदररीत्या साकार केले. विशेष म्हणजे डॉ. स्ट्रेंजलव्हच्या त्याच्या भूमिकेत अनेकांना डॉ. हेन्री किसिंजरची प्रतिमा जाणवते. पण हा पीटरच्या अंतःस्फूर्त कलात्मकतेचा आविष्कार होता. त्याने किंवा दिग्दर्शक क्युब्रिकने कधीच डॉ. किसिंजरना पाहिले नव्हते.

१९६३ मध्ये बनलेल्या ' द वर्ल्ड ऑफ हेन्री ओरीएंट ' मध्ये त्याने प्रसिद्ध चित्रकार साल्वादोर दालीशी साम्य जाणवेल असा एक पियानोवादक साकार केला.

ब्लेक एडवर्डस् नावाच्या एका प्रसिद्ध यशस्वी दिग्दर्शकाला कॉमेडीजची एक मालिका तयार करायची होती. डेव्हिड निवेन, रॉबर्ट वॅग्नर, क्लाउडिया कार्डीनेल, क्यापुकाइन वगैरे आतरराष्ट्रीय कीर्तीची कलाकार मडळी जमवली होती. पीटर उस्तीनोव्ह हा ऑस्करविजेता कलाकारही त्यात होता, पण ॲव्हा गार्डनरला आपल्या जोडीला घेतलं नाही म्हणून तो रुसून निघून गेला होता.

उस्तीनोव्ह नाही म्हणून ब्लेक एडवर्डस् नाराज झाला. बरीच शोधाशोध केल्यावर पीटर सेलर्सचे नाव त्याच्या डोळ्यापुढे आले त्याचे काही चित्रपट त्याने पाहिले होते त्यामुळे आपल्या व्यक्तिरेखेला पीटर न्याय देऊ शकेल अस त्याला वाटलं आणि ९०००० पौंडस् एवढ्या फीवर केवळ ५ आठवड्याच्या कामासाठी त्यानं पीटरला करारबद्ध केलं.

पीटरला एवढा मोबदला आयुष्यात

प्रथमच मिळत होता. पण त्याच्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे ज्याच्या आयुष्यातील सगळ्यात लोकप्रिय आणि त्याचं नाव अमर करून टाकणारी भूमिका त्याला मिळत होती.

पण त्याला तेव्हा हे माहिती नव्हत.

पीटर सेलर्स

जन्म : ८ सप्टेंबर १९२५.

गाजलेले कार्यक्रम : बीबीसी वर आणि ब्रिटिश टिव्हीवर 'गून शो' आणि नकलांचे कार्यक्रम

गाजलेले चित्रपट

| | | |
|---|---|---|
| ऑर्डर्स आर ऑर्डर्स | (१९५४) | Orders are Orders. |
| द लेडीकिलर्स | (१९५६) | The Lady Killers. |
| द नेकेड ट्रुथ | (१९५८) | The Naked Truth. |
| आयम् ऑल राईट, जॅक | (१९५९) | I'm All Right, Jack. |
| द मिलियनेरेस | (१९६०) | The Millionairess. |
| ओनली टू कॅन प्ले | (१९६२) | Only Two Can Play. |
| लोलिता | (१९६२) | Lolita. |
| पिंक पॅंथर मलिका | (१९६४, १९६४, १९७५, १९७६, १९७८). | |
| डॉ. स्ट्रेंजलव्ह | (१९६४) | Dr. Strangelove. |
| देअर इज् अ गर्ल इन माय सूप | (१९७१) | |
| बिईंग देअर | (१९७९) | Being There ऑस्करसाठी शिफारस. |

मृत्यू : १४ जुलै १९८०

अशाप्रकारे पीटरची 'पॅंथर' मालिका सुरू झाली. या पिंक पॅंथर मालिकेत पीटरकडे इन्स्पेक्टर क्लोझ्राची भूमिका होती. इंग्लंडमध्ये प्रसिद्ध असणाऱ्या 'कॅप्टन वेब' काडीपेटघावर जे लेबल होते त्या धाग्यावरून पीटरने हा इन्स्पेक्टर उचलला. त्याच्याच मोठ्या मिशा, मोठा ढगळा शर्ट. या भूमिकेसाठी पीटरने खास गोळ्या घेऊन वजन घटवले होते.

'क्लोझ्राला मी अभिमानी बनवेन,' पीटर म्हणाला, 'कारण तो स्वत.ला जगातील सर्वात मोठा डिटेक्टिव्ह समजतो. मूळ प्रतीतील इन्स्पेक्टर पूर्ण मूर्ख आहे पण त्याला थोडासा जिवत बनवण्याच्या दृष्टीने त्याला थोडा मान देणे योग्य ठरेल.'

ब्लेक एडवर्डचे आणि त्याचे झटकन सूत जमले. पीटरने लंडनहून रॉबीनहूड हॅट मागवली. याशिवाय पीटरने या इन्स्पेक्टरसाठी 'फ्रेंच' बोलण्याची पद्धती वापरायचं ठरवलं. पीटरच्या स्वत.च्या कल्पना आणि ब्लेक एडवर्डचं सुदर दिग्दर्शन यामुळे पहिला पॅंथर चित्रपट 'द पिंक पॅंथर' कमालीचा यशस्वी ठरला. दुसरा 'द शॉट इन द डार्क' पहिला प्रसिद्ध होण्यापूर्वी सुरू झाला होता या पॅंथर सेरीजमधील विनोद जगातील सर्व सिनेरसिकांना रुचणारे होते.

जेम्स बॉंड मालिकेनतर पिंक पॅंथर मालिकेएवढी दुसरी लोकप्रिय मालिका झाली नाही. अर्थात या यशात पीटरबरोबर इतराचाही वाटा होताच

या चित्रपटात जे विनोद वापरण्यात आले ते अगदी बारकाईने तयार करण्यात आले होते. छोटे छोटे प्रसगच पण ते इतक्या विनोदीरीत्या पेश करण्यात आले होते; प्रत्यक्ष चित्रिकरणावेळी पीटर त्यामध्ये आपला रंग भरी. दिग्दर्शक एडवर्डस् हा अत्यंत कल्पक माणूस होता. पण तरीसुद्धा काही वेळा पीटर बिघडला की, सघर्ष निर्माण होई. पीटरला सगळ्या गोष्टी पूर्ण लागत. पण एडवर्डस् जमवून घेणारा मनुष्य होता.

ब्लेक एडवर्डस् म्हणाला, 'पीटर हा असा माणूस आहे की, एका मिनिटात तुम्हाला तो हसवेल तर दुसऱ्या मिनिटात एखाद्या कुऱ्हाडीने तुमच्या मस्तकावर घाव घालायला निघेल.'

या सघर्षातूनच पॅंथरच्या तिसऱ्या चित्रपटात पीटरऐवजी ॲलन आरकिनला घेण्यात आले उद्वेगाने पुन्हा पॅंथर चित्रपटात काम करणार नाही म्हणणारा, पॅंथरची भूमिका दुसऱ्याला गेल्यावर मात्र हादरला.

त्याला समाधानकारक अशी दुसरी एक घटना यावेळी घडली. ॲनने त्याच्यापासून घटस्फोट घेतल्यावर पीटर एकाकीच होता. 'पॅंथर' सेरीज यशस्वी होत असताना 'ब्रिट एकलॅंड' हिच्याशी त्याचा परिचय झाला. 'पुन्हा कधीही लग्न करून दिलाला जखमा करून घेणार नाही.' म्हणणारा पीटर ब्रिटच्या प्रेमात पडला. ब्रिटचा बांधा वगैरे ब्रिजिट बार्दोसारखा होता आणि ती एक महत्त्वाकांक्षी नटी होती.

थोडा काळ प्रियाराधन वगैरे झाल्यावर पीटरच्या मुलाखतीतून ब्रिटने पीटरवर पुरता कब्जा मिळावलाय हे उघड झाले ती शूटिंगसाठी बाहेर गेली असताना टेलीफोन करून पीटरने तिला लग्नाची मागणी घातली.

१९६४ च्या दरम्यान ते दोघे विवाहबद्ध झाले. हनीमूनला वेळ नव्हता. कारण दोघांनाही शूटिंगच्या तारखा होत्या.

त्यानतर आणखी एक भूमिका त्याच्याकडे चालून आली. चक्क 'जेम्स बॉंड 'ची भूमिका! चित्रपटाचे नाव होते 'कॅसिनो रॉयेल'. इयान फ्लेमिंगच्या बॉंडकथातील ही पहिली बॉंडकथा. बॉंडपट काढणाऱ्या लोकाकडे याचे हक्क नव्हते. चार्लस् फेल्डमनकडे याचे हक्क होते आणि किती जरी विचित्र वाटल तरी पीटरनच ही भूमिका केली पाहिजे असं त्याच मत होतं. पीटरनं हे आव्हान स्वीकारल आणि त्यासाठी आपलं शरीर पीळदार बनवण्यासाठी व्यायाम चालू केला.

या व्यायामाचा अतिरेक होऊन एप्रिल ६४ च्या सुमारास त्याला हृदयविकाराचा झटका आला त्याच्या चरित्रलेखकाच्या म्हणण्याप्रमाणे १॥ मिनिटे त्याचं हृदय चक्क बंद पडले होते. त्वरित उपचार करून तो बरा झाला पण त्याला इथून पुढे सावधानीचा सल्ला देण्यात आला.

चार्ले मॅक्लेन म्हणते की या वेळेला पीटरने मृत्यू अनुभवला. त्या दीड मिनिटामध्ये

त्याला एक अतीव समाधान वाटले. सूक्ष्म शरीराने तो डॉक्टरांच्या हालचाली पाहात होता. मृत्यूची भीती त्या अनुभवाने नाहीशी झाली.

थोडा काळ विश्रांती घेतल्यावर 'व्हाटस् न्यू पुसीकॅट ?' नावाचा एक चित्रपट पीटरने पीटर ओ टूल, वूडी ॲलन, उर्सुला ॲन्ड्रेस यांच्याबरोबर पूर्ण केला. यात पीटर एक मानसशास्त्रज्ञ होता. अगदी गमतीदार प्रसंग एकत्र करून शुद्ध करमणूक देण्याच्या इच्छेने काढलेला हा चित्रपट होता. समीक्षकांनी 'सेक्सी', 'तिसऱ्या दर्जाचा विनोद', 'हीन अभिरूची' वगैरे टोले मारले, तरी प्रेक्षकांनी त्याला डोक्यावर घेतले.

या चित्रपटाचा पटकथालेखक 'वूडी ॲलन' जो पुढे विनोदी नट म्हणून प्रसिद्ध झाला तो अगदी पीटरसारखाच दिसायचा. एकदा ब्रिट एकलॅंड त्याला चक्क पीटरच समजली. पण पीटरचे आणि त्याचे संबंध सलोख्याचे होते. तो म्हणतो,

'मी कधी सिनेमात काम केलं नव्हतं. मी कोणीच नव्हतो. सेलर्स म्हणजे प्रचंड मनुष्य. त्याने माझी पटकथा मंजूर केलीय आणि त्याच्याबरोबर काम करायचंय म्हटल्यावर मला आनंदच वाटला. मला दुसरं काही नको होत, त्याच्या मागून चालण्यात मला खुशी होती.'

*या काळात पीटर थोडा धार्मिक बनला* होता. उर्सुला ॲन्ड्रेस आणि तो पीटरच्या एका रेव्हरंड मित्राबरोबर बायबलवर बोलत बसायचे. येशू ख्रिस्त पाण्यावरून चालत गेला, या गोष्टीचे त्याला खूप अप्रूप वाटायचे. तो सारखा तेच सांगायचा. पीटरचं खानदान ज्यू; पण ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याकडे त्याचा कल होत चालला होता.

प्रसिद्ध दिग्दर्शक 'व्हिट्टोरियो डिसिका' याच्या हाताखाली काम करण्याचा योग पीटरला 'आफ्टर द फॉक्स'मध्ये आला. या चित्रपटाची त्याची बायको ब्रिट एकलॅंड हिलाही संधी मिळाली. बायकोची करीयर वाढवण्याची संधी म्हणूनही पीटरला या चित्रपटाचे आकर्षण होते. पुन्हा डिसिका! जगातील उत्कृष्ट दिग्दर्शकातील एक! पण प्रत्यक्ष चित्रीकरण चालू होताना दोघाचे जमेना. आपले काम म्हणावे तसे होत नाही म्हटल्यावर पीटरने डिसिकाला काढून टाकण्याचा प्रयत्न केला; पण निर्माता त्याला बधला नाही. परस्पर असहकारामुळे पीटरचा हा चित्रपट काही जमला नाही, त्याची समीक्षणेसुद्धा काहीच्या बाहीच आली.

पीटर परत फॉर्मात आला तो नंतरच्या 'द रॉंग बॉक्स' ने. यात तो डॉ. प्राट म्हणून चमकला. यातील पीटर न ओळखण्यासारखा होता. पडेल, पछाडल्यासारखा चेहरा घेऊन, खांद्यापर्यंत केस आलेला, थोडासा ढेरपोट्या. डॉ. प्राट या भूमिकेत पीटरने धमाल उडवली.

'कॅसिनो रॉयेल' साठी पीटरने आपला मित्र मॅकगार्थ याला दिग्दर्शनाची संधी द्यायला लावली. डेव्हिड निवेन, चार्लस् बॉयर, वूडी ॲलन वगैरे मंडळी त्यात होतीच. पण सुरुवातीपासून या चित्रपटाचे सगळे बिघडतच गेले. पटकथा चांगली असली तरी वारंवारच्या बदलामुळे सगळे विस्कळीत झाले आणि चित्रिकरण लांबत राहिले. प्रत्येकजण जेम्स बॉंड आणि शेवटी कोणीच जेम्स बॉंड नसतो अशी ती मूळ कल्पना होती, पण प्रत्येकाच्या सूचना अंमलात येऊन शेवटी त्याचे भदे झाले. त्यात पीटरचा काही वेगळा दुराग्रह असायचा. एक ऑर्सन नावाचा नट अपशकुनीच आहे. त्याच्याबरोबर आपले *सीन घेऊच नका असं त्यानं बजावलं. त्यामुळे* दोघाचे वेगवेगळे सीन घ्यावे लागले. मॅकगार्थला वाटलं पीटर चुकीच्या पद्धतीने भूमिका करतो आहे. त्याबद्दल पीटरला तो बोलायला गेला तर पीटरने त्याच्याबरोबरच भांडण काढले. शेवटी कॅसिनो रॉयेल पूर्ण होण्यापूर्वीच पीटरने ते सोडले. त्यात पीटरची बदनामीच खूप झाली.

त्यानंतर पीटरला आणखी एक धक्का बसला. त्याची आई पेग सेलर्स हिचे ७२ व्या वर्षी निधन झाले. पीटरचे आईवर खूप प्रेम होते. रंगभूमीवर मोठ्या झालेल्या पेगने पीटरवर खूप माया केली होती. पीटरच्या प्रत्येक गोष्टीकडे तिचे बारकाईने लक्ष असे. पीटर उदास होई तेव्हा आईकडेच धाव घेत असे. पीटरच्या पहिल्या काही वर्षात त्याचे चालत नसे. सिनेमात आल्यावरसुद्धा पेगचे त्याच्या जीवनातील महत्त्व कमी झाले नव्हते. अगदी सेटवरूनसुद्धा तो पेगला फोन करून तिची ख्यालीखुशाली विचारून घेत असे. आई आणि मुलगा यांचे असे आत्यंतिक प्रेमळ संबध शेवटपर्यंत राहिले आणि म्हणूनच पीटरच्या स्वभावात एक बाल्य शेवटपर्यंत राहिले. आईच्या सरक्षक छायेमुळे त्याला सुरक्षित वाटायचे. पीटरचा बाप विल्यम सेलर्स हा त्या मानाने पार्श्वभूमीतच राहिला.

'पेग'च्या निधनाने पीटर पोरका झाला. तो धक्का त्याला सहन झाला नाही. त्याच्यातील असुरक्षिततेची भावना पुन्हा वाढीस लागली. त्यात ब्रिट एकलॅंडचे आणि त्याचे संबंध दुरावले. ब्रिट महत्त्वाकांक्षी होती. पीटरपेक्षा तिला स्वतःची फिल्म करियर महत्त्वाची वाटत होती.

'कॅसिनो रॉयेल'च्या अनुभवामुळे कोलंबिया पिक्चर्सनी पीटर सेलर्स नावाची डोकेदुखी नको असे ठरवून टाकले होते. त्यामुळे थोर भारतीय दिग्दर्शक सत्यजित रे यांच्याबरोबर काम करण्याची संधी पीटरने गमावली.

सत्यजित रे नी 'द एलियन' नावाची कथा लिहिली होती. त्यात एका बंगाल्याची भूमिका त्यांनी पीटरला देऊ केली. एका लेखात ते म्हणतात,

'जर माझ्या समजुतीने सेलर्सला एक जरी भारतीय हेल, जरासा दक्षिण भारतीय येत असेल, माझी खात्री होती, त्याने जर ही भूमिका करायचे ठरवले तर तो त्यामध्ये स्वतःची नवी, अधिकृत भर घालून भूमिका रंगवेल. माझ्याकडे असलेल्या त्याच्या ध्वनिमुद्रिकावरून सिद्ध होते की तो आवाज आणि जिभेचा वाटेल तसा वापर करू शकतो; अगदी चमत्कार वाटावा इथपर्यंत.

सुरुवातीला पीटर उत्साही होता; पण नंतर ते फिसकटले. रेंची फार इच्छा होती; पण पीटर आता बराच ढामळला होता आणि कोलंबियाला पीटर नको होता.

रेनी पीटरच्या पद्धतीवर, त्या गोष्टीवर पीटरप्रमाणे काव्यात टीका केली. ते म्हणाले,

'Causing a great deal of dismay!
to Satyajit Ray!

त्याची दुसरी बायको ब्रिट एकलॅंड हिनेही त्याच्यापासून घटस्फोट घेतला. पीटरपेक्षा तिला करिअर महत्त्वाची वाटत होती.

पीटरची एकूण स्थिती नाजूक बनली होती. त्याला हृदयविकाराचा त्रास होताच, त्यात आर्थिक अडचणींनी त्याला पिडले होते. पीटरचा एकूण खर्चच फार असायचा.

'देअर इज अ गर्ल इन माय सूप' नावाचा गोल्डी हॉनबरोबर एक विनोदी चित्रपट तेवढा पीटरच्या दृष्टीने यशस्वी ठरला. गोल्डीने त्याला पुन्हा त्याचा आत्मविश्वास वाढवला. या चित्रपटासाठीसुद्धा पीटरला त्याचे मनुष्यस्वभाव निरीक्षण उपयोगी पडले. या चित्रपटाची कथा ज्या रंगेल माणसावर बेतली होती तो माणूसच रॉय बॉल्टिंगने त्याला दाखवला. विशेष म्हणजे पीटरची दुसरी घटस्फोटित बायको ब्रिट एकलँड त्याच्या सहवासात होती तेवढा धागा घेऊन पीटरने त्या भूमिकेत वास्तववादी रंग भरले.

पीटरचे तिसरे लग्न मिराडा क्वारीबरोबर झाले. हे जेमतेम महिनाभर टिकले. पीटरला या काळात योगाचे व्यसन लागले. ध्यानधारणा, हिंदू मंत्र याचे त्याला फार कौतुक वाटले. तो आता सतत ध्यानधारणा करू लागला.

पडेल चित्रपटांनी पीटर अगदी घाईला आला. तेव्हा पुन्हा एकदा पिंक पँथर ने त्याला हात दिला. १९७५ मध्ये 'रिटर्न ऑफ दी पिंक पँथर' ने पुन्हा एकदा पीटर रसिकांची वाहवा मिळवता झाला. त्यानतर ७६ ला 'पिंक पँथर स्ट्राइक्स अगेन' आणि 'द रिव्हेंज ऑफ दी पिंक पँथर' १९७८ मध्ये एवढे पँथर चित्रपट त्याने दिले.

१९७७ मध्ये लिनी फ्रेडरिक हिच्याशी त्याचे लग्न झाले. लिनी ही एकमेव स्त्री अशी होती की, जिने पीटरला सांभाळून घेतले आणि अखेरपर्यंत ती पीटरबरोबर राहिली. पीटरच्या हृदयाची तिला पुरती कल्पना होती. कोणताही धक्का सहन करण्याच्या परिस्थितीत तो नव्हता हे माहिती असल्यामुळे कित्येक वेळा पीटरचा अतिरेक, रागाचे झटके तिने अत्यत सहनशीलवृत्तीने सोसले.

प्रसिद्ध हृदयशस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. ख्रिश्चन बर्नार्ड यानी एकदा पीटरच्या हृदयाची शस्त्रक्रिया करण्याचे ठरवले होते; पण पीटरच्या मनाने अगदी ऐनवेळी कच खाल्ली आणि तो बिनसागता तेथून निघून आला. ही शस्त्रक्रिया झाली असती तर पीटर आणखी काही वर्षे जगला असता.

पीटरने त्यानंतर 'बिइंग देअर' हा चित्रपट पूर्ण केला. ७८ वर्षे त्याला त्या कथेचे आकर्षण होते. तो पूर्ण व्हायला १९७९ साल उजाडले.

यात पीटरने चान्स माळयाची भूमिका केली होती. कादंबरी वाचल्यापासून त्याला या माळयामध्ये आपला भास होत होता. या भूमिकेकसाठी पीटर राब राब राबला. त्याचे लक्ष सगळे ऑस्कर पारितोषिकाकडे होते.

'लॉरेल' हा प्रसिद्ध नट पीटरचा आवडता होता. लॉरेल हार्डी या प्रसिद्ध जोडगोळीतील तो एक. या दोघाबरोबर काढलेले चित्र पीटरने स्वतःच्या खोलीत लावलेले होते. या लॉरेलचा हेल पीटरने चान्स माळयासाठी वापरला.

या चित्रपटात भूमिका करताना पीटरने इच्छाशक्ती वापरली. दुबळे हृदय आणि अनेक समस्या यानी पिडलेला पीटर जास्त दिवस जगणार नाही हे आता स्पष्ट होते; पण आयुष्यातील सगळयात मोठी संधी म्हणून पीटरने खूप मेहनत केली. याबद्दल ऑस्कर मिळणारच अशी त्याला खात्री होती.

त्यानंतरही 'द फिएंडिश प्लॉट ऑफ डॉ. फु माच्यु' नावाच्या चित्रपटात त्याने काम केले. या चित्रपटाचे एकमेव वैशिष्टय म्हणजे तो पीटरचा शेवटचा चित्रपट ठरला. दुसरे त्यात काही नव्हते.

१९८० च्या ऑस्कर पारितोषिकांची त्याला प्रतिक्षा होती. त्याच्या नावाची शिफारस झाली होती; पण पारितोषिक मात्र त्याला न मिळता क्रॅमर व्हर्सेस क्रॅमर बद्दल डस्टीन हॉफमनला मिळाले. डस्टीनच्या प्रतिभेबद्दल शका नव्हती; पण पीटर मात्र या घटनेने पुरता खचून गेला. कॅनीस महोत्सवातसुद्धा पहिले बक्षिस 'ऑल दॅट जाझ'ला मिळाले

पीटर आता जास्त दिवस जगणार नाही हे उघड झाले होते.

मनाला थोडा दिलासा मिळावा म्हणून पीटर इग्लंडला आपल्या मित्राना भेटायला आला होता. २४ जुलैला आराम पडलेला असतानाच त्याला हृदयविकाराचा झटका आला आणि त्याला दवाखान्यात दाखल करण्यात आले. लिनी फ्रेडरिकला फोन करून बोलवण्यात आले.

औषधोपचाराचा काहीही उपयोग झाला नाही; पण लिनी येईपर्यंत तो जिवत होता. लिनी आल्यावरच त्याने प्राण सोडला.

मृत्यूपूर्वी अनेक गोष्टी त्याला करायच्या होत्या. पिंक पँथरवर तो स्वतः एक कथा लिहीत होता. 'रोमान्स ऑफ दी पिंक पँथर'मध्ये त्याला काही वेगळे करून दाखवायचे होते. थोरल्या दोन मुलांना त्याने त्याचे आयुष्य जगण्यासाठी २५००० डॉलर्स दिले होते. तिसऱ्या मुलीसाठीही त्याला द्यायचे होते पण ती इच्छा अपुरी राहिली.

५४ चित्रपटात काम करून त्याने अब्जावधी रुपये मिळवले; पण शेवटी त्याच्या खर्चिक स्वभावामुळे त्याच्याकडे शिल्लक फार कमी राहिली होती

'चार्ली चॅपलिन'नंतर स्वतःची शैली असणारा सर्वात मोठा नट म्हणून ख्याती मिळवणारा पीटर स्वतः मात्र नित्य उदास राहिला. अभिनयाचे अत्युच्च टोक गाठूनही पारितोषिकापासून दूर राहिला.

सगळया जगाला खदखदून हसवत असताना स्वतः मात्र अश्रू लपवत राहिला. □

आधार– Peter Sellers
Alexander Walker
Preface by Lynne Fredesick
(पीटरची ४ थी बायको)


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

# रंगभूमी

# गडकरी शताब्दी समारोप सोहळा

वि. भा. देशपांडे

पुण्याच्या संदर्भात मे महिना हा अनेक कारणांनी गजबजलेला असतो. विविध प्रकारची व्याख्याने, गप्पा, लग्नकार्ये इत्यादी चालूच असते. सांस्कृतिकदृष्ट्या अनेक घडामोडी याच वेळात चालू असतात. अशांमध्ये अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम घडला तो म्हणजे राम गणेश गडकरी यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याचा सांगता समारोह.

२६ मे १९८४ पासून गडकरी जन्मशताब्दी उत्सवाला आरंभ झाला आणि त्याची सांगता २६ मे १९८५ ला पुण्यात झाली. या वर्षामध्ये गणदेवी, नवसारी, नागपूर, मुंबई, ठाणे आणि पुणे अशा अनेक गावी महत्त्वपूर्ण कार्यक्रम झाले. नाटक, विनोद, कविता अशा तिन्ही प्रांतात गडकऱ्यांची यशस्वी मुशाफिरी असल्याने या कार्यक्रमांना त्रिवेणीचे रूप होते. गडकऱ्यांच्या साहित्यातील काही भाग एकत्रित करून अनेकांनी कार्यक्रम पेश केले. असे कार्यक्रम जसे रंगमंचावरून झाले तसेच आकाशवाणी, दूरदर्शन ह्या माध्यमांमधूनही झाले.

पण या कार्यक्रमांपेक्षा अगदी वेगळ्या प्रकारचा कार्यक्रम सांगता समारोहाच्या निमित्ताने घडला. तो म्हणजे गडकऱ्यांच्या पालखी-सोहळ्याचा. २६ तारखेला संभाजी उद्यानातील गडकऱ्यांच्या पुतळ्याजवळून ही पालखी (दिंडी) निघाली. पालखीचा थाट झोकात होता. पुढे चौघडा झडत होता. त्यामागे भरजरी वस्त्रांकित असा हत्ती झुलत चालला होता. त्यामागे पालखी. त्यामध्ये गडकऱ्यांचा फोटो आणि साहित्यकृती ठेवल्या होत्या. पालखीच्या सोहळ्यात सर्वश्री प्रभाकर पणशीकर, चित्तरंजन कोल्हटकर, बाळ कोल्हटकर, डॉ. वाळिंबे, वसंत शांताराम देसाई, माधवराव गडकरी, भालबा केळकर अशा कितीतरी नाट्य–साहित्य क्षेत्रांशी संबंधित व्यक्ती होत्या. ही पालखी शनिवार पेठेतून जिजामाता बागेवरून कसबा पेठेत गडकऱ्यांच्या घरी आली. फणीआळी तालमीजवळ १३६, कसबा पेठ, सिन्नरकरांच्या वाड्यात तिसऱ्या मजल्यावर गडकरी रहात असत. त्या दिवशी ते घर दिव्यांच्या माळांनी शोभित केलेले होते. त्या घराचा पुनीत स्पर्श अनेकांनी भाविकतेने अनुभवला. तिथून जवळच असलेल्या याज्ञवल्क आश्रम संस्थेच्या सभागृहात छोटीशी सभा झाली. त्यामध्ये विशेष म्हणजे भाषणांचा सोस नव्हता, तर अगदी वेगळ्या पद्धतीने आदरांजली वाहिली गेली. चित्तरंजन कोल्हटकरांनी घनःश्यामच्या व्यक्तिरेखेतील काही भाग पेश केला तर बाळ कोल्हटकरांनी गडकऱ्यांच्या राजसंन्यासचे जे पूर्ण लेखन केले आहे त्यातला एक प्रवेश वाचून दाखवला. पण या सर्वांपेक्षा निरंतर लक्षात राहणारा भाग होता तो कवी शंकर वैद्य यांनी गडकऱ्यांच्या कविता म्हणून दाखवल्या. त्यातही गडकऱ्यांची 'प्रेम आणि मरण' ही कविता इतकी उत्तम रीतीने पेश केली की, तिला सतत दाद तर मिळालीच; पण पुन्हा म्हणण्याविषयी आग्रह झाला. कार्यक्रम वेळेवर आणि नेटका झाला की, किती आनंद होतो ते त्या दिवशी कळाले.

त्याच दिवशी सायंकाळी बालगंधर्व रंगमंदिरात समाप्तीचा सोहळा झाला. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, राज्य शिक्षणमंत्री विलासराव देशमुख हे मंत्रीमहोदय आणि अन्य मंडळींच्या सहवासात हा समारंभ संपन्न झाला. या समारंभाची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे आटोपशीर भाषणे, जुन्या जाणत्या गडकरीप्रेमींचा सत्कार. वसंतदादांनी पणशीकरांच्या मागणीनुसार नाट्यपरिषदेला एक लाख रुपये दिल्याची घोषणा ( ज्यातून दरवर्षी दहा हजारांचे पारितोषिक गडकऱ्यांच्या नावाने द्यायचे) असे खूप घडले. त्या दिवशी समारंभानंतर काही वेळाने गडकरीदर्शनाचा जो कार्यक्रम झाला तोही तितकाच महत्त्वाचा ठरला, या कार्यक्रमाचे मुख्य सूत्र नाटककार गडकरीदर्शन असे होते. गडकऱ्यांच्या नाटकातील काही प्रवेशांचा भाग, काही पदे निवेदन आणि नटी-सूत्रधाराच्या माध्यमातून पेश केली. या कार्यक्रमाचे सूत्रचालक किंवा एकूणच निर्मिती संकल्पन सौ. अनुराधा जोशी यांनी केले होते. सौ. अनुराधाबाई या अतिशय गुणी अशा कलावती आहेत. गायन आणि अभिनय या कलांमध्ये प्रवीण आहेत. त्यात त्यांनी अनेकदा प्रावीण्य मिळवलेले आहे याची साक्ष त्यांच्या कार्यक्रमातसंयोजनात जाणवत होती. संपूर्णपणे नव्या मुला-मुलींना हाताशी घेऊन त्यांनी त्यांच्याकडून गडकरींसारखा नाटककार उत्तमपणे केला हे फार मोठे श्रेय त्यांच्याकडे जाते. ही निर्मिती विदर्भ साहित्य संघाची होती· या कलावंतांना पुण्यात हा कार्यक्रम करण्याची संधी उपलब्ध करवून दिली हा संयोजकांचा विशेषच म्हणावा लागेल.

हा सारा सोहळा अनुभवताना आणि एकूणच वर्षभरातील कार्यक्रमांचे स्वरूप डोळ्यासमोर आणताना अनेक प्रश्न मनी येऊन गेले. गडकऱ्यांच्या नाटकांचे प्रयोग पारंपारिक आणि नव्या पद्धतीने करण्याचा यत्न झाला. त्यांच्या वाङ्मयाची झलक दाखवणारे कार्यक्रम झाले. त्यांच्याशी संबंधित वास्तूंची पुन: आठवण झाली. पुस्तकांची प्रकाशने झाली. तरीही एक खंत मनात राहून गेलीच ती म्हणजे गडकऱ्यांच्या एकूण कर्तृत्वाचे समग्र स्मारक घडण्याची योजना फलद्रुप झाली नाही. गडकरी हे जर महाराष्ट्राचे शेक्सपियर आहेत हे वारंवार सांगितले जाते ,तर मग लंडनमध्ये शेक्सपिअरचे स्मारक ज्या श्रद्धेने, निष्ठेने उभारले गेले त्या इतके नाही तरी आपल्या कुवतीनुसार ते स्मारक का उभारले जात नाही ? त्याच्या केवळ घोषणा करून उपयोग नसतो. शताब्दीचे-उत्सवाचे वर्ष येते अन् जाते, पण त्यातले हाताशी राहणारे, चिरंतन टिकणारे असे स्मारकरूपी किती असते ? ज्यांनी ज्यांनी अशा स्मारकाचे संकल्प मनोमन आणि जाहीरपणाने व्यक्त केले आहेत. त्यांनी त्यांची कार्यवाही करायला हवी. पुढची शताब्दी येण्याची वाट पाहू नये. ☐

# 'शिवा का इन्साफ' : त्रिमिती चित्रपट एवढंच वेगळेपण

चित्रपटाच तंत्र दिवसेंदिवस अधिकच विकसित व्हायला लागलंय. सुरुवातीला कृष्णधवल रंगात आणि अगदी प्राथमिक अवस्थेत असलेल्या चित्रपटांनी हळूहळू पार्श्वसंगीत, रंग, प्रगत छायाचित्रण यांच्या साहाय्यानं डोळ्यात भरण्याइतकी प्रगती केली चित्रपटाचा परिणाम लोकांच्या मनात ठसवण्यासाठी आणि चित्रपटाच माध्यम प्रभावी बनवण्यासाठी या प्रगत आधुनिक तंत्राचा खूपच उपयोग झाला या तंत्रात चित्रपटातील चित्राना लांबी, रुंदीबरोबरच खोलीही प्राप्त करून देणाऱ्या त्रिमिती तंत्राची भर पडली आहे.

तसं पाहिल तर त्रिमिती तंत्रानं निघणारे चित्रपट नवे नाहीत. सुमारे २५–३० वर्षांपूर्वी पाश्चिमात्यांनी त्याचा उपयोग केला होता. पण भारतात मात्र हा प्रकार नवीनच आहे पडद्यावर जे काही चाललं आहे त्यात प्रेक्षकालाही सामावून घेणारे, हे सर्व आपल्या समोर चाललय आणि पडद्यावरच्या वस्तू आपल्यापर्यंत पोचत आहेत असा भास निर्माण करणारे हे चित्रपट कुतूहल निर्माण करणारे आहेत एवढं निश्चत. 'छोटा चेतन'ला मिळालेल्या यशानंतर हिंदी चित्रपटसृष्टीत त्रिमिती चित्रपटाची जी लाट येऊ पहाते आहे त्यातला 'शिवा का इन्साफ' हा पहिला चित्रपट.

हिंदी चित्रपट निर्मात्यांची एक मजा आहे. नवीन तंत्राचा वापर करायला त्याचं एक पाऊल कायम पुढं असल तरी कथेच्या बाबतीत काही नवे प्रयोग करावेत, त्यातही काही विविधता असावी असं त्याच्या चुकूनही मनात येत नाही. परिणामी नुसताच तंत्राचा चकचकाट असलेले, ठिसूळ कथेचे चित्रपट निर्माण होतात. 'शिवा का इन्साफ'चं नेमक हेच झाले आहे. भारतातील पहिला पूर्ण लांबीचा त्रिमिती चित्रपट व्हायची संधी त्याला मिळाली असली तरी तीच ती शिळी सूडकथा पेश करून या संधीचं सोन करायचा मोका निर्माता–दिग्दर्शकानं वाया घालवला आहे.

लहानपणीच भोलाच्या डोळ्यांसमोर त्याचे सरकारी वकील असलेले वडील आणि आई यांचा खून होतो. आपल्या भावाच्या शिक्षेला कारणीभूत ठरल्यावरून जगन (शक्तीकपूर) या गुंडान त्याचा काटा काढलेला असतो. अनाथ झालेल्या भोलाचा साभाळ त्याच्या वडिलाचे तीन मित्र राम (विनोद मेहरा), रहीम (मजहरखान) आणि रॉबर्ट (परिक्षित सहानी) हे करतात. (अमर, अकबर, अँथनी प्रमाणं हेही राष्ट्रीय एकात्मतेचं दर्शन !) त्याच्याकडून तो विविध प्रकारे मारामाऱ्या करायच तंत्र चागल आत्मसात करतो.

पंधरा वर्षं उलटतात. आता मोठ्या झालेल्या भोलाला (जॅकी श्रॉफ) त्याचे तीन पालनकर्ते वेताळासारखा पोशाख अंगठी आणि त्रिशूल देऊन दुष्टाच्या निःपाता साठी पाठवून देतात. त्याच टोपणनाव ठेवलं जातं शिवा.

आपल्या आईवडिलाच्या खुन्याचा शोध घ्यायला भोला उर्फ शिवा शहरात येऊन दाखल होतो पुन्हा राम, रहीम आणि रॉबर्ट यांच्याच कृपेने त्याला एका वृत्तपत्रात नोकरी लागते. यथावकाश वृत्तपत्राची सुदर सपादिका रेखा (पूनम धिल्लों) हिच्या प्रेमातही तो पडतो. इतरत्र वावळट भोला आणि अन्यायाचा प्रतिकार करताना शिवा अशा दोन रूपात वावरून हा लवकरच शहरातल्या गुन्हेगारी वर्तुळात खळबळ माजवतो.

भोलाच्या आईवडिलाचा खुनी जगन आता डॉक्टर या नावाने गुन्हेगारी वर्तुळाचा राजा बनलेला असतो. गुन्हेगाराची पाळमुळ खणण्याच पुण्यकर्म करत असताना आपल्या आईवडिलाचा खुनी डॉक्टर हाच आहे हे शिवाला कळतं आणि तो त्याचा निःपात करतो.

'शिवा'ला आपल्या मनाप्रमाणे हव्या त्या गोष्टी करायला लावून त्याचं 'सुपरमॅन'शी नातं सांगायचा प्रयत्न दिग्दर्शकानं केला आहे पण तो अजिबात जमलेला नाही. त्यामुळे शिवानं हवेतून उडत येणं, वाटेल तिथ प्रकट होण, सायकलवरून भरधाव गाडीला मागं टाकण, इतकच नव्हे तर सायकलच्या धडकेनं गाडीची मोडतोड करण्याची करामत करणं हे सगळे प्रकार अगदी हास्यास्पद वाटतात.

त्रिमिती चित्रपटात पडद्यावरच्या वस्तू प्रेक्षकापर्यंत येण्याचा भास निर्माण होतो. त्याचा उपयोग करण्यासाठी दिग्दर्शकानं काठ्या, खाद्यपदार्थ जवळ येण्याचे अनेक प्रसग घातले आहेत. प्रथम प्रथम त्याची मजा वाटते. पण या दृश्यात सहजता नसल्यानं मुद्दामहून ती घातल गेल्याचं जाणवायला लागत आणि मग मात्र कंटाळा येतो.

चित्रपटातल्या चमत्कृतिपूर्ण प्रसगांना साजेसाच त्याचा शेवट आहे. देवळावरचा त्रिशूल खाली येऊन खलनायकाला मारतो वगैरे. आधीच हिंदी चित्रपटकथा वास्तववादापासून बऱ्याच दूर असतात. त्यात केवळ या तंत्राचा वापर करायचा म्हणून त्या अधिकाधिक चमत्काराकडं वळणार असतील तर मात्र कठीण आहे.

राज सिप्पीच्या दिग्दर्शनाबद्दल लिहिण्यासारखं काही नाही. काही तरी चागलं देण्याची क्षमता असलेला हा दिग्दर्शक चाकोरीतच अडकून पडला आहे आणि ही काही फारशी चांगली गोष्ट नाही. चित्रपटाच संगीत आर. डी. बर्मनचं आहे. चित्रपटातल्या एकूण गडबडीत सगीताला वाव नाहीच. त्यातही जी तीन गाणी घुसडण्यात आली आहेत ती फारशी लक्षात रहाण्यासारखी नाहीत.

कलाकारात जॅकी श्रॉफ आपल्या व्यक्तिमत्त्वामुळ शिवाच्या भूमिकेत शोभतो. बावळट भोलाचही काम त्यानं बर केलं आहे. पूनम धिल्लोंला गोड दिसण्यापलीकड काही वाव नाही. खलनायकाच्या भूमिकेत शक्तीकपूर आणि त्याचा मुलगा म्हणून गुलशन ग्रोव्हर आहे.


राम, रहीम, रॉबर्टच्या भूमिकात अनुक्रमे विनोद मेहरा, मजहरखान आणि परिक्षित सहानी आहेत. या चित्रपटात विनोद मेहरा प्रथमच नायक किंवा सहनायकाऐवजी चरित्र अभिनेता म्हणून पडद्यावर आला आहे. मजहरखान मात्र केस कितीही पाढरे केले तरी जॅकी श्रॉफच्याच वयाचा वाटतो.

एकूण काय, कथा, अभिनय असल्या फालतू गोष्टीकडे कानाडोळा करून केवळ आधुनिक तंत्र पहायचं असेल तरच 'शिवा का इन्साफ'ला जा.

—सीमा कुलकर्णी

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28


# एक टवटवीत विशेपांक



बिग ब्रदर्स...ॲडव्हेंचरर्स...
दोन तोडीस तोड जाहिरात कंपन्या
कॉपी...व्हिज्युअल्स...पोस्टर्स....स्लाईडस्....
प्रेस ॲडस् यांच्या वेगवान चक्रात अडकलेल्या.
दोन्ही कंपन्यांचं एकच प्रॉडक्ट
बाजारात आणण्याची वेळही एकच
यात एकानं यशस्वी होणं म्हणजे दुसऱ्याला
खाली खेचणं अटळच.
या घटनेत अडकलेली असंख्य छोटी मोठी माणसं,
त्यांच्याभोवतीचं प्रसिद्धीचं वलय...त्यांची नाती
जाहिरात कंपन्यांत गुंतलेले राजकीय संबंध आणि
यातून दिसणारा एक धारदार पॉवरगेम....म्हणजे
'शार्पएज' ही कादंबरी.
'माणूस'च्या तरुण–तरुणी अंकाचं हे एक मुख्य
आकर्षण.
याशिवाय खास तरुणांचे म्हणून विषय या अंकात
आहेतच. लहान वयात मोठ्या पदावर चढणारे
कर्तबगार तरुण
चाकोरीबाहेरचा व्यवसाय–मॉडेलिंग
लहान वयात स्वतंत्र व्यवसाय सुरू करून यशस्वीपणे
चालविणाऱ्या तरुण व्यावसायिकाचं मनोगत
ट्रेकिंगचे संवेदनशील मनानं टिपलेले अनुभव
आजच्या तरुणांबद्दल एका तरुणानंच केलेलं
मुक्त चिंतन
**आणि**
'जनरेशन गॅप' या भयंकर प्रश्नावरचा खुसखुशीत
विनोदी लेख
एका संपादकाचे तरुणपणातले अनुभव
**यांच्या जोडीला**
**कथा, कविता आणि व्यंगचित्रं**
**अधिक तपशील पुढील अंकात....**

# माणूस–तरुण–तरुणी विशेपांक